# सृजन

नोव्हेंबर २०२३ - फेब्रुवारी २०२४




महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे हस्ते प्रकाशगड मुख्यालयात प्रजासत्ताक दिन ध्वजारोहण



भारतीय प्रजासत्ताक दिनी महानिर्मिती–महावितरण प्रकाशगड मुख्यालयात महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सदर कार्यक्रमास मराविमं सूत्रधारी कंपनी, महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषणचे संचालक, कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी विभाग प्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.






Hon'ble Director (Projects) Shri. Abhay Harne visited NTPC and NIWE Delhi for 2500 MW RE Project and Training Programme with General Manager (MREL) Shri. Harshal Bhaskare.




Hon'ble Chairman & Managing Director Dr. P. Anbalagan attended International Seminar on "AI Applications in the Power Sector" at New Delhi



Executive Director (Coal) Shri. Rajesh Patil welcoming Chairman & Managing Director of Western Coalfield Ltd. Shri. J. P. Dwiwedi at Nagpur



शिवजयंती २०२४ च्या निमित्ताने महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मा. संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते-मुख्य महाव्यवस्थापक तसेच अन्य अधिकारी यांनी 'किल्ले रायगड' येथे कुटुंबासह भेट दिली.





महानिर्मिती दैनंदिनी (Diary) आणि दिनदर्शिका (Calender) वर्ष २०२४ चे प्रकाशन महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी.अन्बलगन यांचे शुभहस्ते प्रकाशगड मुख्यालय मुंबई येथे करण्यात आले. याप्रसंगी संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री.अभय हरणे, संचालक (खनिकर्म) मा.डॉ. धनंजय सावळकर तसेच कार्यकारी संचालक मा.श्री.राजेश पाटील, मा.श्री.पंकज नागदेवते, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) मा.श्री. आनंद कोंत, कंपनी सचिव मा.श्री. राहुल दुबे, मुख्य अभियंता (स्थापत्य) मा.श्री. दत्तात्रय साळुंखे, सल्लागार मा.श्री. दिलीप गुट्टे, जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते, सहाय्यक जनसंपर्क अधिकारी श्री. संतोष पुरोहित उपस्थित होते.



अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

## मनोगत

हिवाळा ऋतू प्रामुख्याने वीज उत्पादनासाठी अत्यंत अनुकूल असला तरी दसरा, दिवाळी, नववर्ष, सण-उत्सव, रोषणाई आणि हिवाळी अधिवेशनाच्या दृष्टीने या काळात विजेची वाढती मागणी आणि विजेबाबत नागरिक देखील जागरूक असतात. अश्या पार्श्वभूमीवर विजेची मागणी पूर्ण करताना कोळसा आणि पाण्याचा काटेकोरपणे वापर करीत महत्तम वीज उत्पादनाचे संतुलन साधण्यात महानिर्मितीला बऱ्याच अंशी यश प्राप्त झाले त्यामुळे यावर्षी महानिर्मितीने वीज निर्मितीत अनेक उच्चांक गाठले आहेत. यासाठी, महानिर्मितीच्या प्रत्येक मनुष्यबळाचे अभिनंदन करणे माझे कर्तव्यच आहे. मागील वर्षीची या कालावधीतील आकडेवारीची तुलना केल्यास कोळशाचा साठा जास्त असून जानेवारी महिन्यात उच्चांकी ४०.२७ लाख मेट्रिक टन कोळसा आवक प्राप्त झाली आहे. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पुरेसा कोळसा साठा उपलब्ध असल्याने निश्चितच आशादायी अशी परिस्थिती आहे.

फेब्रुवारी अखेर सुमारे ५० हजार दशलक्ष युनिट औष्णिक वीज उत्पादन, ८,४३० मेगावॅटचा उच्चांक आणि ८८.४ टक्के भारांक तर ही निश्चितच अभिनंदनीय अशी कामगिरी आहे. २५० मेगावॅट पारस संच ४ मधून सलग २०० दिवस अखंडित वीज उत्पादन, २१० मेगावॅट चंद्रपूर संच क्रमांक ३ मधून १०० दिवसांपेक्षा जास्त अखंडित वीज उत्पादन, खापरखेडा १,२२९ मेगावॅट विक्रमी वीज उत्पादन तर २,२०१ मेगावॅट कोराडी वीज केंद्राचे विक्रमी वीज उत्पादन या बाबी विशेष लक्षणीय ठरल्या.

वीज निर्मितीमध्ये उच्चांक गाठत असतांना महानिर्मिती मनुष्यबळाच्या आवडीनिवडी तथा व्यक्तिमत्व विकासासाठी नियमित उपक्रम राबवून त्यांना उत्साहित/ऊर्जादायी ठेवण्याचा प्रयत्न करण्याची संस्कृती महानिर्मितीत पूर्वापार चालत आली आहे. ज्यात प्रामुख्याने नाट्य, कला, क्रीडा, प्रशिक्षण, वर्धापन दिन, हॅप्पी स्ट्रीट सारख्या मनोरंजनपर आणि प्रबोधनपर बाबींचा समावेश आहे.

राज्य शासनाच्या अमृत महोत्सवी वर्षांत सुमारे १०४२ व्यक्तींना रोजगार देण्यात महानिर्मितीने केवळ पुढाकारच नव्हे तर मोठे योगदान दिले आहे, हे विशेष. सोबतच औष्णिक विद्युत उत्पादनाकडून शाश्वत नवीकरणीय ऊर्जा उत्पादनाकडे महानिर्मितीने आता लक्ष्य केंद्रित केले असून या क्षेत्रातील तज्ज्ञ-नामांकित अश्या खाजगी संस्थेसमवेत फ्रेमवर्क ॲग्रिमेंट करून गतिमानतेने प्रकल्प उभारणीसाठी महानिर्मिती कामाला लागली आहे. भुसावळ ६६० मेगावॅट प्रकल्प कामे देखील अंतिम टप्प्यात आहेत.

महानिर्मितीने आपल्या बहुतांश संचांना पर्यावरणपूरक एफ.जी.डी. संयंत्र लावण्याचा मोठा निर्णय घेतला असून मोठी आर्थिक गुंतवणूक देखील केली आहे व त्यादृष्टीने कामे प्रगतीपथावर आहेत. भुसावळ येथे हरित हायड्रोजन प्रकल्प उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

"त्रिसूत्री कार्यक्रम" आणि "मिशन ५ ई" सारख्या अभिनव उपक्रमाने महानिर्मितीच्या मधल्या फळीतील अभियंता वर्गाला नफा-तोट्याचे गणित समजावून सांगितल्याने टीम महानिर्मितीमध्ये आता नवचैतन्य पाहायला मिळत आहे किंबहुना खर्चात काटकसर, आर्थिक शिस्त, अचूक नियोजन आणि कार्यपद्धतीत थोडासा बदल करून संचनिहाय निकोप स्पर्धा, कार्यक्षमता वाढविण्यावर प्रत्येकाचा भर दिसून येत आहे ही वीज क्षेत्रातील स्पर्धेच्या दृष्टीने सकारात्मक बाब आहे.

पुढील दमदार वाटचालीसाठी महानिर्मिती मनुष्यबळाला मनापासून शुभेच्छा...

धन्यवाद, जय महाराष्ट्र!

**- डॉ. पी. अन्बलगन**

## एन.टी.पी.सी. ग्रीन एनर्जी लिमिटेड आणि महानिर्मिती यांच्यामध्ये नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी संयुक्त उपक्रम कंपनी स्थापन





दि. २८ फेब्रुवारी २०२४ रोजी दिल्ली येथे नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन ग्रीन एनर्जी लिमिटेड आणि महानिर्मिती यांनी पुढील २ वर्षांत महाराष्ट्रात २५०० मेगावॅटचे नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी एक संयुक्त उपक्रम कंपनी स्थापन केली. हे ऊर्जा संक्रमणाच्या राष्ट्रीय उद्दिष्टाच्या अनुषंगाने आहे, म्हणजे २०३० पर्यंत ५०० गिगावॅट अक्षय ऊर्जा आणि २०७० पर्यंत उत्सर्जन निव्वळ शून्य लक्ष्य.

## कोराडी येथे मासिक संचलन आढावा बैठक







महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे अध्यक्षतेखाली मासिक संचलन आढावा बैठक सभागृह, मुख्य अभियंता (बांधकाम) यांचे कार्यालय, कोराडी येथे डिसेंबर २०२३ मध्ये घेण्यात आली. त्यावेळी संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारूडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक सर्वश्री. राजेश पाटील, श्री. नितीन चांदूरकर व सर्व मुख्य अभियंते-मुख्य महाव्यवस्थापक उपस्थित होते.

## महानिर्मितीचे संचालक (वित्त) आणि (प्रकल्प) यांची निम्न वर्धा प्रकल्पाला भेट






५०५ मेगावॅट क्षमतेच्या प्रस्तावित तरंगत्या सौर ऊर्जा प्रकल्प विषयक प्राथमिक परिसर पाहणी, तांत्रिक व्यवहार्यता तपासणी संदर्भात महानिर्मितीचे संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे यांनी निम्न वर्धा प्रकल्पाला भेट दिली व स्थानिक जलसंपदा अधिकाऱ्यांशी चर्चा केली. यावेळी सोबत सल्लागार श्री. दिलीप गुट्टे, महानिर्मिती नवीकरणीय ऊर्जा मर्यादितचे महाव्यवस्थापक श्री. हर्षल भास्करे, जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते प्रामुख्याने उपस्थित होते.





महानिर्मिती सौर ऊर्जा प्रकल्प २५ मेगावॅट साक्री येथे गोदरेज एन्ड बॉयज यांच्या सामाजिक उपक्रमातून संरक्षण भिंतीवरील रेखाटलेल्या लोककला दर्शविणारी चित्रे व सुशोभिकरणाचे बक्षिस वितरण पार पडले. कै. जी.के. नांद्रे चित्रकला महाविद्यालय, साक्री येथील विद्यार्थी-विद्यार्थिनी, शिक्षक-कर्मचारी ह्यांनी सलग तीन दिवस वारली चित्र, सामाजिक व नाविन्य ऊर्जा, लोककला प्रदर्शनपर विविध विषयांवर चित्र रेखाटून सदर उपक्रम यशस्वी केला. सदर उपक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्य अभियंता (नवीकरणीय ऊर्जा, पुणे) श्री. किशोर राऊत यांनी स्वीकारले होते तर याप्रसंगी अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. सदर उपक्रमाचे सूत्रसंचलन श्री. राघवेंद्र चौहान यांनी केले.

## महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) यांची भुसावळ वीज प्रकल्पास भेट





महानिर्मितीचे संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे भुसावळ वीज प्रकल्प कार्यान्वयन प्रक्रियेवेळी उपस्थित होते. त्यावेळी त्यांचेसोबत तत्कालीन कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. पंकज नागदेवते, मुख्य अभियंते सर्वश्री. विवेक रोकडे (भुसावळ वीज प्रकल्प), दत्तात्रय साळुंखे (स्थापत्य-१), श्रीमती. विजया बोरकर (प्रकल्प संनियंत्रण गट) आणि भुसावळ वीज प्रकल्पातील अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.




## फलटण, पुणे येथील शायनिंग महाराष्ट्र - २०२४" मध्ये महानिर्मितीच्या दालनाला "सर्वोत्तम दालन" पुरस्कार जाहीर





दिनांक १९ ते २१ फेब्रुवारी या काळामध्ये फलटण, पुणे येथे आयोजित "शायनिंग महाराष्ट्र - २०२४" या भव्य प्रदर्शनामध्ये महानिर्मिती दालनाला सर्वोत्तम दालन पुरस्कार प्राप्त झाला. केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या उपक्रमातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यावेळी महानिर्मितीच्या दालनाचे सर्वत्र कौतुक झाले, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.




महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ गट कार्यालय ललित कला भवन चंद्रपूर येथे २०२३ ची वर्धा चंद्रपूर व गडचिरोली या तीन जिल्ह्याची गटस्तरीय पुरुष व महिला भजन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ऊर्जानगर वसाहतीतील कामगार कल्याण केंद्र ऊर्जानगरतर्फे श्रीगुरुदेव सेवा मधील दहा महिला भजन मंडळांनी तर नऊ पुरुष भजन मंडळांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत कामगार कल्याण केंद्र ऊर्जानगरने महिला भजन मंडळाला स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.


तेरवणमेढ जलविद्युत केंद्र, (२०० किलोवॅट) हे माहे १ जुन २०२२ डिसेंबर पासून टर्बाईन आणि ट्रान्सफॉर्मरच्या बिघाडामुळे बंद होते. सदर जल विद्युत केंद्राच्या हे दुरूस्तीबाबत योग्य पाठपुरावा व मोलाची कामगिरी पार पाडून दि. ५ ऑक्टोबर २०२३ सुस्थितीत करून पूर्ण क्षमतेने चालू केले. सदर दुरूस्तीच्या कामात विजयकुमार शिवायोगप्पा शीलवंत, सहाय्यक अभियंता, (१०२४८२) श्री. प्रमोद शिवाजी मंडले, तंत्रज्ञ-१(१०२५४५) श्री. विजयकुमार अशोक शिरोटे, तंत्रज्ञ-१ (४१८३) श्री. अमित अरूण धुमाळ, तंत्रज्ञ-१ (१०२४६६) या अभियंता व कर्मचारी यांनी कुशलतापुर्वक व परिश्रम घेवुन विशेष योगदान दिल्यामुळे तेरवणमेढे जल विद्युत केंद्र दुरूस्त झाले.
संबंधित सर्व अधिकारी, अभियंते, कामगार, कर्मचाऱ्यांचे मनापासून अभिनंदन!

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्रात ७५वा प्रजासत्ताक दिन संपन्न



कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील ऊर्जा भवन येथील समोरील प्रांगणात दि. २६ जानेवारी २०२४ रोजी भारताच्या ७५व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे यांचे शुभहस्ते सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले, तसेच राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली व सामुहिक राष्ट्रगीत व राज्यगीत सादर झाले. सदर प्रसंगी मुख्य अभियंता श्री. मोटघरे यांनी उपस्थित सुरक्षा विभागातील पोलिस अधिकारी / कर्मचारी, अग्निशमन विभागातील अधिकारी/ कर्मचारी व कंत्राटी सुरक्षा रक्षक यांचे परेड निरीक्षण केले. तसेच श्री. मोटघरे ह्यांनी मार्गदर्शनपर भाषण सादर कान उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.





# महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

वर्ष १८ वे (अंक १)

नोव्हेंबर २०२३ - फेब्रुवारी २०२४



### संचालक मंडळ

| | |
|---|---|
| अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक | : डॉ. पी. अन्बलगन (भाप्रसे) |
| संचालक | : श्रीमती. आभा शुक्ला (भाप्रसे) |
| संचालक (वित्त) | : श्री. बाळासाहेब थिटे |
| संचालक (संचलन) | : श्री. संजय मारुडकर |
| संचालक (प्रकल्प) | : श्री. अभय हरणे |
| प्र. संचालक (खनिकर्म) | : डॉ. धनंजय सावळकर |
| संचालक | : श्री. विश्वास पाठक |
| संचालक | : श्रीमती. स्वाती व्यवहारे |



संपादक : **यशवंत मोहिते**
जनसंपर्क अधिकारी (महानिर्मिती)

**मालकी**
**महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्या.**
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई

**श्री. यशवंत मोहिते** यांनी
कार्यालय - **हेमा आर्टस्**
१२१, सागर, प्रभात इंडस्ट्रीयल इस्टेट,
दहिसर चेकनाक्याजवळ, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे,
दहिसर (पूर्व), मुंबई - ४०००६८ येथे छापून
प्रकाशगड, वांद्रे, मुंबई येथे प्रसिध्द केले.

**(खाजगी वितरणाकरिता)**



**The Company accepts no responsibility for the matter published in the Journal.**


# Maharashtra State Power Generation Company Limited
## NOVEMBER 2023 - FEBRUARY 2024

## अनुक्रमणिका


| अनुक्रमणिका | लेखक / लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|
| MAHAGENCO, Yesterday, Today & Tomorrow | Parag Dinkar Zade | ३ |
| आनंदाचे झाड | आनंद आबाराव कोंत | ९ |
| सुर्यपुत्र, अंगराज कर्ण | अमोल विष्णु कांबळे | १५ |
| डलहौसी - हिमालयीन ट्रेकिंग... | प्रदिप दांडगे | २४ |
| सोलापूर माळरानावरील जैवविविधता | मंजुनाथ अशोक बागडे | २६ |
| लोक आपल्या आयुष्यात का येतात ? | आनंद आबाराव कोंत | २८ |

### काव्यकुंज
**पृष्ठ क्र. : १७ ते १८**
**सहभाग :** नितीन सोनवणे, राजेश वऱ्हाडे, सौ. तेजल पाटील, आनंद कोंत, प्रवीण भोईर

**सेवानिवृत्ती / निरोप** १९

### प्रशासकीय वृत्त
**पृष्ठ क्र. : ६ ते ८, १० ते १४, १६, २० ते २५, २७ ते २८**



संपादन सहाय्य : **संतोष पुरोहित**



**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
संपादक, सृजन
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित,
दुसरा मजला, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ई-मेल : pro@mahagenco.in
संकेतस्थळ : www.mahagenco.in

# संपादकीय....

'सृजन' चा हा अंक वाचकांना देताना अतिशय आनंद होत आहे.  महानिर्मितीच्या ऊर्जा रुपांतर योजनेसाठी हा संक्रमणाचा काळ आहे.  महानिर्मितीचा औष्णिक विद्युत उत्पादनात हातखंडा असला तरी काळाची पावले ओळखून महानिर्मितीने नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रात सूक्ष्म नियोजन करुन प्राथमिक कामांना गती दिली आहे.  महाजेनको रिन्युएबल एनर्जी लिमिटेड अंतर्गत हरित हायड्रोजन फ्रेमवर्क एग्रीमेंटसारखे नवनवीन करार करण्यात आले आहेत.  महानिर्मितीच्या चित्ररथाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला शाश्वत हरित ऊर्जेकडील पर्यावरणपूरक प्रवास निश्चितच दिलासा देणारा आहे.

महानिर्मिती मनुष्यबळ व कुटुंबियांमध्ये आनंदाचा स्तर उंचावण्यासाठी "हॅप्पी स्ट्रीट" सारखे अभिनव उपक्रम राबवून समाधानाचा स्तर उंचावण्यात येत आहे.  महानिर्मिती मनुष्यबळाच्या कला, कविता, साहित्य, लेखन संपदेला प्रोत्साहन देण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे.  या अंकात प्रामुख्याने आजादी का अमृत महोत्सव निमित्त महानिर्मितीतर्फे राज्यस्तरीय निबंध स्पर्धेतील प्रथम ३ विजेत्या स्पर्धकांचे (विभागून) तांत्रिक निबंध टप्प्याटप्प्याने घेतले आहेत. मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत ह्यांचे 'आनंदाचे झाड', 'लोक आपल्या आयुष्यात का येतात' तसेच 'आनंदी जगा' या लेखनाद्वारे आपले सहकारी आनंदी कसे राहतील, याबाबत त्यांनी विचार मांडले आहेत. तसेच नवोदित लेखक श्री. अमोल कांबळे यांचा पत्रलेख, श्री. मंजुनाथ बगाडे यांचा पक्षी निरीक्षणपर लेख, श्री. प्रदिप दांडगे यांचा प्रवास वर्णनात्मक लेख, तसेच श्री. नितीन सोनवणे, श्री. राजेश वऱ्हाडे, सौ. तेजल पाटील, श्री. प्रवीण भोईर यांच्या वैचारिक कविता समाविष्ट केल्या आहेत.

सुमारे ११०० व्यक्तींना महानिर्मितीने रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिल्याने नवीन मनुष्यबळाला आकार देण्यासाठी महानिर्मिती प्रशिक्षण विभागाने घेतलेला पुढाकार निश्चितच स्वागतार्ह आहे आणि मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक व मा. संचालक महोदयांचे नवीन अभियंत्यांसोबतचे थेट संवाद / मार्गदर्शन दिशादर्शक ठरणारे आहे.  "मिशन ५ ई" हा स्वत्वाची जाणीव करुन देणारा विकासाभिमुख अभिनव उपक्रम असल्याची महानिर्मितीच्या विद्युत केंद्रात चर्चा असून त्याचे सकारात्मक परिणाम दिसून येत आहेत.

वीज उत्पादन करताना सामाजिक बांधिलकीचा परिचय महानिर्मितीच्या अधिकारी-अभियंत्यांनी रक्तदानाने करुन दिला आहे, ही बाब निश्चितच अभिमानास्पद आहे.

**- यशवंत मोहिते**

# MAHAGENCO
## Yesterday, Today & Tomorrow

**- Parag Dinkar Zade**
**Dy. Exe. Engineer (BM-II),**
**Khaperkheda TPS.**

‘आजादी का अमृत महोत्सव’ निमित्त महानिर्मितीतर्फे राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर निबंध स्पर्धेतील तृतीय क्रमांक (विभागून) प्राप्त महानिर्मिती कर्मचाऱ्याचा निबंध. विजेत्या स्पर्धकांचे निबंध टप्याटप्याने उलट गुणांनुक्रमांनुसार यापुढील सृजन अंकात प्रसिद्ध केले जातील.

**“Some people believe that one should never look back, others believe that our past experiences can be great fuel for our desired future”.**

**MAHAGENCO – Yesterday**

Looking at the past of Mahagenco, one should not forget about our parent organisation Maharashtra State Electricity Board (MSEB) which was formed in 20th June, 1960. In accordance with Electricity Act 2003 of the Government of India, The Maharashtra State Electricity Board was restructured into 4 companies in 2005. These companies were registered on 31 May 2005 as follows :

- MSEB Holding Company Limited.
- Maharashtra State Power Generation Company Limited, Mahanirmiti or Mahagenco, MSPGCL.
- Maharashtra State Electricity Transmission Company Limited, Mahapareshan or Mahatransco, MSETCL.
- Maharshtra State Electricity Distribution Company Limited, Mahavitaran or Mahadiscom, MSEDCL.

New born Mahagenco came in force on 6 June, 2005. There were differences in opinion among staff and stakeholder about future and sustainability of the organisation. The transition period for Mahagenco from Board to Company was challenging. However, Mahagenco emerges its journey rapidly and achieved milestones in the field of Power Generation. Mahagenco always being focused on vision of “Generating adequate power for Maharashtra on a sustainable basis at competitive rates in a socially responsible manner”

From year 2005 to 2007, there was of acute shortage of power in Maharashtra, the public had faced load shedding. Mahagenco, Eyeing on future power requirement for Maharashtra State, started thermal power plant expansion projects. 1X500 MW Khaperkheda, 2X500 MW Bhusawal and 2X500 MW Chandrapur TPS were the major Thermal Power plant project executed successfully in possible short course of time.

Mahagenco also added feathers in the cap by incorporating super critical technology of 3X660 MW units which were installed at Koradi TPS. The same were successfully commissioned making Mahagenco and specially Vidarbha region as a Power zone. On 14th April 2017 Hon'ble Prime Minister Shri. Narendra Modi visited 3X 660 MW Koradi TPS on the eve of 3X600 MW units Dedication Ceremony, which made it golden moment for our organisation.

As per provision in Electricity act 2003, Private entities also became part of power generation in Maharashtra State. As per Maharashtra Electricity Regulatory Commission (MERC) norms the scheduling and backing down of generating units are governed on the basis of Merit Order Dispatch (MOD) stack rate.

Mahagenco had tough competition in the field of Power Generation with private sector entity such as Reliance, Adani, Ratanindia etc. However, Mahagenco with its adoptive, evolution & constructive nature has becomes no.1 State Power Generation entity.

Day-by-day the generation capacities of both Mahagenco and private entities have been raised. To diversify power portfolio, Mahagenco started its solar power projects. Also for efficiency enhancement Renovation and Modernisation (R & M) of unit 6 Koradi has executed successfully. As per environment and governing norms decommissioning of old and inefficient units such as 4X120 MW Koradi TPS, 2 X210 MW CSTPS and 62.5 MW BTPS were carried out. The only efficient and low cost units were operated and scheduled for generation. It's said that “Either way, the past is in the past. Take what you can from it and if doesn't serve you well, then acknowledge that more on”.

**MAHAGENCO – Today**

Mahagenco has the highest overall generation capacity and the highest thermal installed capacity amongst all the State power generation utilities in India. In terms of installed capacity, it is the second highest generation company after National Thermal Power Corporation Limited (NTPC). Mahagenco is the only State Utility having a very well balanced generation portfolio involving thermal, hydro & gas stations along with solar power plant. The first 500 MW plant to be installed in any State Utility belongs to Maharashtra. Mahagenco constitutes major portion of the total installed electricity generation capacity in India. In line with Government mission to diversify energy portfolio & responsible power generator to meet future energy needs of the Maharashtra State, Mahagenco has undertaken/proposed installation of Coal based power projects based on efficient super critical technology which also replace old capacities of Mahagenco. Also, environment friendly coal pipe conveyor projects are under implementation for Koradi and Khaperkheda TPS for transportation of coal from nearby mines of power stations.

Mahagenco is facing Power Generation issues mainly due to Fossil fuel derived energy generation. Thermal power based on fossil fuel such as coal, natural gas accounts for major contribution of generation. Moreover, the majority of plants of Mahagenco are old and deteriorating day by day. Higher Cost of Fuel landed cost and degradation of coal CV due to transportation; stacking and other unavoidable reason are mainly affecting power generation.

Also company have to look for coal mines overseas and source more expensive imports to meet requirement during peak load seasons. During rainy season, frequent technical problems developed due to wet coal results in fluctuation in generation and generation loss. At Coal Mines end due to rainy condition, the excavation / production gets hamper. Also transit loss due to roadways and railways is area of concern. All said factors affect generating units a lot.

During summer, Water scarcity/level becomes critical issue to run/operate power stations specifically CSTPS and Parli units' generation are most affected. Mahagenco has faced unit withdrawal due to water scarcity. However for Koradi and Khaperkheda TPS, Mahagenco has taken a step forward. Mahagenco has installed its sewage treatment plant which provides ample water to Koradi and Khaperkheda TPS from Nagpur Municipal Corporation Bhandewadi Plant. Also Water Pipeline has erected from Bhanegaon Mines to Khaperkheda TPS to utilise excess Mine water and to avoid water scarcity in future.

Ash generation is By-product of thermal power plant. This generated ash affects environment badly, however proper ash utilisation may generates revenue and create Ecofriendly ambience in vicinity of generating stations. Mahagenco intends 100% utilization of fly ash in accordance with MoEF notifications. For capacity building for eco-friendly management, value addition and utilization of fly ash, dissemination of information through training, technical forums and workshops with development of wide network of technology delivery mechanism are carried out. Mahagenco has established new cell "Mahagams" to facilitate utilization of ash through production of fly ash bricks, cement manufacturing through Joint Venture route.

Mahagenco undergoes its Environmental based project by tree plantation in the vicinity of thermal power plants, Ash utilisation cluster development, avoiding ash water ingress in river. Mahagenco also provide basic amenities to villages nearby power station zone in socially responsible manner. A huge labour force required for day to day and overhaul works at generating stations which provide employment to labours and has enhanced their livelihood.

Today, Mahagenco is facing commercial loss due to non-availability or loadability of the units. The same commercial loss is at Mahadiscom end. Due to theft of electricity, deficiencies in metering, etc. which result in cash flow problem at distribution end. These issues have resulted in the outstanding dues of Mahadiscom Company toward Generation Company, which deadly affect timely implementation of Mahagenco schemes and execution of Operation & Maintenance works.

The Mahagenco power generation business is governed by MERC. The MERC norms are based on plant parameter such as Plant Availability, Auxiliary Power Consumption (APC), Transit loss (TL), Specific Oil Consumption (SOC), Heat rate, Return on Equity (RoE), Mean time between failure (MTBF).Also at generating station end technical issues have risen such boiler tube leakages, turbine vibrations, loadability which affects smooth running of plants. Even though Mahagenco is generating adequate power at sustainable basis but the financial position is not up to the mark, which is the major concern for Tomorrow.

## MAHAGENCO – Tomorrow

Due to COVID pandemic, the energy sector was severely affected by repeated lockdowns in 2020, with slowed, trade and economic activity across the world has pushed down energy use. However, the forecast in upcoming period, such as the increase in industrial operations and several government initiatives to provide electricity to all people in the country are likely to drive the India power sector market. The increasing share of renewable energy in the total energy generation is expected to restrain the India thermal power plant market As per recent MERC norms and amendments in multi-year tariff order about Deviation settlement mechanism (DSM), Free Governing mode of operation (FGMO) and Restricted Governing mode of operation (RGMO), grid frequency based power generation requires at station/unit level. For such flexible demand flexible supply need to be established in short span i.e. Ramp up /Ramp down timing. For this transformation, we must be well prepared. The supply demand power scenario needs to be analysed well.

Accordingly, technical upgradation in the system to ensure unit reliability and loadability need to be incorporated. As the installed capacity of each unit is raised to 500/660 MW, sudden breakdown of unit makes the sudden shortfall of power and effects on grid stability. Hence to ensure unit healthiness capital replacement of major component and technical up gradation need to be done on war footing. New and efficient technologies like supercritical and ultra-supercritical coal power plants, installation of Flue gas De-sulfurization (FGD) which will reduce the amount of pollution and are expected to replace the aging power plants are likely to create several opportunities for the Mahagenco Thermal Power plant market in the future.

Mahagenco has to drastically evolve as the world transitions towards a low-carbon future. Variable renewables like solar and wind will increasingly become the foundation of low-carbon electricity generation. One should not ignore impact of carbon foot print and should adhere with government environmental policy. Recently our Hon'ble CMD has promoted Reduce, Reuse and Recycle (3R) Principle to educate people about the environment and waste management. This is the need of future/tomorrow. Cost reductions in renewable energy (RE) are driving rapid deployment and are encouraging both power system and independence. The renewable power sources require electricity systems to be flexible enough to adapt to shifts in supply. New technologies need to be incorporated– such as energy storage, biomass, carbon capture, clean fuels which will play an increased role in providing this flexibility.

In light of these trends, the question is no longer whether Mahagenco will be transformed, but rather how these transformations will occur. Adaptive, reconstructive, and evolutionary are three significant approaches in transformation and sustainability of any organisation. Some major changes being proposed by draft Electricity (Amendment) Bill, 2020, includes the constitution of the Electricity Contracts Enforcement Authority, the appointment of distribution sub-franchisees, development of an exhaustive National Renewable Energy Policy, and rationalisation of tariffs, among others. Indian government's Power for all vision, aims to provide access to affordable, reliable, sustainable and modern energy. In order to achieve this mission, the government may make certain amendments to the Electricity Act 2003 and Mahagenco need to be evolved accordingly.

The Manpower is soul of any organisation. The integrity and perseverance among staff for well being of organisation will ensure sustainability of organisation. To enhance technical competitiveness and skill up-gradation motivation and training modules need to be developed. On the principle of Hon'ble Director on "My Mahagenco - My Contribution" program, goals are to be set and monitored periodically. The innovative and out of box suggestions from local management are needed to be cherished. For any organisation development quality product is of utmost important. The quality training with skill up-gradation needs to be incorporated.

At last, as per Japanese word Kai-zen (Change for better) or continuous improvement is the only key of success for any organisation. uTomorrow's power generation systems will look very different from todays, and Mahagenco need to be more sophisticated in how to plan for a secure power generating system. Mahagenco needs assessments of system adequacy, need to innovate and evolve and allow affordable and interrupted electricity supply during upcoming energy transitions.

**"The past is Lesson,**
**The present is Engine**
**&**
**The future is Motivation"**

******

## ऊर्जानगरच्या श्रीगुरुदेव सेवा महिला व पुरुष भजन मंडळाची राज्यस्तरीय स्पर्धेकरिता निवड

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ गट कार्यालय ललित कला भवन चंद्रपूर येथे २०२३ ची वर्धा चंद्रपूर व गडचिरोली या तीन जिल्ह्याची गटस्तरीय पुरुष व महिला भजन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ऊर्जानगर वसाहतीतील कामगार कल्याण केंद्र ऊर्जानगरतर्फे श्रीगुरुदेव सेवा मधील दहा महिला भजन मंडळांनी तर नऊ पुरुष भजन मंडळांनी सहभाग घेतला. या स्पर्धेत कामगार कल्याण केंद्र ऊर्जानगरने महिला भजन मंडळाला स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. सोबतच उत्कृष्ट ताल संचालन प्रथम क्रमांक पटकावला. उत्कृष्ट गायिकेचा तृतीय क्रमांक सौ. शोभना शेख यांना मिळाला तसेच कामगार कल्याण केंद्र ऊर्जानगरतर्फे पुरुष भजन मंडळाने सहभाग घेतला होता. या स्पर्धेत कामगार कल्याण केंद्र ऊर्जानगरच्या पुरुष भजन मंडळाला स्पर्धेतील प्रथम पारितोषिक मिळाले सोबतच ताल संचालनाचे प्रथम पारितोषिक मिळाले आणि उत्कृष्ट हार्मोनियम वादकचा तृतीय क्रमांक श्री. राजेंद्र पोईनकर, उत्कृष्ट तबला वादक द्वितीय क्रमांक श्री. प्रशांत दुर्गे तसेच उत्कृष्ट द्वितीय गायक श्री. सदाशिव आघाव यांना मिळाला.

यावेळी महिला संघामध्ये मुख्य गायिका शोभना शेख, सहगायिका मनिषा दुर्गे, सुषमा उगे, रुपाली चहानकर, मालू कोंडेकर, मुक्ता पोईनकर, चंदा बावणे, ज्योत्स्ना बावणे, शितल मेश्राम, प्रणिता चौहान यांनी सहभाग घेतला. तसेच पुरुष संघामध्ये हार्मोनियम वादक श्री. राजेंद्र पोईनकर, तबलावादक श्री. प्रशांत दुर्गे, मुख्य गायक श्री. सदाशिव आघाव, सहगायक सर्वश्री. गणेश लहाने, देवराव कोंडेकर, शंकर दरेकर, गजेन्द्र पाटोळे, मारोती पिदूरकर, बंडू कुळमेथे, हेमंत झाडे, तन्मय चहानकर, नानाजी बावणे यांनी सहभाग घेतला.

या दोन्हीही भजन गटांचे परीक्षण विद्या पुराणकर, कमल येरगुडे व किसन पोडे यांनी केले तर स्मिता सुतवणे विभाग नियंत्रक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चंद्रपूर, गोपाल सुतवणे, कामगार नेते तथा उपाध्यक्ष राज्य गुणवंत कामगार असोसिएशन श्री. नरेंद्र रहाटे, श्री. रामेश्वर अळणे कामगार कल्याण अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आले.

श्रीगुरुदेव सेवा भजन मंडळाने मिळविल्या यशाबद्दल चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार, उपमुख्य अभियंता सर्वश्री. श्याम राठोड, राजूरकर, भूषण शिंदे, रविंद्र चौधरी व वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी तसेच गट कार्यालयाचे कामगार कल्याण मंडळाचे कल्याण अधिकारी श्री. रामेश्वर अळणे तसेच ऊर्जानगरच्या श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी व सदस्य, कामगार कल्याण केंद्राच्या प्रभारी संचालिका मोहना खोब्रागडे तथा उर्जानगरवासियांनी अभिनंदन करून पुढील राज्यस्तरीय स्पर्धेकरिता शुभेच्छा दिल्या.

## महानिर्मितीचे हरित ऊर्जा क्षेत्रात दमदार पाऊल

**महाजनको रिन्युएबल एनर्जी लिमिटेड (MREL), होमीहायड्रोजन व h2e यांच्यात तांत्रिक सहकार्य व व्यवसायवृद्धीसाठी 'कार्यकक्षा करार (Framework Agreement)'**

भारत सरकारच्या धोरणानुसार सन २०३० पर्यंत ५०० गिगावॉट नवीकरणीय ऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. सोबतच सन २०४७ पर्यंत ऊर्जा स्वयंपूर्णता व २०७० पर्यत 'शून्य कार्बन उत्सर्जनाचे' लक्ष निर्धारित करण्यात आले आहे.

या उद्दिष्टपूर्तीसाठी नूतनशील ऊर्जानिर्मितीत सातत्याने वाढ होणे अपेक्षित असल्याने या पार्श्वभूमीवर 'हरित हायड्रोजन' कडे पर्यायी इंधन म्हणून पाहिले जात आहे. हायड्रोजन व हायड्रोजनजन्य उत्पादने जसे की अमोनिया, इथेनॉल, मिथेनॉल इत्यादींचा वापर करून कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे शक्य आहे. आता महानिर्मितीच्या मालकीची उप कंपनी महाजेनको रिनयूएबल एनर्जी लिमिटेड पूर्ण क्षमतेने या क्षेत्रात भरीव कामगिरी करणार आहे. त्यादृष्टीने हरित ऊर्जा क्षेत्रात महानिर्मितीने दमदार पाऊल टाकले आहे हे विशेष.

भविष्यातील निरनिराळ्या गरजांचा वेध घेऊन महाजनको रिन्युएबल एनर्जी लिमिटेड (MREL), होमीहायड्रोजन व h2e या ३ कंपन्यांनी तांत्रिक सहकार्य व व्यवसायवृद्धीसाठी एकत्र येऊन 'कार्यकक्षा करार' (Framework Agreement) वर ८ जानेवारी २०२४ रोजी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. या माध्यमातून पहिल्या टप्प्यात उरण वायुविद्युत केंद्रात नैसर्गिक वायू व हायड्रोजन यांचे इष्टतम मिश्रण (blending) करून संच भारांक व वीजनिर्मिती वाढविण्याचा अभ्यास केला जाणार आहे.

महाजेनको रिन्युएबल एनर्जी लिमिटेडतर्फे व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे तर श्री. सिद्धार्थ मयूर, संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक, h2e पॉवर सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड, श्री. चंद्रशेखर गोखले, श्री. आदित्य गोखले भागीदार तसेच डॉ. प्रशांत कामत, संचालक होमीहायड्रोजन प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (खनिकर्म) मा.डॉ. धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक सर्वश्री. पंकज नागदेवते, राजेश पाटील, नितीन चांदूरकर, कंपनी सचिव श्री. राहुल दुबे, मुख्य अभियंते श्री. संजय कुऱ्हाडे, श्री. अजय बामणे, श्री. दत्तात्रय साळुंखे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा) श्री. राजीव मालेवार तसेच मुख्य महाव्यवस्थापक (एम.आर.ई.एल.) श्री. अभिजीत कुलकर्णी, महाव्यवस्थापक (एम.आर.ई.एल.) श्री. हर्षल भास्करे प्रामुख्याने उपस्थित होते.

## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ४०व्या वर्धापन दिनानिमित्त "हॅप्पी स्ट्रीट - मामाचं गांव"

### "मोठ्यांना बालपणीचा आनंद, तर लहानांना निसर्गमय वातावरण लाभलं... मराठमोळ्या संस्कृतीचं दर्शन, लुप्त झालेले खेळ आणि अभिनव खाद्यपदार्थाने उदरतृप्ती... झुंबा नृत्यावर हजारो थिरकले..."

उन्हाळ्यात शाळेला सुट्ट्या लागल्या कि मामाच्या गावाला जाऊन धमाल मस्ती करायची, गावाकडील निसर्गरम्य मातीशी नातं जोडीत, नात्यांची वीण अधिक घट्ट करायची अशी आपली मराठमोळी संस्कृती. मात्र धकाधकीच्या जीवनात ही जागा टी.व्ही., मोबाईल, फेसबुक, व्हॉट्सॲप सारख्या आभासी दुनियेने व्यापल्याने जीवनाचा खरा-खुरा आनंदच दूर झाला. मानवी जीवन तांत्रिक झाले, यातून उदयास आलेली शहरी संकल्पना म्हणजे "हॅप्पी स्ट्रीट". मामाच्या गावाला न जाता सुट्टीच्या दिवशी सकाळच्या प्रहरी मुख्य रस्त्यावरील रहदारी काही वेळापुरता इतरत्र वळवून त्याठिकाणी मनसोक्त खेळ, धमाल मस्ती करायची, हा यामागचा उद्देश.

महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त ऊर्जानगर वसाहतीतील अधिकारी मनोरंजन केंद्रालगतच्या सभोवताली रस्त्यावर "हॅप्पी स्ट्रीट - मामाचं गाव" साकारण्यात आले. वीज केंद्राच्या अधिकारी-कर्मचारी व कुटुंबियांनी यामध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला. विशेषत: सुमारे ८ हजार व्यक्तींनी या कार्यक्रमाचा भरपूर आनंद घेतला.

हिरव्यागार वृक्षांच्या सावलीत, रंगबिरंगी फुगे, झेंडे, तोरणांनी रस्ते आकर्षक सजले होते. तर वयाचे भान विसरून, आपलं-परकं विसरून, प्रत्येकाने बालपणीच्या खेळाचा निखळ आनंद लुटला. नेहमी चारचाकी चालविणारा बैलबंडी चालवित होता तर माता-भगिनी आपल्या मुलांना विसरून टिक्कर बिल्ला, लगोरी, दोरीवरच्या उड्या, झुले-पाळणे, मामाचं पत्र हरवलं इत्यादी खेळांचा मनसोक्त आनंद घेत होत्या. चार तास कसे संपले कोणालाच कळाले नाही. घराकडे परतीची पावले वळायला तयार नव्हती, एवढा जीव "हॅप्पी स्ट्रीट - मामाच्या गावा" ने लावला. एरव्ही घरात बोलायला वेळ नसणारी पालक मंडळी "हॅप्पी स्ट्रीट" वर एकमेकांशी खुलून बोलताना दिसली तर मुले-मुली देखील आपले आई-वडील टायर, लोखंडी रिंग चालवित धावत असल्याचे पाहून आश्चर्य चकित झाले. जात, पात, धर्म, वय, पद, गर्व दूर सारून प्रत्येक व्यक्ती स्वत:ला व्यक्त करीत नि:स्वार्थपणे सहभागी झाल्याचे दिसून येत होते. "हॅप्पी स्ट्रीट" च्या माध्यमातून अख्खं मामाचं गावच ऊर्जानगरात साकारण्यात आले होते. वडाच्या झाडालगत झोपडी निर्माण करुन गावाच्या वातावरणात अधिकच भर पडली.

अखंडित वीज उत्पादनाचे राष्ट्रीय कार्य करणाऱ्या चंद्रपूर वीज केंद्राच्या अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी "हॅप्पी स्ट्रीट" हा उत्तम पर्याय असल्याचे मुख्य अभियंता मा.श्री. गिरीश कुमरवार म्हणाले. या कौटुंबिक कार्यक्रमाला अभूतपूर्व प्रतिसाद लाभला त्याचे कारण लहान मुला-मुलींसाठी विविध खेळ, बक्षिसे, बुढ्ढी का बाल (शुगर कँन्डी), जादूचे प्रयोग, बंदुकीच्या गोळीने फुगे फोडणे, दोरीचे झुले, बैलगाडी, गाय, बॉल गेम्स, सापशिडी, टायर, लोखंडी रिंग चालविणे, दोरीवरच्या उड्या, लहान सायकल, स्केटिंग, रांगोळी, चित्रकला तर तरुणी व महिलांसाठी मेहंदी, टॅटू, बॅडमिंटन, फुटबॉल, लगोरी, दोरीवरच्या उड्या, कंबर रिंग, प्लेट थ्रो, रबर रिंग, पुरुष वर्गासाठी फुटबॉल, प्लेट थ्रो, बॅडमिंटन, रेखाचित्र, कंचे, भवरे, ३६० डिग्री सेल्फी पॉईंट इत्यादी उपलब्ध होते. फूड झोनमध्ये इंडियन कॉफी हाऊसचे खाद्यपदार्थ, आईस्क्रीम, समोसा, आलूवडा, चहा, ,ढोकळा, मोमो, मोड कडधान्ये, भेळ, चना मसाला, पाणीपुरी, नारळपाणी, अश्या नानाविध खाद्यपदार्थांची रेलचेल होती. ज्येष्ठ नागरिकांसाठी योगासन,बुद्धिबळ, कॅरम, वृत्तपत्र, मासिके वाचन व झुम्बा डान्स थरार तर दुसऱ्या मंचावर आदिवासी गोंडी नृत्य ज्यामध्ये गाणे, नृत्य इत्यादी कला अनेकांनी सादर केल्या.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार यांच्या मार्गदर्शनाखाली "हॅप्पी स्ट्रीट" आयोजन समितीच्या सहकार्याने "हॅप्पी स्ट्रीट" (मामाचं गाव) कार्यक्रम अतिशय यशस्वीरित्या संपन्न झाला.

कार्यक्रमाला उप मुख्य अभियंते सर्वश्री. श्याम राठोड, अनिल पुनसे, प्रफुल्ल कुटेमाटे, डॉ. भूषण शिंदे, फनिंद्र नाखले, अधीक्षक अभियंते सर्वश्री. अशोक उमरे, डी.डब्ल्यू. सराग, डी.वाय.चौधरी, महेश ढोले, महेश पराते, राजेश डाखोळे, मनोज उमप, झिनत पठाण, सचिव श्री. रवींद्र चौधरी , सहसचिव राजेश आत्राम, श्री. दत्तात्रय पिंपळे, महाव्यवस्थापक श्री. बाहुबली डोडल, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते, उप महाव्यवस्थापक (मासं) हिना खय्याम, कल्याण अधिकारी श्री. दिलीप वंजारी, सहा कल्याण अधिकारी राणू कोपटे, वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. अनुराग शुक्ला, उप मुख्य अग्निशमन अधिकारी श्री. ज्ञानेश्वर ढूमने, विभाग प्रमुख, पुरुष-महिला मुले-मुली मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री. नरेंद्र रहाटे यांनी केले.

. कार्यक्रमाच्या यशस्वितेत "हॅप्पी स्ट्रीट" आयोजन समितीच्या पदाधिकारी व सदस्यांनी मोलाची भूमिका बजावली तसेच स्थापत्य, विद्युत, अग्निशमन, सुरक्षा तसेच सर्व विभागांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## राज्य शासनाच्या 'महासंकल्प रोजगार' अभियानाअंतर्गत महानिर्मितीद्वारे नियुक्ती पत्र वितरण समारंभ

**"भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी ऊर्जा विभागाला पूर्ण सहकार्य – उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**
**महासंकल्प रोजगार अभियानात महानिर्मितीकडून १०४२ उमेदवारांची निवड**
**श्रीमती. विजया बोरकर यांची महानिर्मितीच्या प्रथम महिला मुख्य अभियंता पदी सरळसेवा भरतीद्वारे निवड"**

राज्यात खात्रीशीर, दर्जेदार आणि अखंडित वीज पुरवठा करणे हे महाराष्ट्र राज्य वीज कंपनी समोरील आव्हान आहे. यासाठी पारंपरिक ऊर्जेसोबतच अपारंपरिक ऊर्जा निर्मिती वाढविण्यासाठी महाराष्ट्र तीनही वीज कंपन्यांना आवश्यक ती सर्व मदत आणि संसाधने राज्य शासन निश्चितपणे उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही उप मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ हजार रिक्त पदे भरणेबाबत, राज्य शासनाच्या 'महासंकल्प रोजगार' अभियानाअंतर्गत महानिर्मितीद्वारे सरळसेवा भरती प्रक्रियेत १२ प्रातिनिधिक उमेदवारांना नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आले. या समारंभात ते सह्याद्री अतिथीगृह येथे बोलत होते. कार्यक्रमाला प्रधान सचिव तथा महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. लोकेश चंद्र, उप मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीवकुमार, सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक मा.श्री. विश्वास पाठक उपस्थित होते.

महाराष्ट्रात युवकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी पहिल्या टप्प्यात ७५ हजार पदभरती करण्याचा शासनाने निर्धार केला आणि महानिर्मितीने पारदर्शकतेसह जलदगतीने मागील एक वर्षाच्या काळात विविध संवर्गातील १०४२ उमेदवारांची निवड केली ही निश्चितच अभिनंदनीय बाब आहे. शिवाय १५० उमेदवारांची निवड लवकरच करण्यात येणार आहे. पारदर्शक भरतीमुळे युवकांचा भरती प्रक्रियेवरचा विश्वास वाढतो, असे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. श्रीमती. विजया बोरकर यांची महानिर्मितीच्या प्रथम महिला मुख्य अभियंतापदी सरळसेवा भरतीद्वारे निवड झाल्याबद्दल त्यांचे आणि निवड झालेल्या सर्व उमेदवारांचे अभिनंदन करून त्यांना नवीन उत्साहाने काम करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

भारत विकसनशील आणि जलदगतीने आर्थिक विकास करणारे राष्ट्र आहे. या आर्थिक विकासाचा कणा ऊर्जा विभाग आहे. आगामी काळात ऊर्जेची मागणी वाढेल असा तज्ज्ञांचा अंदाज असल्याने ऊर्जा क्षेत्रासमोर अनेक आव्हाने आहेत. त्यासाठी तीनही कंपन्यांनी आपापल्यापरीने सक्षम होणे आवश्यक आहे. त्यासाठी सन २०३५ पर्यंतचा रोडमॅप तयार करण्याच्या सूचना ऊर्जा विभागाला दिल्या असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले. सौर कृषी वाहिनी योजनेमुळे सद्यस्थितीत आणि भविष्यातही मोठ्या प्रमाणात बदल होईल. पंप स्टोरेज, ग्रीन हायड्रोजनसारखे धोरण राज्याने तयार केले आहे असेही उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

प्रधान सचिव (ऊर्जा) मा.श्री. लोकेश चंद्र यांनी सांगितले की, ऊर्जा पुरवठ्यावर गुणवत्तापूर्ण जीवन,औद्योगिक आणि आर्थिक विकास अवलंबून आहे. महासंकल्प रोजगार अभियानांतर्गत ऊर्जा विभागातील तीनही कंपन्यांमध्ये लवकरच सुमारे १५ हजार भरती प्रक्रिया होणार आहे. त्यांनी मागील दीड वर्षाच्या कालखंडात ऊर्जा विभागाने घेतलेले महत्वपूर्ण निर्णय आणि विविध महत्वाकांक्षी योजनांची माहिती देत ऊर्जा विभागाच्या उल्लेखनीय कार्याची माहिती दिली.


प्रास्ताविकातून महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन यांनी सांगितले की, मानव संसाधन विभागाच्या दैनंदिन कामकाजाचे डिजिटल स्वरूपात रुपांतर करण्यात येणार असून त्याद्वारे बदली, बढती, टपाल, उच्च श्रेणी लाभ, गोपनीय अहवाल, ई–सेवा पुस्तिकेचा समावेश करण्यात येणार आहे . राज्यभरात महानिर्मितीचे एकूण ९ हजार ९१५ प्रकल्पग्रस्त असून त्यापैकी ६८१४ व्यक्तींना आतापर्यंत रोजगार देण्यात आला आहे. २ हजार १०३ पात्र प्रकल्पग्रस्तांना प्रगत कुशल योजनेअंतर्गत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

यावेळी उप मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते १२ उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आले, त्यात श्रीमती. विजया बोरकर (मुख्य अभियंता), श्री. राहुल नाळे (उप मुख्य अभियंता), सौ. अरुणा भेंडेकर (अधीक्षक अभियंता), श्री. जयदीप राठोड (लॅब केमिस्ट), श्री. अक्षय शिरसाट (सहाय्यक अभियंता), श्री. ज्ञानेश्वर कारंडे (सहाय्यक अभियंता), प्रकृती यादव (सहाय्यक अभियंता), श्री. प्रथमेश सोनजे (सहाय्यक अभियंता), श्री. सागर बागुल (कनिष्ठ अभियंता), श्री. मंगेश लाखे (कनिष्ठ अभियंता), श्री. तेजस काटे (कनिष्ठ अभियंता), श्री. वैभव सोनवणे (कनिष्ठ अभियंता) यांचा समावेश होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कल्पना साठे यांनी, तर आभार प्रदर्शन महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) डॉ. धनंजय सावळकर यांनी केले. याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक मा.श्री. बाळासाहेब थिटे, मा.श्री. संजय मारुडकर, मा.श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक डॉ.नितीन वाघ, श्री. पंकज नागदेवते, उप सचिव श्री. नारायण कराड, तसेच मुख्य अभियंते आणि अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आनंदाचे झाड

– आनंद आबाराव कोंत,
मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन),
सांघिक कार्यालय, मुंबई.



मला नेहमी वाटते की, आपण आनंदी होण्यासाठी काही कारण लागते किंवा खूप मोठे काही घडावे लागते असे अजिबात नाहीये. खूप छोट्या-छोट्या गोष्टी असतात ज्या आपल्याला नकळत आनंद देऊन जातात आणि आपण केलेली छोटीशी पण सकारात्मक कृती किती जणांना आनंद देऊन जाते याची आपण कल्पना सुद्धा करू शकत नाही. मानवाच्या जन्मासोबत सुख आणि दु:ख हातात हात घेऊन सोबत येत असतात, जसे सुख जास्त दिवस टिकत नाही तसे दु:ख-संकटे सुद्धा क्षणभंगुर असतात. आपण प्रत्येक घटनेकडे कसे बघतो यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात.

संकटे कितीही आणि कधीही येवो मात्र आपल्या मनात जर आनंदाचे झाड असेल तर प्रत्येक नकारात्मक गोष्टीवर विजय मिळवता येतो, असे माझे मत आहे. आनंद म्हणजे काय आणि तो कसा मिळवायचा? हे आजच्या धकाधकीच्या जीवनात सगळेजण विसरून गेले आहेत आणि त्यात कहर म्हणजे आज social media ने सगळ्यांना पार वेडे केले आहे. त्यातच आपला आनंद आहे असे वाटून लोकं मिळालेला वेळ फक्त social media वर घालवतात. त्यात वाईट नाहीये काही, पण त्यामुळे बाहेरचे जग विसरून गेल्यासारखे होत आहे. तर, आनंद कसा मिळवायचा हे कित्येक लोकांना माहित नसते आणि तेच त्यांच्या दु:खाचे कारणही असते. आनंद हा कुठे बाहेर मिळत नाही तो आपल्या आत असतो आणि आपण जसे त्याला खतपाणी घालणार तसे आनंदाचे झाड आपल्या मनात रुजणार.

मला झाडे, हिरवाई, वनराई खूप आवडते. उन्हाचा पूर्ण बहर असताना... पिवळाधमक बाहवाने बहरलेले झाड असो की, लालभडक फुललेला गुलमोहोर असो, त्या नको वाटणाऱ्या उन्हामध्ये सुद्धा मनात-डोळ्यांत इतका आनंद बहरतो, तो समोरच्याला सुद्धा आपला आनंद जाणवतो. पाऊस पडताना होणारा आवाज कोणत्याही संगीतापेक्षा जास्त मनमोहक असतो. चैत्रामध्ये बहरलेली विविध रंगीबेरंगी फुले पाहिली की, बालकवींची 'ती फुलराणी' कविता आठवते... मनात रुंजते...

हिरवे हिरवेगार गालिचे - हरित तृणाच्या मखमालीचे;
त्या सुंदर मखमालीवरती - फुलराणी ही खेळत होती.

आशाबाईंच्या आवाजातील 'मुझे जा ना कहो मेरी जा....' ही पहिली ओळ मनाला अस काही मंत्रमुग्ध करते की, पुढे पूर्ण गाणे संपेपर्यंत आपण स्वर्गीय आनंदात असतो... म्हणजे मी तरी असते. स्वर्गीय आनंद म्हणजे काय माहित नाही, पण जर असे काही असेल तर या आवाजात ती जादू आहे असे मला वाटते आणि माझ्या आनंदी आयुष्याचा हा आवाज खूप मोठा भाग आहे.

सुख आणि दु:खाच्या छायेमध्ये सुखाचा एक छोटासा कवडसा आपल्या मनात सतत येऊ द्यावा. हा छोटासा कवडसा दु:खातून आपल्याला मार्ग दाखवत असतो आणि खूप वेळेस हा मार्ग आपल्या आजूबाजूला असलेले सकारात्मक विचारांचे लोकं दाखवत असतात. असे लोकं आपल्या आयुष्यात असणे खुप गरजेचे आहे. काही लोक असतात जी कायम आनंदी असतात आणि आपल्या अस्तित्वाने सगळ्यांना आनंदी ठेवत असतात. आनंदी राहणं ही एक कला आहे, जी प्रत्येकाला जमतेच असं नाही. पण आयुष्यात प्रत्येक गोष्टीत समाधान मानून आनंदी राहणाऱ्या माणसांना जगायला जास्त चांगलं बळ मिळतं. काही जणं अगदी लहान-लहान गोष्टीतूनही आनंद शोधत असतात.

कधी प्रचंड उकाड्यात आलेली पावसाची छोटीशी सरही आनंद देते तर कधी सकाळीच आवडीच्या माणसांकडून मिळणारी कॉम्प्लिमेंट आपला दिवस अप्रतिम करते. अचानक कधी बॉसने केलेली प्रशंसाही मनाला समाधान देऊन जाते किंवा अचानक तुमची सुट्टी बॉसने पास केली की, आनंद गगनात मावत नाही. कारण काहीही असो, आवश्यक आहे ते आनंदी राहणं आणि जरा मनाचे डोळे उघडे ठेऊन बघितले तर असे आनंदाचे झाड आपल्या आसपास नक्कीच दिसतील. मलासुद्धा असे आनंदाचे झाड भेटले आहेत ज्यांच्यामुळे माझ्यात झालेला सकारात्मक बदल मला जाणवतो.

पुण्यात एका pharma कंपनीमध्ये नोकरी करत असताना माझे बॉस... अतिशय उत्साही व्यक्तिमत्व, सतत आनंदी आणि नावातच 'आनंद' उच्चपदस्थ अधिकारी, सकारात्मक वाचन करणारे, जे वाचले आहे ते प्रत्यक्षात implement करणारे, सर्व कर्मचाऱ्यांच्या भावना जपणारे, नवीन काही शिकण्यासाठी सतत प्रोत्साहन देणारे, ऑफिसमध्ये वेगवेगळ्या विषयांवर ट्रेनिंग-उपक्रम राबविणारे, सगळ्यांनी चांगले वाचावे म्हणून पुस्तके उपलब्ध करून देणारे आणि जोडीला अध्यात्माची साथ. कधीही भेटा, सर नेहमी हसतमुख असतात. सकारात्मक ऊर्जा जाणवते आपल्याला. त्यांना भेटले की, जाणवते 'आनंदाचे झाड' ते हेच...

'माया' माझी मैत्रीण, बालपणीची... नावाप्रमाणे जादू असणारी. आयुष्यात चढउतार आले, पण आजही तिला कधीही भेटा वा फोनवर बोला, नेहमी एक प्रसन्नचित्त ऊर्जा जाणवते, खूप अभिमान वाटतो तिचा. निशिगंध जसा त्याच्या रंगाने रूपाने मोहून टाकतो, तसाच त्याचा मंद सुगंध मन मोहून टाकतो, अगदी तसेच मायाला भेटल्यावर जाणवते. ती माझे 'आनंदाचे झाड' नक्कीच आहे.

कधी–कधी प्रत्यक्ष न भेटताही काही जण आपले आयुष्य आनंदी करून जातात. सुखापेक्षा आपल्या एकटेपणात आपल्या सोबत असतात, नकारात्मकता दूर करणारे दोन शब्द खूप ऊर्जा देऊन जातात. रातराणीचा सुगंध आपल्या अवतीभोवती सतत दरवळत असतो आणि असेच अदृश्य 'आनंदाचे झाड' प्रत्येकाच्या आयुष्यात असतेच.

मराठी साहित्यात अनेक लेखक होऊन गेले. त्यापैकी नेहमी साहित्यामध्ये घेतलं जाणारं नाव म्हणजे व.पु. काळे. आयुष्यामध्ये जेव्हा जेव्हा खचायला होतं, तेव्हा जर तुम्ही लेखक व.पु. काळे विचार वाचले, तर तुमच्या मनामध्ये पुन्हा एक नवी उमेद निर्माण होते. 'वपुर्झा' या पुस्तकाचे कोणतेही पान वाचा खूप ऊर्जा मिळते किंवा 'सखी' हे पुस्तक वाचा प्रत्येक कथा वेगळी, एकही खूप काही शिकवून जाणारी आहे.

तुमच्या मनातील 'आनंदाचे झाड' कसे बहरलेले ठेवायचे हे पूर्णपणे तुमच्या विचारांवर, तुमच्या संगतीवर, तुमच्या आवडीनिवडीवर अवलंबून असते.

**" देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे,**
**घेणाऱ्याने घेता घेता, देणाऱ्याचे हात घ्यावे..."**

आनंद... जितका द्याल तितका कमी आहे.

******

## सेवानिवृत्ती समारोहात सामुदायिक प्रार्थनेचे आयोजन
## ऊर्जानगरच्या भजनकर परिवाराचा स्तुत्य उपक्रम

महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, ऊर्जानगर येथून ३१ वर्षाची प्रदीर्घ सेवा देऊन सेवानिवृत्त झालेले ऊर्जानगर वसाहतीतील गुरुदेव सेवक श्री. राजीराम मोतीराम भजनकर यांनी आपल्या स्नेहबंध सभागृह येथे घेण्यात आलेल्या सेवानिवृत्ती समारोह कार्यक्रमात श्रीगुरुदेव सेवा मंडळ ऊर्जानगर वसाहतच्या वतीने कार्यक्रमाच्या सुरुवातीला वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची सामुदायिक प्रार्थना घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली हा स्तुत्य उपक्रम राबवून गुरुदेव सेवा मंडळाचा प्रचार प्रसार करण्यास हातभार लावून समाजात आगळावेगळा उपक्रम राबविण्याचा भजनकर परिवाराकडून प्रयत्न करण्यात आला.

राजीराम भजनकर हे अत्यंत साधी राहणी उच्च विचारसरणीचे व्यक्तिमत्त्व असून अल्कोहोलिक ॲनानिमस (AA) या विश्वपातळीच्या सामाजिक संस्थेत व्यसनमुक्तीचे कार्य करत असून श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे आजीवन सदस्य आहेत. त्यांचा मध्यंतरीचा व्यसनाचा काळ कठीण परिस्थितीतून काढून ते आता व्यसनमुक्तीचे जीवन जगत असून नेहमी आपला समाज व व्यक्ती व्यसनमुक्त कसे होतील याकडे विशेष प्रयत्न करीत आहे.

स्नेहबंध सभागृह येथे झालेल्या सामुदायिक प्रार्थनेला श्री गुरुदेव सेवा मंडळाचे पदाधिकारी तसेच भजनकर परिवारातील सदस्य, मित्र परिवार व श्रीगुरुदेव सेवा मंडळ ऊर्जानगरचे सदस्यगण आणि ऊर्जानगरवासीयांची उपस्थिती होती.

## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे
## कार्बन उत्सर्जन शून्यतेच्या दिशेने पाऊल

मानवीय हस्तक्षेपांमुळे निर्माण झालेल्या हवामान बदलाच्या धोक्याच्या संकटाने गेल्या काही दशकांपासून जगाचे लक्ष वेधले आहे. तथापि, कार्बन शोषणे आणि साठवणूक पद्धती तंत्रज्ञान विकसित करताना अनेक अडचणी होत्या आणि ही बाब आर्थिकदृष्ट्या परवडणारी नव्हती तसेच त्याचे दूरगामी परिणाम देखील अस्पष्ट होते.

मात्र आता, एकपेशीय वनस्पती (अलगी/शेवाळ) वापरून कार्बन डाय ऑक्साईड ($CO_2$) चे जैविक कॅप्चर हे विविध औद्योगिक प्रक्रियांमधून आणि मानववंशजन्य स्त्रोतांमधून निर्माण होणाऱ्या अतिरिक्त $CO_2$ चा पुनर्वापर करण्यासाठी एक आकर्षक माध्यम मानले जाते. शिवाय, एकपेशीय वनस्पतींद्वारे, $CO_2$ कॅप्चर केले जाऊ शकते आणि जैवविविधतेमध्ये पुनर्वापर केले जाऊ शकते, ज्याचा वापर जैव ऊर्जा (बायोएनर्जी) आणि इतर मूल्यवर्धित उत्पादनांच्या उत्पादनासाठी लिपिड तयार करण्यासाठी कार्बन स्त्रोत म्हणून केला जाऊ शकतो. भविष्यात, ही उत्पादने थेट किंवा अप्रत्यक्षपणे अन्न पुरवठा साखळी आणि पिकांवर परिणाम न करता पेट्रोलियम–साधित/पूरक वाहतूक इंधने शाश्वतपणे बदलतील अशी अपेक्षा आहे.

या पार्श्वभूमीवर चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, CSIR-NEERI यांनी संयुक्त करार केला असून चंद्रपूर वीज केंद्रात बंद लूप प्रकाश उत्प्रेरक क्रियेद्वारे (अलगी/शेवाळ) साठवणूक करण्याच्या संदर्भात पुढाकार घेतला आहे. कार्बन न्यूट्रेलिटी, कार्बन क्रेडिट्स याविषयी संयुक्त राष्ट्रांच्या वचनबद्धतेनुसार कार्बन फूट प्रिंट्सचा अंदाज आणि त्याचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राने हाती घेतलेला हा पहिलाच प्रकल्प आहे. या प्रकल्पाला भारत सरकारच्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेने (CSIR) निधी दिला आहे.

दिनांक २२.११.२०२३ रोजी, अधिकृतपणे या करारनाम्यावर (MOA) श्री. गिरीश कुमरवार, मुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र आणि डॉ. अमित बाफना, प्रमुख शास्त्रज्ञ CSIR-NEERI, नागपूर यांनी डॉ. विश्वजीत ठाकूर प्रमुख वैज्ञानिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी केली आहे. श्री. तानाजी यादव, प्रादेशिक अधिकारी चंद्रपूर प्रामुख्याने उपस्थित होते.

या प्रसंगी चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे उप मुख्य अभियंता श्री. श्याम राठोड, डॉ. भूषण शिंदे, श्री. विराज चौधरी, श्री. अनिल पुनसे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उप प्रादेशिक अधिकारी श्री. उमाशंकर भादुले, क्षेत्र अधिकारी श्री. सुरेंद्र कारनकर, श्रीमती पूनम पोयरेवार उपस्थित होते. पर्यावरण विभागाचे अधिकारी श्री. दत्तात्रय पिंपळे (अधीक्षक अभियंता), डॉ. विजय येउल, (कार्यकारी रसायनशास्त्रज्ञ) आणि श्रीमती माया डफाडे (वरिष्ठ, रसायनशास्त्रज्ञ) यांनी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केले.

राष्ट्रांची कार्बन उत्सर्जन शून्यतेसाठी वचनबद्धता पूर्ण करण्याकरीता एक उदात्त हेतू साध्य करण्याची ही अद्‌भुत संधी दिल्याबद्दल चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र हे भारत सरकारच्या वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे (CSIR) आभारी आहे. तसेच राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान (CSIR-NEERI), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांच्या सहकार्याने मार्गक्रमण करेल. महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.पी. अन्बलगन, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (खनिकर्म) डॉ. धनंजय सावळकर, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक (सं. व सु. – २) श्री. पंकज सपाटे, कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षितता) डॉ. नितीन वाघ आणि कार्यकारी संचालक (सं. व सु. – १) श्री. राजेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रपूर वीज केंद्र या क्षेत्रात यशस्वी वाटचाल करीत आहे, हे विशेष.

## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ४०व्या वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीर

२९२० मेगावॅट स्थापित क्षमता असलेले महानिर्मितीचे चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र वीज निर्मिती क्षेत्रात नेहमीच उल्लेखनीय कामगिरी करीत असून राज्याला अखंडीत वीज उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहे.

चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून शनिवार दि. १३ जानेवारी २०२४ रोजी भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले व त्यात ६७७ व्यक्तींनी रक्तदान केले.

महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांच्या आवाहनास तसेच संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, संचालक (खनिकर्म) मा. डॉ. धनंजय सावळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी संचालक (सं. व सु.–२) मा.श्री. पंकज सपाटे तथा मुख्य अभियंता मा.श्री. गिरीश कुमरवार यांच्या नेतृत्वात महारक्तदान शिबिराकरिता स्थानिक पातळीवर आयोजन समिती गठीत करण्यात आली होती.

रक्तदान शिबिराकरिता वर्धापन दिन समितीचे सचिव श्री. रवींद्र चौधरी, संयुक्त सचिव श्री. राजेश आत्राम तसेच उपमुख्य अभियंते सर्वश्री. श्याम राठोड, अनिल पुनसे, डॉ. भूषण शिंदे, प्रफुल्ल कुटेमाटे, फनिंद्र नाखले, मिलिंद रामटेके, कल्याण अधिकारी दिलीप वंजारी, डॉ. संगिता बोदलकर वैद्यकीय अधीक्षक, महाव्यवस्थापक वित्त व लेखा बाहुबली डोडल यांनी व इतर विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कामगार आणि सर्व संघटनाचे प्रतिनिधी तसेच सामाजिक संस्था यांनी अथक परिश्रम घेवून विक्रमी महारक्तदान शिबीर यशस्वी केले.

या रक्तदान शिबिरास विविध कर्मचारी/कामगार संघटना, सामाजिक संस्था प्रतिनिधी, प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी यांचे देखील मोलाचे विशेष सहकार्य लाभले.

या भव्य रक्तदान शिबिरात चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्रातील कार्यरत सर्व अधिकारी, कर्मचारी, प्रगत कुशल प्रशिक्षणार्थी, शिकाऊ उमेदवार, कंत्राटदार, कंत्राटी कामगार, सी.आय.एस.एफ., एम.एस.एफ कर्मचारी यांनी रक्तदान करुन भरघोस प्रतिसाद दिला. शासकीय रक्तपेढी चंद्रपूर, मेडिकल–मेयो रक्तपेढी नागपूर यांनी रक्त संकलन करण्यास यथोचित सहकार्य केल्याचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार यांनी सांगितले.

## महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे हस्ते प्रकाशगड मुख्यालयात प्रजासत्ताक दिन ध्वजारोहण

भारतीय प्रजासत्ताकाचा अमृत महोत्सव महानिर्मिती–महावितरण प्रकाशगड मुख्यालयात उत्साहात साजरा करण्यात आला. महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ.पी. अन्बलगन यांच्या हस्ते प्रकाशगड मुख्यालयात ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, संचालक मा.सौ. स्वाती व्यवहारे, महावितरण संचालक (मासं) मा.श्री. अरविंद भादीकर, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था–१) श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (पर्यावरण व सुरक्षा) डॉ. नितीन वाघ, कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन व सुसंवाद) श्री. पंकज नागदेवते, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नितीन चांदूरकर, मुख्य अभियंते सर्वश्री. सुनील सोनपेठकर, दत्तात्रय साळुंखे, संजय कुऱ्हाडे, प्रसन्न कोटेचा, अभिजित कुलकर्णी, राहुल नाळे, राकेश जनबंधु, कंपनी सचिव राहुल दुबे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजूरकर (महानिर्मिती), श्री. संजय ढोके (महावितरण) प्रामुख्याने उपस्थित होते.

कार्यक्रमाला विशेषत: मराविमं सूत्रधारी कंपनी, महानिर्मिती, महावितरण आणि महापारेषणचे वरिष्ठ अधिकारी विभाग प्रमुख व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. महानिर्मिती–महावितरण स्थापत्य विभाग, सुरक्षा विभाग, राजशिष्टाचार विभाग आणि जनसंपर्क विभागाचे विशेष सहकार्य लाभले.

## KGSC ACHIEVEMENTS

By Generating 2,07,854 MUs since commissioning, KGSC has crossed a mile stone celebrating its diamond jubilee in year 2022-23.

The highest generation achieved during last 10 years is 3,829 MUs in year 2013-14

During nationwide coal shortage in year 2021-22, KGSC has achieved Generation of 3,643 MUs and played vital role in grid stabilization.

KGSC has achieved last year`s (2022-23) Generation 236 MUs more than target given by CEA i.e. 3,476 Mus against CEA target 3240 MUs.

In F.Y. 2023-24, KGSC has achieved Generation of 2,488.76 MUs till Nov 2023.

In FY 2023-24, KGSC has carried out major COH/maintenance work of various units such as Unit No. 08 (73 days), Unit No. 07 (39 days), Unit No. 01 (109 days) and ongoing outage of St. III, Unit No. 11 (180 days) along with maintaining PAFM above normative (89.65%) i.e. 90.27% till Nov 2023.

## "कोराडी औष्णिक वीज केंद्राने गाठले महत्तम वीज निर्मितीसह नवे उच्चांक"

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीमध्ये दुसऱ्या क्रमांकाची महत्तम स्थापित क्षमता असणाऱ्या कोराडी औष्णिक विद्युत केंद्राने सातत्यपूर्ण कामगिरी करतांना उपलब्ध संसाधनांचा सुयोग्य वापर करीत कार्यक्षमता वाढीसह नवे उच्चांक गाठले आहेत.

कोराडी वीज केंद्र कार्यान्वित झाल्यापासून, २५ जानेवारी २०२४ रोजी महत्तम वीज निर्मिती २,२०१ मेगावॅटचा (वीज केंद्र स्थापित क्षमता २,१९० मेगावॅट) नवा उच्चांक प्रस्थापित केला आहे. तसेच ६६० मेगावॅटच्या तीनही संचांमधून महत्तम वीज निर्मिती १९९१ मेगावॅटचा (स्थापित क्षमता १९८० मेगावॅट) नवा उच्चांक गाठला आहे.

वीज केंद्र कार्यान्वित झाल्यापासून दि. ३० जानेवारी २०२४ रोजी महत्तम सर्वाधिक दैनिक सर्वोत्तम वीज निर्मिती ४९.२९५ दक्षलक्ष युनिटस्, संयंत्र भारांक ९३.७९% आणि सरासरी वीज उत्पादन २०५६ मेगावॅटचा तसेच महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग निकषानुसार भारांक ९२.०७% चा नवा उच्चांक गाठला आहे.

यासोबतच, ६६० मेगावॅटचे तीन संच कार्यान्वित झाल्यापासून, ३० जानेवारी २०२४ रोजी दैनिक महत्तम वीज निर्मिती ४४.८३५ दक्षलक्ष युनिटस्चा नवा उच्चांक गाठला. तसेच, संयंत्र भारांक ९४.३५% आणि सरासरी वीज उत्पादन १८६८ मेगावॅटचा नवा उच्चांक गाठला आहे.

विशेष म्हणजे, माहे जानेवारी २०२४ मध्ये, महत्तम मासिक वीज निर्मिती १२१३.३८० दक्षलक्ष युनिटस्, संयंत्र भारांक ८२.३७% आणि सरासरी वीज उत्पादन १७०० मेगावॅट आणि एमईआरसी भारांक ८३.१५% सह नवा उच्चांक गाठला आहे.

संच क्रमांक – ८,६६० मेगावॅट कार्यान्वित झाल्यापासून, दि. २९ जानेवारी २०२४ रोजी, महत्तम सर्वाधिक दैनिक वीज निर्मिती १५.५८८ दक्षलक्ष युनिटस्, संयंत्र भारांक ९८.४१% आणि सरासरी वीज उत्पादन ६५० मेगावॅट सह एमईआरसी भारांक ९८.२१% आणि भार क्षमता ८९.६७% सह नवा उच्चांक गाठला आहे.

संच क्रमांक – १०,६६० मेगावॅट कार्यान्वित झाल्यापासून, माहे जानेवारी–२४ मध्ये महत्तम मासिक वीज निर्मिती ४३२.६२० दक्षलक्ष युनिटस्, संयंत्र भारांक ८६.२७% आणि एमईआरसी भारांक ८४.७०% सह नवा उच्चांक गाठला आहे. आजघडीला महानिर्मितीच्या २६ संचांपैकी २२ संचांतून आवश्यकतेनुसार वीज उत्पादन घेण्यात येत आहे.

कोराडी वीज केंद्रातील कोळसा हाताळणी विभागाद्वारे, कमीतकमी वेळेत कोळसा उतरविण्याचे नियोजन करण्यात येते. त्यामुळे नवे उच्चांक गाठले आहेत, त्यात प्रामुख्याने वीज केंद्र कार्यान्वित झाल्यापासून दि. ३१ जानेवारी २०२४ रोजी महत्तम ६२८ कोळसा वॅगन्स अनलोडिंग करण्यात आल्या आहेत. यासह माहे जानेवारी–२०२४ मध्ये निर्धारित वेळेत १४९ कोल रेक्स (कोळसा माल गाडी) अनलोड करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सध्यस्थीतीत पुरेसा कोळसा साठा उपलब्ध असून उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर कोळशाच्या मागणी–पुरवठ्याचे संतुलन राखण्यात येत आहे.

मागील ६ वर्षांच्या तुलनेमध्ये महानिर्मितीने यावर्षी जानेवारी महिन्यामध्ये सर्वोच्च ५,०६१ दशलक्ष युनिट्स इतकी औष्णिक वीज निर्मिती साध्य केली असून एकूण महानिर्मितीची जानेवारी २०२४ मध्ये ५,५८२ दशलक्ष युनिट्स इतकी विक्रमी वीज निर्मिती झाली आहे.

महानिर्मिती वरिष्ठ व्यवस्थापनाचे नियमित मार्गदर्शन आणि कोराडी औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे यांचे नेतृत्वात कोराडी वीज केंद्रातील सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार व सर्व संबंधितांच्या सांघिक प्रयत्नांची ही फलश्रुती असून वीज केंद्राच्या कार्यक्षमता वाढीसाठी नव–नवे उच्चांक गाठण्यासाठी कोराडी विद्युत केंद्र प्रयत्नशील आहे.

## चंद्रपूर महाऔष्णिक बिजली केंद्र के वर्धापन दिन के उपलक्ष्य में आयोजित महिला क्रिकेट प्रतियोगिता में जोशीले खेल भावना से ओत–प्रोत भागीदारी

चंद्रपुर महाऔष्णिक बिजली केंद्र मे ४० वे वर्धापन दिन के उपलक्ष्य में महिलाओ के क्रिकेट प्रतियोगिता का आयोजन किया गया। इस प्रतियोगिता मे पहली बार महिलाओ की ६ टीम ने भाग लिया। इन ६ टीम में से ४ टीम चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र की महिला कर्मचारी और २ टीम चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र कॉलोनी के महिलाओं की थी। फाइनल मैच टीम–२१० और कॉलोनी टीम के बीच हुआ और अंत में टीम–२१० विजयी रही।

पूरी प्रतियोगिता के दरम्यान महिलाओ का उत्साह दर्शनीय था। वास्तव मे मैदान पर महिला खिलाडियों द्वारा पूरे प्रतियोगिता के दरम्यान जोश और उनके द्वारा पेश किया गया खेल–भावना देखने लायक थी। इनके जोश और खेल–भावना का उपस्थित सभी हजारों महिला एवं पुरुष दर्शकों ने तहेदिल से स्वागत किया।

इस प्रतियोगिता के सफल आयोजन के लिए चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र के कुटुंब प्रमुख चीफ इंजिनियर श्री. गिरीश कुमरवार एवं उनकी टीम के मार्गदर्शन मे अधीक्षक अभियंता सौ. जीनत पठान ने प्रयास के सभी सीमाओं को पार कर दिया था।

फलस्वरूप पहली बार इतने महिला टीम की भागीदारी एवं पूरे प्रतियोगिता के दरम्यान सभी महिला खिलाडी द्वारा जोशीले खेल का प्रदर्शन, महिलाओ का किसी भी क्षेत्र मे एक सफल भागीदारी के शुभ संकेत की ओर इशारा करता है।

भविष्य मे महानिर्मिती महिलाओं का हर एक क्षेत्र मे इससे भी ज्यादा जोश के साथ भागीदारी की अपेक्षा करना कोई अतिशयोक्ति नहीं होंगी।

# खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा ३४ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**“ नववर्षात ९० टक्के भारांकासह १२०० मेगावॅटचा संकल्प**
**हॅप्पी स्ट्रीटमध्ये ३ हजार नागरिकांचा सहभाग**
**४३० रक्तपिशव्या रक्तदान करून सामाजिक बांधिलकी**
**हॅप्पी स्ट्रीट (आमचं गांव) आणि कंत्राटी कामगारांसाठी क्रिकेट सामने विशेष आकर्षण ठरले**
**आनंद मेळावा, क्रीडा, सांस्कृतिक व मनोरंजनातून उत्साहपूर्ण वातावरण ”**

दिनांक २० ते ३० डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये सांघिक स्पर्धा ज्यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, रस्सीखेच व वैयक्तिक स्पर्धा टेबल टेनिस, बॅडमिंटन स्पर्धा घेण्यात आल्या. लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, फन गेम व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

दिनांक ३१ डिसेंबर २०२३ रोजी सर्व वयोगटानुसार मॅरेथॉन स्पर्धा घेण्यात आली. तर दि. ३ ते ५ जानेवारी २०२४ दरम्यान भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन मा. मुख्य अभियंता श्री. विजय राठोड यांनी केले. सदर शिबिराला बरेचसे अधिकारी कर्मचारी कंत्राटी कामगार उपस्थित होते. यावर्षी रक्तदान शिबिरामध्ये एकूण ४८० रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले बहुमूल्य योगदान दिले.

दिनांक ५ जानेवारी २०२४ रोजी वसाहतवासियांसाठी “आनंद मेळावा” आयोजित करण्यात आला. आनंद मेळाव्यातील पक्वानां सोबतच वसाहतवासियांना संगीताची सुद्धा पर्वणी मिळाली.

यावर्षीचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे हॅपी स्ट्रीट (आमचं गाव) याची टॅगलाईन म्हणजे “खा... खेळा... मजा करा.” या कार्यक्रमाला वसाहतवासियांचा उत्स्फूर्त प्रसिद्ध मिळाला. सकाळी-सकाळी झुम्बा डान्स त्यानंतर मुलांसाठी लहानपणीचे खेळ ज्यात झूले, लगोरी, दोरीवरच्या उड्या, रिंग्स, चित्रकला, सायकल टायर, मुखवटे हे होते. फूड झोन मध्ये सांबरवडा, डोसा, समोसा, इडली, पाणीपुरी, बर्गर, हॉट डॉग, कुकीज, ढोकळा ह्या पदार्थांचा सुध्दा वसाहतवासियांनी यथेच्छ आस्वाद घेतला.

दिनांक ७ जानेवारी २०२४ रोजी एकपात्री नाटक “चुकीला माफी नाही” सादर करण्यात आले आणि सायंकाळी वैयक्तिक बक्षित वितरण समारंभ आयोजित करण्यात आले होते. यानंतर दिनांक ८ जानेवारी २०२४ रोजी वर्धापन दिनानिमित्त पूजा करून प्रसाद वितरित करण्यात आले. तर सायंकाळी समारोप समारंभ, पारितोषिक वितरण व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी खापरखेडा वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विजय राठोड तर प्रमुख पाहुणे म्हणून संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर तर मंचावर विशेष अतिथी म्हणून कार्यकारी संचालक मा.श्री. पंकज सपाटे, मुख्य अभियंता श्री. विलास मोटघरे, श्री. नारायण राठोड, उपमुख्य अभियंते श्री. प्रवीण रोकडे, श्री. सुदीप राणे, श्री. विराज चौधरी, जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते आणि वर्धापन दिन सचिव श्री. राहुल बागडे प्रामुख्याने उपस्थित होते.

“स्व- ऊर्जेने यावर्षीचा खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा वर्धापन सोहळा सर्वोत्तम झाला आहे आणि हाच उत्साह वर्षभर कायम ठेवून कुटुंबाची प्रगती आणि पर्यायाने महत्तम वीज उत्पादनाचा उच्चांक गाठावा”, असे प्रतिपादन महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर यांनी केले. ते खापरखेडा येथे ३४ व्या वर्धापन दिन समारोपीय समारंभात प्रकाशनगर वसाहत येथे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खापरखेडा वीज केंद्राचे मुख्य अभियंता श्री. विजय राठोड तर प्रमुख पाहुणे म्हणून संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर होते तर मंचावर विशेष अतिथी म्हणून कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-२) श्री. पंकज सपाटे, मुख्य अभियंते सर्वश्री. विलास मोटघरे, नारायण राठोड, उप मुख्य अभियंते सर्वश्री. प्रवीण रोकडे, सुदीप राणे, विराज चौधरी, जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते, वर्धापन सचिव श्री. राहुल बागडे प्रामुख्याने उपस्थित होते.

संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर म्हणाले की, “खापरखेडा वीज केंद्राचा वैभवशाली इतिहास बघता आगामी काळात १०० टक्के भारांक अपेक्षित आहे. त्यांनी नफा-तोट्याचे गणित अतिशय सुलभरित्या मांडले. अवांतर खर्च कमी करून तफावत भरून काढावी. वीज उत्पादनासोबतच सुंदर स्वच्छ परिसर, सामाजिक जबाबदारी, प्रदूषण कमी करणे, राख उपयोगिता वाढविणे, व्यवस्थापकीय संचालकांची त्रिसूत्री इत्यादी बाबींवर लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले. उत्तम कामगिरीबाबत सर्वांचे अभिनंदन केले. खापरखेडा येथे अनुभवी कुशल मनुष्यबळ आहे आता श्री. विजय राठोड यांच्या रुपात उत्तम नेतृत्व लाभले असल्याचे” त्यांनी सांगितले.

श्री. पंकज सपाटे यांनी मागील तीन महिन्यातील उत्तम कामगिरीबाबत श्री. सुदीप राणे आणि श्री. जितेंद्र टेंभरे यांच्या टीम २१० आणि टीम ५०० मेगावॅटचे मनापासून अभिनंदन केले. तसेच संघटना प्रतिनिधींच्या सहभागातून अधिकची मदत झाल्याचे सांगितले. प्रत्येकाने कसोशीने प्रयत्न करा, ‘यश तुमचे अपयश आमचे’ अशा पद्धतीचे प्रेरणादायी विचार मांडले.

अध्यक्षस्थानाहून बोलतांना मुख्य अभियंता श्री. विजय राठोड म्हणाले की, “वर्धापन समारंभ साजरा होत असताना ‘क’ पाळीत काम करणाऱ्या मनुष्यबळाच्या त्यागाचे त्यांनी अभिनंदन केले. खापरखेडा टीम सर्वोत्तम आहे, आम्ही नववर्षात ९० टक्के भारांक आणि १२०० मेगावॅट वीज उत्पादनाचा संकल्प केला असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यालयाच्या मार्गदर्शनामुळे उत्तम

कामगिरी शक्य झाली आणि आता हा उत्साह महत्तम वीज उत्पादनात परिवर्तीत करून दाखवू" अशी ग्वाही दिली.

प्रारंभी महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. डॉ. पी. अन्बलगन तसेच संचालक व इतर मान्यवरांच्या शुभेच्छा संदेशांचे वाचन करण्यात आले. वर्धापन दिनानिमित्त क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, व्हॉलीबॉल, कॅरम, गंमतीशीर खेळ, रस्साखेच, मॅरेथॉन, बुद्धिबळ, रांगोळी, चित्रकला, परिसर स्वच्छता, हॅप्पी स्ट्रीट (आमचं गाव) आनंद मेळावा, प्रदर्शनी, महिला मंडळ कार्यक्रम, ऑर्केस्ट्रा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विविध स्पर्धा घेण्यात आल्या. याप्रसंगी विविध स्पर्धांचे मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. त्यानंतर सुप्रसिद्ध गायक राजेश दुरुगकर, इशा रानडे, श्रुती चौधरी, शिवानी जोशी या गायकांनी "स्वर मधुरा" सदाबहार हिंदी गीतांचा कार्यक्रम सादर करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

**विशेष सन्मान**

महानिर्मितीच्या ५० लक्ष किमतीचे साहित्य चोरीला जाण्यापासून वाचविल्याबद्दल वरिष्ठ व्यवस्थापक (सुरक्षा) श्री. नवीन सतीवाले, उपव्यवस्थापक (सुरक्षा) श्री. सचिन पवार, कनिष्ठ सुरक्षा अधिकारी श्री. दीपक सोनवणे, कंत्राटी सुरक्षा रक्षक श्री. साहेबराव लकडकर यांना सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.

कर्तव्यावर असताना समयसुचकतेमुळे वॅगन अनलोडिंग करताना दोन अज्ञात व्यक्तींचे प्राण वाचविल्याबद्दल तंत्रज्ञ-१ श्री. संजीवकुमार गर्जे यांना सन्मानित करण्यात आले.

सहाय्यक अग्निशमन अधिकारी श्री. प्रकाश हेडाऊ यांना महाराष्ट्र शासनाचा गुणवंत कामगार पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

महानिर्मिती नाट्यस्पर्धेत "नथिंग टू से" नाटकाला प्रथम पारितोषिक मिळाल्याबद्दल नाट्य कलावंतांना सन्मानित करण्यात आले.

या प्रसंगी अधीक्षक अभियंते सर्वश्री. संजय तायडे, संजीवकुमार पखान, विश्वास सोमकुंवर, शिरीष वितोंडे, विलासकुमार उके, प्रशांत साखरकर, वैद्यकीय अधीक्षक श्री. मुकेश गजभिये, विभाग प्रमुख, वर्धापन दिन आयोजन समिती पदाधिकारी-सदस्य, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समारंभाचे सूत्रसंचालन कल्याण अधिकारी श्री. आनंद वाघमारे, संदेश वाचन श्री. हर्षवर्धन नागरगोजे, प्रास्ताविक श्री. राहुल बागडे तर उपस्थितांचे आभार श्री. नितीश पडोळे यांनी मानले.

३४ वा वर्धापन दिन यशस्वी करण्यासाठी आयोजन समिती, अधिकारी, विभाग प्रमुख, अभियंते, तंत्रज्ञ, कर्मचारी, कंत्राटी कामगार, संघटना प्रतिनिधी, कुटुंबीय, कंत्राटदार, पुरवठादार इत्यादींचे सहकार्य लाभले.

## Achievement of - Koradi TPS

- Highest ever unloading of 628 Wagons in a day since commissioning.
- Team CHP has unloaded 628 Wagons in a day on Dt. 31.01.2024 beating the previous best of 583 Wagons in a day.
- Also in the month of January 24, 149 wagons have been released in free time which is best no of free release in a month since commissioning.
- Previous 3 best unloading of wagons are as under :
  1. 583 wagons (25/01/24)
  2. 580 Wagons (23/01/24)
  3. 567 Wagons (07/02/23)
- Also koradi CHP 660 has unloaded more than 584 wagons in a day highest for 660 chp since commissioning. 11 rakes have been released for the day beating previous best release of 10 rakes
- Average rake detention (Ardt) for the month of Jan 24 is around 5:00 hours which is best since commissioning.
- Also, highest ever instantaneous station load of 2201 MW and also the highest ever instantaneous load for 3x660 MW unit 1991 MW since commissioning.
- Team KTPS achieved highest instantaneous station load of 2201 MW (Installed capacity 2190 MW) on Date 25-01-2024 at 09:04 hrs, beating the previous best of 2125 MW on 10-Dec-2021.
- Also KTPS 660 MW units achieved the highest instantaneous load of 1991 MW (Installed capaity 1980 MW) at 09:05 Hrs, beating the previous record of 1967 MW on 14-Apr-2017.
- Koradi 3x660 at 9:00 hrs 25 Jan. 24
  Koradi 3x660 has achieved highest generation of 1143 MU with 94.1% availability since commissioning in Dec 23.
- Highest Daily Generation Since COD (U 6 R & M).
  48.829 Mus (29.01.2024)
  Average Load : 2035 MW
  CEA PLF : 92.90%
- Previous best
  48.045 Mus (10.10.23)
  Average Load : 2002 MW
  CEA PLF : 91.41 %
- Unit 8, 9, 10 (Stg 3) Dec 23
  Generation: 1143.038
  PLF : 77.59 %
  MERC AVF : 82.40 %

# गौरव - अभिनंदन




चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, येथील ओ.डी.पी.–२ या विभागात कार्यरत असलेले श्री. सतिश पुंडलिक पाटील यांचा पाल्य चिरंजीव स्मित ह्याने जानेवारी २०२४ महिन्यात पार पडलेल्या अलामा अबॅकसच्या १९व्या आंतर राष्ट्रीय पातळीवर घेण्यात आलेल्या स्पर्धेत MA6 च्या सिनियर गटातून तृतीय क्रमांक पटकावला आहे. तसेच त्याला ग्रँड मास्टर ही पदवी बहाल करण्यात आलेली आहे. ह्या स्पर्धेत भारत व भारताबाहेरील अन्य देशांच्या हजारो विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. ह्या Event ची गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद करण्यात आलेली आहे. हा पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम हैद्राबाद येथे आयोजित करण्यात आला होता.

चि. स्मित हा सेंट मेरी हायस्कूल, दुर्गापूर, जि. चंद्रपूर या शाळेचा विद्यार्थी असून तो इयत्ता ६ व्या वर्गात शिकत आहे. त्याच्या या यशामध्ये आई तेजस्विनी व शिक्षिका सौ. मिनाक्षी नेरकर व श्री.नेरकर सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.



चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे तंत्रज्ञ–२ या पदावर कार्यरत असलेले श्री. परशुराम ईश्वर गोवर्धन यांचे चिरंजीव अनित्य हा वैद्यकीय अभ्यासक्रम (MBBS) उत्तीर्ण होऊन मे २०२३ मध्ये एक वर्षाचा इंटर्नशिप कालावधी पूर्ण केलेला आहे.



नाशिक औष्णिक विद्युत केंद्र येथे एकलहरे विश्रामगृहात मदतनीस या पदावर कार्यरत असलेले श्री. शब्बीर पापामियाँ शेख यांची कन्या कु. सोनिया हिचे BASLP (Bachelors in Audiology and Speech Language Pathology), Bharti Vidyapeeth (Deemed to be University) School of Audiology and Speech Language Pathology, Pune, India या माध्यमातून शिक्षण झाले असून M.Sc. Autism University, University of Strathclyde Glasgow, Scotland ह्या कोर्ससाठी एका वर्षाकरिता नियुक्ती झाली आहे.

कण्हेर जल विद्युत केंद्र येथे उप कार्यकारी अभियंता या पदावर कार्यरत असलेल्या सौ. अदिती शंकर खराडे यांची पाल्या कु. तन्वी हिने वर्ष २०२३ मध्ये वर्ल्ड ट्रॅडिशनल शोतोकोन फेडरेशन, असोसिएशन ऑफ महाराष्ट्र तर्फे उप मुख्यमंत्री चषक कराटे स्पर्धेत पुरस्कार प्राप्त केले असून, नुकत्याच गोवा येथे पार पडलेल्या एकविसाव्या (वर्ल्ड ट्रॅडिशनल शोतोकोन फेडरेशन) ऑल इंडिया कराटे चॅम्पियनशिप या देशपातळीवरील स्पर्धेमध्ये काता या स्पर्धा प्रकारात कांस्य तर कुमिते या स्पर्धा प्रकारात सुवर्ण पदक व प्रमाणपत्र प्राप्त केले.



कोराडी औष्णिक विस्तारित प्रकल्प, संच क्र. ८ येथे ब्लो डाऊन पिट विभागात तंत्रज्ञ–१ या पदावर कार्यरत असलेले श्री. पुरुषोत्तम कृष्णराव सोनारे यांचा पाल्य महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत (इयत्ता १०वी) परीक्षेत ९६% गुण मिळवून (भांगे पब्लिक स्कूल, पांजरा, कोराडी) शाळेतून तसेच कामठी तहसीलमधून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला.



महानिर्मिती सांघिक कार्यालय येथे स्थापत्य–३ या विभागात कार्यरत असलेल्या सौ. अंजली सुनिल बनसोड यांची पाल्या कु. अनिशा ही सी.बी.एस.ई. बोर्ड इयत्ता १०वी मध्ये ९५.६% गुण मिळवून उत्तीर्ण झाली.



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र येथे ई.एस.पी./व्ही.एफ.डी.–५०० मेगावॅट या विभागात तंत्रज्ञ–२ या पदावर कार्यरत असलेले श्री. जयसिंह रामरावजी रच्छोरे यांची पाल्या कु. सायली ही माध्यमिक शालांत (इयत्ता १०वी) परीक्षेत ९३.६०% गुण मिळवून उत्तीर्ण झाली.

# गौरव - अभिनंदन



### सविता शेखर झाररिया, महानिर्मितीच्या मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा)

वीज उत्पादन क्षेत्रातील अग्रगण्य अश्या महानिर्मिती या कंपनीत महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) या पदी कार्यरत असलेल्या सौ. सविता शेखर झारारीया यांची नुकतेच मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) म्हणून मुख्यालय मुंबई येथे पदोन्नती झाली आहे. मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) या पदावर विराजमान होणाऱ्या त्या महानिर्मितीच्या पहिल्या महिला अधिकारी आहेत.

चार्टर्ड अकाऊंटंट पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्या जून १९९४ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे व्यवस्थापक (वित्त व लेखा) म्हणून रुजू झाल्या. त्यानंतर कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, कोळसा विभाग, मुख्यालय मुंबई, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, बांधकाम कार्यालय कोराडी, कोळसा विभाग नागपूर आणि आता मुख्यालय मुंबई इत्यादी ठिकाणी वेगवेगळ्या पदांवर त्यांनी यशस्वीरित्या काम केले असून व्यवस्थापक (वित्त व लेखा) ते मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अशा विविध महत्वपूर्ण पदांवर त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे.

महानिर्मितीमध्ये संचलन व सुव्यवस्था, अंतर्गत लेखा परीक्षण, कॉर्पोरेट अकाऊंटसचा विपुल अनुभव त्यांचे पाठीशी आहे.




### Sambhaji Badgujar Ultra Marathon Runner !

The TATA Ultra Marathon, one of the most prestigious endurance events in the world. It is known for its rigorous routes and elite competitors. The challenging undulating slopes of the Sahyadri range give every runner an opportunity to test their endurance level to the fullest.

TATA Ultra Marathon is very challenging due to high mountain elevation more than 700 Meters on Lonavala hills, hard climbing with up and downs fluctuations, dense forest in cold weather in the night hours.

On Sunday 25th Feb 2024 Ultra Run race was organised at Lonavala hills near Pune. Basically, this ultra Marathon race in two categories 35 Km and 50 Km on hilly areas. The challenge race 35 Km started at night hours 3 am.

Sambhaji Badgujar, Assistant Engineer from Chandrapur Super Thermal Power Station participated in Tata Ultra Marathon for 35 Km and successfully completed the race in just 3 hours 53 minutes.



### तृप्ती नितीन मुधोळकर, महानिर्मितीच्या मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा)

वीज उत्पादन क्षेत्रातील अग्रगण्य अश्या महानिर्मिती या कंपनीत महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) या पदी कार्यरत असलेल्या सौ. तृप्ती नितीन मुधोळकर यांची नुकतेच मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) म्हणून मुख्यालय मुंबई येथे पदोन्नती झाली आहे. मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) या पदावर विराजमान होणाऱ्या त्या महानिर्मितीच्या पहिल्या महिला अधिकारी आहेत.

चार्टर्ड अकाऊंटंट पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्या ऑगस्ट १९९६ मध्ये तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळात ४०० के.व्ही. जी.सी.आर. नागपूर येथे व्यवस्थापक (वित्त व लेखा) म्हणून रुजू झाल्या. त्यानंतर स्थापत्य विभाग खापरखेडा, खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र, कोळसा विभाग नागपूर, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र, बांधकाम विभाग कोराडी आणि आता मुख्यालय मुंबई इत्यादी ठिकाणी वेगवेगळ्या पदांवर त्यांनी यशस्वीरीत्या काम केले असून व्यवस्थापक (वित्त व लेखा) ते मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अशा विविध महत्वपूर्ण पदांवर त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे.

महानिर्मितीमध्ये स्थापत्य, प्रकल्प, संचलन व सुव्यवस्था, अंतर्गत लेखा परीक्षण, कॉर्पोरेट अकाऊंटसचा विपुल अनुभव त्यांचे पाठीशी आहे. सोबतच महापारेषण कंपनीत 'वित्तीय तज्ज्ञ' म्हणून त्या संचालक पदी कार्यरत आहेत. २९ फेब्रुवारी २०२४ रोजी महानिर्मितीच्या सेवेतून त्या सेवानिवृत्त झाल्या.



Master Atif Malika Mujawar has achieved various awards as follows :

1) International Rank 1 at International Maths Olympiad Exam organized by SOF.
2) Silver Medal at Dr. Homi Bhabha Balvaidnyanik Science Talent Examination.
3) Selected in Jawahar Navoday Vidyalaya, Ratnagiri for Clast VI.

Mst. Atif is the son of Smt. Malika Noormohammad Mujawar working as Deputy Executive Engineer at Technical Purchase Section, Koyana HPS, Pophali.

Despite of residing at remote location, he has achieved awards by hard work and dedication.

## राज्य शासनाच्या 'महासंकल्प रोजगार' अभियानाअंतर्गत महानिर्मितीद्वारे नियुक्ती पत्र वितरण





स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त ७५ हजार रिक्त पदे भरणेबाबत, राज्य शासनाच्या 'महासंकल्प रोजगार' अभियानाअंतर्गत महानिर्मितीद्वारे सरळसेवा भरती प्रक्रियेत प्रातिनिधिक उमेदवारांना सहयाद्री अतिथीगृह येथे उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री मा.ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते नियुक्ती पत्र वितरीत करण्यात आले. या कार्यक्रमाला मा. प्रधान सचिव तथा महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. लोकेश चंद्र, उप मुख्यमंत्री यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. संजीवकुमार, सूत्रधारी कंपनीचे स्वतंत्र संचालक मा.श्री. विश्वास पाठक तसेच महानिर्मितीचे संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक डॉ. नितीन वाघ, श्री. पंकज नागदेवते, उप सचिव श्री. नारायण कराड आणि मुख्य अभियंते आणि अधिकारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. कल्पना साठे यांनी, तर आभार प्रदर्शन महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मासं) डॉ. धनंजय सावळकर यांनी केले.





## प्रकाशगड मुख्यालयात मानव संसाधन विभागातर्फे अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी "आनंदी जीवनाचे राजमार्ग" अभिनव कार्यक्रम





महानिर्मितीच्या मानव संसाधन विभागातर्फे 'गतिमान प्रशासन–मानव संसाधन' या संकल्पनेनुसार सुप्रसिद्ध वक्ते श्री. अशोक देशमुख यांचे "आनंदी जीवनाचे राजमार्ग" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन सांघिक कार्यालय, मुंबई येथे करण्यात आले. याप्रसंगी महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. आनंद कोंत प्रामुख्याने उपस्थित होते तसेच महानिर्मितीचे अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. सोनाली चुंगडे यांनी तर मानव संसाधन विभागामार्फत आभार मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. आनंद कोंत यांनी मानले. त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

## Inauguration of Training Batch N71 at Nashik Training Centre







## मुख्य महाव्यवस्थापक (लेखा) श्री. विजय चितलांगे आणि अतिरिक्त कार्यकारी अभियंता (नियामक व वाणिज्य कक्ष) श्री. किशोर बाविस्कर यांचा सेवानिवृत्ती समारंभ





सांघिक कार्यालय, मुंबई येथे संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे यांचे अध्यक्षतेखाली मुख्य महाव्यवस्थापक (लेखा) श्री. विजय चितलांगे आणि अतिरिक्त कार्यकारी अभियंता (नियामक व वाणिज्य कक्ष) श्री. किशोर बाविस्कर यांचा सेवानिवृत्ती समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते श्री. चितलांगे आणि श्री. बाविस्कर यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अनबलगन, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नितीन चांदूरकर, कार्यकारी संचालक (इंधन/कोळसा) श्री. राजेश पाटील, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त) श्री. पंकज शर्मा, तत्कालीन मुख्य अभियंता श्री. राजेशकुमार ओसवाल आणि अन्य वरिष्ठ अभियंते, अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.





## मानव संसाधन-प्रशिक्षण विभागातर्फे "ताण व वेळ व्यवस्थापन" प्रशिक्षण सत्र






सांघिक कार्यालय, मुंबई येथे मानव संसाधन-प्रशिक्षण विभागातर्फे मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत यांच्या अध्यक्षतेखाली महानिर्मितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी "ताण व वेळ व्यवस्थापन" प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले. सदर प्रशिक्षण सत्र डॉ. वर्षा गुप्ता यांनी सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ. सोनाली चुंगडे यांनी केले, त्यावेळी उपस्थित अधिकारी-कर्मचारीवृंद.



चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, CSIR-NEERI यांनी संयुक्त करार केला असून चंद्रपूर वीज केंद्राने बंद लूप प्रकाश उत्प्रेरक क्रियेद्वारे (अलगी/शेवाळ) साठवणूक करण्याच्या संदर्भात पुढाकार घेतला आहे. या करारनाम्यावर (MOA) श्री. गिरीश कुमरवार, मुख्य अभियंता, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र आणि डॉ. अमित बाफना, प्रमुख शास्त्रज्ञ CSIR-NEERI, नागपूर यांनी डॉ. विश्वजीत ठाकूर प्रमुख वैज्ञानिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी केली.



चंद्रपुर महाऔष्णिक बिजली केंद्र मे ४०वे वर्धापन दिन के उपलक्ष्य में महिलाओ के क्रिकेट प्रतियोगिता का आयोजन किया गया। इस प्रतियोगिता मे पहली बार महिलाओ की ६ टीम ने भाग लिया। इन ६ टीम मे से ४ टीम चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र की महिला कर्मचारी की और २ टीम चंद्रपूर महाऔ.वि. केंद्र कॉलोनी के महिलाओ की थी।

# जयंती - दिनविशेष

## महात्मा गांधी - लाल बहादुर शास्त्री जयंती (दि. ०२/१०/२०२३)


पारस औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


नाशिक औष्णिक विद्युत केंद्र

## डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती (दि. १५/१०/२०२३)


पारस औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

## महर्षि वाल्मिकी जयंती (दि. २८/१०/२०२३)


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


पारस औष्णिक विद्युत केंद्र


नाशिक औष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

# जयंती - दिनविशेष

## इंदिरा गांधी पुण्यतिथी - राष्ट्रीय संकल्प दिवस व सरदार वल्लभभाई पटेल जयंती - राष्ट्रीय एकता दिवस (दि. ३१/१०/२०२३)


चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र



पारस औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


नाशिक औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र

## पंडित नेहरु जयंती (दि. १४/११/२०२३)


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


पारस औष्णिक विद्युत केंद्र


चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र

## बिरसा मुंडा जयंती (दि. १५/११/२०२३)


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र

# जयंती - दिनविशेष

## बिरसा मुंडा जयंती (दि. १५/११/२०२३)


पारस औष्णिक विद्युत केंद्र


चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

## इंदिरा गांधी जयंती (दि. १९/११/२०२३)


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र



पारस औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

## संविधान दिन (दि. २६/११/२०२३)


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


पारस औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

# जयंती - दिनविशेष

## संत जगनाडे महाराज जयंती (दि. ०८/१२/२०२३)


चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र



खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र



पारस औष्णिक विद्युत केंद्र

## अटल बिहारी वाजपेयी जयंती (दि. २५/१२/२०२३)


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र



पारस औष्णिक विद्युत केंद्र


चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

























कोराडी औष्णिक विद्युत केंद्राच्या ४९ व्या वर्धापन दिनाचा समारोप व बक्षिस वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी उपस्थित प्रमुख मान्यवरांचे स्वागत तसेच मान्यवरांनी उपस्थित जनसमुदायास मार्गदर्शन केले, प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत "लब्बैक" या पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. उपस्थित अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी ऑर्केस्ट्राचे आयोजन करण्यात आले आणि तद्नंतर बक्षिस वितरण सोहळा मोठ्या दिमाखात संपन्न झाला. त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.


















## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा ३४वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न























खाापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या ३४व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक २० ते ३० डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये सांघिक स्पर्धा ज्यामध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, रस्सीखेच व वैयक्तिक स्पर्धा टेबल टेनिस, बॅडमिंटन स्पर्धा घेण्यात आल्या. लहान मुलांसाठी चित्रकला स्पर्धा तसेच महिलांसाठी रांगोळी स्पर्धा, फन गेम व सांस्कृतिक कार्यक्रम राबविण्यात आले. खापरखेडा औ.वि. केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी आनंद मेळावा आणि सर्वांत मोठे आकर्षण म्हणजे हॅपी स्ट्रीट (आमचं गाव) ही संकल्पना सुध्दा साकारण्यात आली. तसेच सदर वर्धापन दिनानिमित्त रक्तदान शिबीर हा सामाजिक उपक्रमही राबविण्यात आला, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.



















## खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा ३४वा वर्धापन दिन समारोह व बक्षिस वितरण समारंभ














खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या वर्धापना दिनानिमित्त राबविण्यात आलेल्या क्रीडा आणि विविध स्पर्धेत प्राविण्य मिळविणाऱ्या स्पर्धकांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले, तसेच गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सदाबहार गीतांचा कार्यक्रम सादर करण्यात आला, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.
















## चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचा ४०वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न






महानिर्मितीच्या चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राच्या ४० व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच ऊर्जानगर वसाहतीतील अधिकारी मनोरंजन केंद्रालगतच्या सभोवताली रस्त्यावर "हॅप्पी स्ट्रीट - मामाचं गाव" ही संकल्पना साकारण्यात आली, या उपक्रमात वीज केंद्राच्या अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबिय उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. सदर वर्धापन दिनानिमित्त ऊर्जानगर वसाहतीतील महिला व मुलां-मुलींसाठी विविध सांस्कृतिक उपक्रम व क्रीडा स्पर्धा राबविण्यात आल्या, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.


















चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचा ४०वा वर्धापन दिनाचा समारोह उत्साहात संपन्न झाला.
यावेळी सदर वर्धापन दिनानिमित्त आयोजित विविध क्रीडास्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ संचालक (संचलन) मा.श्री. संजय मााडकर आणि अन्य मान्यवर अतिथींच्या हस्ते पार पडला.
याप्रसंगी सांगितीक कार्यक्रम संपन्न झाला.



## वीर बाल दिवस (दि. २६/१२/२०२३)


चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


पारस औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

## डॉ. भाऊसाहेब उर्फ पंजाबराव देशमुख जयंती (दि. २७/१२/२०२३)


चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


पारस औष्णिक विद्युत केंद्र

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती (दि. ०३/०१/२०२४)


पारस औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र

# जयंती - दिनविशेष

## क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंती (दि. ०३/०१/२०२४)


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र


परळी औष्णिक विद्युत केंद्र

## जिजाऊ माँसाहेब - स्वामी विवेकानंद जयंती (दि. १२/०१/२०२४)


पारस औष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


परळी औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

## नेताजी सुभाषचंद्र बोस - बाळासाहेब ठाकरे जयंती (२३/०१/२०२४)


पारस औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


परळी औष्णिक विद्युत केंद्र

# जयंती - दिनविशेष

## संत सेवालाल महाराज जयंती (दि. १५/०२/२०२४)


पारस औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


परळी औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

## छत्रपती शिवाजी महाराज जयंती (दि. १९/०२/२०२४)


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


परळी औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

## बाळशास्त्री जांभेकर जयंती (दि. २०/०२/२०२४)


पारस औष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


परळी औष्णिक विद्युत केंद्र

# जयंती - दिनविशेष

## संत गाडगेबाब महाराज जयंती (दि. २३/०२/२०२४)


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


पारस औष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


परळी औष्णिक विद्युत केंद्र

## संत रविदास महाराज जयंती (दि. २४/०२/२०२४)


पारस औष्णिक विद्युत केंद्र


कोराडी औष्णिक विद्युत केंद्र


खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र


परळी औष्णिक विद्युत केंद्र


भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र



भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र येथे मुख्य अभियंता श्री. मोहन आव्हाड यांचे अध्यक्षतेखाली भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण संपन्न झाले. याप्रसंगी श्री. आव्हाड ह्यांनी मार्गदर्शनपर भाषण केले. याप्रसंगी अधिकारी, कर्मचारी, महिला कर्मचारी तसेच कंत्राटी कामगार उपस्थित होते.



# सुर्यपूत्र, अंगराज कर्ण...

- अमोल विष्णु कांबळे,
निम्नस्तर लिपीक,
कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी




सप्रेम नमस्कार! वि.वि., न भुतो न भविष्यती! दानवीर, अंगराज कर्ण, कवच कुंडलधारी कर्ण, राधेय कर्ण, कौंतेय कर्ण, तुझ्या चरणी या शुद्र अमोलचा स्नेहपूर्ण प्रणाम!

"राधामातेच्या लाडक्या सुपुत्रा, कौंतेया, आज मला तुझ्याशी खुप बोलायचे आहे. तुझ्याशी आज खुप गप्पा मारायच्या आहेत, पण आपण भेटू शकणार नाही, हे मला खुप चांगले माहीत आहे. म्हणूनच मी आज तुला हे छोटंस पत्र पाठवित आहे."

दिग्विजय कर्ण, मला लहानपणीच कळलं होत की, "आपल्या भारत देशात पवित्र धर्म कुरुक्षेत्रावर महाभारत घडल होतं. या महाभारतामध्ये भगवान पुरुषोत्तम श्रीकृष्णानी रथाचे सारथ्यत्व पत्करले होते. पाच पांडवांनी शंभर कौरवांना यमसदनी धाडलं होतं. पण मला माहीत नव्हतं की, कौरवांच्या पक्षात एक ज्येष्ठ पांडव होता एक अव्दितीय असा दिग्विजयी कर्ण होता. अंगराज कर्ण, मला तुझा वृत्तांत मी आठवीमध्ये असतांना संस्कृत विषयाच्या काणेकर सरांनी सांगितला होता. तेव्हांच माझ्या मनांत तुझ्याबद्दल प्रेम वाढीस लागले.

पण तुझे जीवनचरित्र मला शिवाजी सावंतांनी कादंबरीच्या रुपाने सांगितले. त्या कादंबरीचे नांव 'मृत्युंजय' असे आहे. नावातच विजय कोरलेला आहे. कादंबरी वाचतांना असं वाटत होतं की, तु स्वत: मला जवळ घेवून चरित्र सांगत आहेस. जन्मापासून ते मृत्यूपर्यंतची जी जीवन सरीता दाखवलीत त्याबद्दल मी तुझा आभारी आहे. शतश: ऋणी आहे.

सुर्यपुत्रा, तुझ्या जीवनाचे तीन प्रसंग मरेपर्यंत माझ्या लक्षात राहतील. ते म्हणजे तुझ्यामुळे इंद्रदेवालाही भिकाऱ्याचे रूप घ्यायला लागले. तुझ्या राजमहालात तो याचक म्हणून आला आणि जाताना कुबेरालाही लाजवेल अशी संपत्ती म्हणजे तुझ्या अंगावरचे कवच कुंडल घेवून गेला आणि दुसरे म्हणजे युध्दामध्ये तु, युधिष्ठिर, भीम, नकुल, सहदेव यांना जीवनदान दिलेला प्रसंग आणि तिसरे म्हणजे मृत्युशय्येवरती असतानाही त्या वृध्दाला त्याच्या मुलाचा अंत्यसंस्कार करण्यासाठी सोन्याचे दात अर्पण केलेस तो प्रसंग, त्यावेळेस पांडवांच्या मानाही तुझ्यासमोर नक्कीच नतमस्तक झाल्या असतील. किती तु धैर्यशील होतास, निष्ठावंत होतास आणि एकवचनी होतास हे कळते अशा या सुर्यपुत्र कर्णास, माझा स्नेहपूर्ण प्रणाम!

राधेय कर्ण, मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटतंय, ते म्हणजे मी इतरांसारखा का नाही? म्हणजे या महाभारताच्या गोष्टी ऐकून सोडून देणारा महाभारत माझ्या मनावरती का कोरले गेले आहे? सावळा कृष्ण का मला आपलासा वाटतो? त्याच्या हातात जीवनाची सगळी सूत्र आहेत असं का वाटतंय? तुझे नांव माझ्या तोंडातून रोज का बाहेर पडते? तुझ्या आयुष्याचे काही क्षण आठवले की, का तुझ्याबद्दल मनात तळमळ व्यक्त होते? तु माझ्या मनात प्राणज्योती सारखा का बसला आहेस? का... अंगराज कर्ण का?

सुर्यपुत्र कर्ण तुला सांगावेसे वाटते, ते म्हणजे तू जी गोष्ट रोज नियमानं पाहत आला होतास ती मी रोजच पाहतो आहे. तिला पाहिलं की, असं वाटतंय की मी रोजच तुला पाहतो आहे, ती गोष्ट म्हणजे तुझे पिता सूर्य देव. सूर्यपुत्रा, कौंतेया, मला तर अस वाटतंय की, तुझा आणि माझा पूर्वीपासून काहीतरी संबंध असावा. त्याशिवाय माझ्या मनात तुझ्याबद्दल प्रेम कसे काय निर्माण होऊ शकते? तुला खरं नाही का वाटत, थांब... मीच पटवून देतो.

मला तर असं वाटतंय की, ज्यावेळी राजकन्या कुंती देवींनी तुला नदीतून सोडून दिलं होतं, त्यावेळी त्या नदीतला एक पाण्याचा थेंब असेन किंवा तू रोज गंगा नदीवर सूर्यदेवांना अर्ध्यदान करण्यासाठी जात होतास त्यावेळी चुकून कधीतरी तुझा पाय माझ्यासारख्या दगडावरती पडला असेल किंवा तुझ्या उत्तरीयाचा मी एक धागा असेन म्हणून की काय तू मला खुप आवडतोस!

हे महारथी, मला तुझ्या जीवनातील एक गोष्ट अजिबात आवडली नाही ती म्हणजे राजसभेत तू द्रौपदीला वेश्या म्हणून हिणवले होतेस. पण कर्णा, तुझ्या बाजुने विचार केला तर तुझं ते बोलण योग्य वाटतं कारण तिने तुला तिच्या स्वयंवरात सूतपुत्र म्हणून हिणवले होते, पण हे दिग्विजया, तिने तिची पायरी सोडली पण तुला तुझी पायरी सोडता कामा नव्हती. पण जाऊ देत, ते आता या गोष्टीचा विचार करण्यात तरी काय अर्थ जे व्हायचे होतं ते झालेच. दानवीरा, तु हस्तिनापुराच्या गादीचा खरा वारसदार होतास. पण काय करणार तुझ्या जन्मासोबतच दुर्दैव हात धुवून मागे लागले होते.

अरे वसु, तुझ्या जीवनात शापाची व्याख्या कशी करशील ? मला जर कोणी शाप म्हणजे काय ? असे जर विचारले तर मी त्याला नक्की सांगेन की, ज्या वृध्द ब्राम्हणामुळे कर्णाच्या रथाचे चाक ऐनवेळी कुरुक्षेत्रावर रुतुन बसले तो खरा शाप. ज्या परशुरामामुळे कर्णाला ऐनवेळी ब्रम्हास्त्राचे मंत्र आठवेना तो खरा शाप. कर्णा, तुझे जीवन उध्वस्त व्हायला हे शापच कारणीभूत होते. तुला मिळालेलं जीवन हाच एक प्रकारचा शाप होता.

कर्णा आजही जगाला ओरडून सांगावस वाटतंय की, तुझं जीवन वेशीवरती टांगलेल्या लक्तरासारखं नव्हतं तर राजमुकूटावर शोभणाऱ्या मोरपंखासारखं होतं. कर्णा, कधी–कधी मनात विचार आला तर असं वाटत की, तुझ्या जीवनांशी संबंधित असणाऱ्या आणि आजही अस्तित्वात असणाऱ्या गोष्टी किती अभिमानी असतील. कधी–कधी तुझी गंगा माता म्हणत असेल की, येथे एके काळी एका बछडयाची पावलं मातीत उमटली होती पण खटयाळ वाऱ्याने तीही धुडकावून लावली होती. तुझी अमिन टेकडीही पावन झाली असेल, ती ही म्हणत असे की, मी वांझ नाही माझ्या उदरात एक महान दानवीर दिग्विजय महारथी निजला आहे. मी त्याचे दु:ख जगाला कधीही दाखविणार नाही.

कर्णा तुझ्या मनात जी इच्छा होती शेवटी तीच पूर्ण झाली. तु आणि तुझा पक्ष जरी युध्दात हरलेले असलात तरी खऱ्या अर्थाने तूच विजयी झाला आहेस, कारण तुझ्या दरबारात इंद्र याचक म्हणून आता आणि दुसरे म्हणजे पांडवांचे मामा शल्य यांनी युध्दात तुझ्या रथाचे सारथ्य पत्करले. खरोखर कर्णा महाभारताचा तु प्राण आहेस. सुर्यपुत्रा मला नेहमी वाटतंयच की, ज्याला ज्याला कर्ण समजलाय त्याला नक्कीच महाभारत समजलंय, अशा या कर्णाला साष्टांग नमस्कार,

मृत्युंजय मला खुपच आवडली आहे. त्या कादंबरीवरचा तुझा काल्पनिक फोटो देखील मी स्कॅनिंग करुन आणला आहे. कर्णा, तुला म्हणून माझी शेवटची इच्छा सांगतो ती म्हणजे, ज्यावेळी मी कोणाचाच उरलेला नसेन, त्यावेळी माझ्या सोबत मृत्युंजयच असेल. त्यावेळी मला तेवढेच समाधान मिळेल की जाता जाता माझ्या सोबत कोणीतरी आहे म्हणून...

"अंगराज कर्ण, मी आता पत्र पुरे करतो. काही चुकले असेल तर या क्षुद्राला मनापासून माफ कर, तुझं हृदय सुर्यापासून निघणाऱ्या किरणासारखे विशाल आहे, याची जाणिव आहे मला. म्हणून एकदा माझा स्नेहपूर्ण प्रणाम स्वीकार कर, तसेच शोण भाऊ, वृषाली वहिणी, राधा माता, अधिरथ बाबा यांना माझा नमस्कार सांग आणि खास करुन महाभारत घडविणाऱ्या भगवान पुरुषोत्तम श्रीकृष्ण यांना माझा दंडवत सांग."

**– तुझाच एक थेंब**

## मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी महानिर्मितीमध्ये नव्याने रुजू झालेल्या प्रशिक्षणार्थींशी साधला सुसंवाद

**तरुण अभियंत्यांची 'शक्ती' आणि ज्येष्ठ अनुभवी अभियंत्यांच्या 'युक्ती' तून महानिर्मितीचा शाश्वत विकास साधणार...**

**– डॉ.पी. अन्बलगन**

नुकतेच महानिर्मितीने मोठी भरती प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवून आपणांसारख्या गुणी आणि प्रतिभावान अभियंत्यांची निवड केली आहे. आपणां सर्वांचे महानिर्मितीमध्ये मनापासून स्वागत करतांना आनंद होत असल्याचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांनी प्रतिपादन केले.

ते पुढे म्हणाले की, "शिकणे ही निरंतर प्रक्रिया असून, नवीन कौशल्ये विकसित करून बहुआयामी व्यक्तिमत्व घडत असते आणि वीज क्षेत्रातील वाढती स्पर्धा लक्षात घेता ही काळाची गरज आहे. यासाठी भरपूर परिश्रम, ज्ञानार्जन करण्याची उर्मी असणाऱ्या अभियंत्यांसाठी नवनवीन संधी उपलब्ध आहेत".

याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर म्हणाले की, "नवीन अभियंत्यांनी भरपूर काम करण्यासाठी तयार रहावे, थेट भरती प्रक्रियेत आगामी काळात अनेक संधी उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे चांगले काम करा, कौशल्य पणाला लावा, ऊर्जा क्षेत्र विस्तारत असल्याने औष्णिक, जल, वायू, सौर, पवन, हरित हायड्रोजन सारखी क्षेत्रे आधुनिक तंत्रज्ञानासह खुली होत आहेत. शिकण्यासाठी खूप काही असले तरी आपल्या आवडीनुसार त्या क्षेत्रात स्वत:चा दबदबा निर्माण करा, निपुण/तरबेज स्पेशालिस्ट बना".

प्रारंभी प्रास्तविकातून मुख्य अभियंता (प्रशिक्षण) कोराडी–नाशिक श्री. राजेश मोराळे यांनी सांगितले की, "आता तुम्ही परिपूर्ण पॉवर इंजिनियर बनणार आहात, अवजड यंत्रसामग्री आणि वीज उत्पादनाच्या राष्ट्रीय कार्यात तुमचा प्रत्यक्ष सहभाग राहणार आहे, तरुण पिढीकडून महानिर्मितीला भरपूर अपेक्षा आहेत त्या निश्चित तुम्ही पूर्ण कराल", अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त करीत जोशपूर्ण शब्दात भूमिका मांडली तर गीतांजली पारखी अधीक्षक अभियंता नाशिक प्रशिक्षण केंद्र यांनी मान्यवरांचे तसेच उपस्थितांचे आभार मानले. श्री. जयंत देवरे कार्यकारी अभियंता (प्रशासन) नाशिक प्रशिक्षण केंद्र यांनी प्रभावी संचलनातून दुहेरी संवाद कायम राखला. नवनियुक्त प्रशिक्षणार्थींना व्यवस्थापनाशी थेट संवाद साधण्याची नामी संधी उपलब्ध झाल्याने त्यांच्यात आत्मविश्वास आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली असल्याच्या अनेक प्रशिक्षणार्थींनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

## नववर्ष

बघता बघता वर्ष सरले,
कडू गोड आठवणींनी होते जे भरलेले,
या वर्षाने खुप काही शिकवले,
आयुष्य किती क्षणभंगुर आहे,
जणू प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करवले,

कधी झाला खुप हर्ष,
कधी वाटले जीवन व्यर्थ,
कधी आले ओठांवर नकळत हसू,
कधी दाटले डोळयात आसू,

खोट्या नात्यांची झाली जाणीव,
स्वार्थी लोकांची इथे ना उणीव,
अवचित अशा वळणावरती,
ऋणानुबंधाच्या भेटी ही घडती,

झाले गेले द्यावे सोडून,
सरते वर्ष गेले शिकवून,
नव्या संकल्पाची नव्या स्वप्नांची,
घेऊ गगनभरारी इतकीच आस नव्या वर्षाची!

**– नितीन देवराम सोनवणे**
**तंत्रज्ञ १,**
**भुसावळ औ.वि. केंद्र**






## स्वयंदीप हो

स्वयंदीप हो मानवा
जीवनात स्वयंप्रकाश
ध्येय उद्दिष्ट तुझेच पूर्ण
कर ठेवणे पडेल आकाश

किती करावी प्रगती
नाही सीमा कधी त्याला
परोपकारी स्वावलंबी नाव
करून म्हणतात ज्याला

छत्रपती शिवाजी संभाजी
हिंदवी स्वराज्य स्थापले
मावळा म्हणून होत त्यात
जर तू मोलाचेच हात लावले

बाबासाहेबांना दृष्टीस
ठेव छत्रपतींचे राज्य
आवश्यक त्या सर्व गोष्टी
अनावश्यक कर तू त्याज्य

प्रगतीसाठी तुला बोलावते
आकाश खुले अनंत
हो अग्रेसर सक्षम महिला
तुलाही नको कशाची खंत

**– राजेश लक्ष्मण वऱ्हाडे,**
**एम.आय.एस.विभाग,**
**पारस औ.वि. केंद्र**

## आनंदी जगा

आनंद हवाहवासा वाटतो...!!
दु:खाच्या अवतीभोवती तो नाचतो...!!
दु:ख आले की दु:खाचे अश्रू वाहतो...!!
आनंद झाला की आनंदात मजेत नाचतो..!!

जीवनाच्या या संघर्षमय जीवनामध्ये
कधी दु:ख कधी सुख प्राप्त होतच असतं.
खरं जीवन यालाच म्हणतात...!!


दु:ख मात्र सर्वच देतात..!!
सुखात मात्र आनंद हेरून घेता..!!
दु:ख झाले की समोरची दुनिया
हसून हसून बघतात...!!

जीवन असेच आहे...!!
प्रत्येक गोष्टीत आनंदी राहण्याचा प्रयत्न करा...!!
स्वत:ला मात्र बी हॅप्पी आनंदी ठेवा...!!

कोणी कोणाच्या आयुष्यात येत नसतं
स्वत:ला वाटेल तेच करा...!!
स्वत:च स्वत:ला आनंदी ठेवा...!!
दु:ख तर आयुष्य संपेपर्यंत येतच असणार

दु:खाला हरून
आनंद कसा मिळवता येईल
विचार नाही
प्रत्यक्षात करून बघण्याचा प्रयत्न करा..
आनंदी जगा आनंदित रहा...!!

**– आनंद आबाराव कोंत**
**मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं),**
**मुख्यालय, मुंबई.**



# पतंग

छान रंगात होती नात्याची ही पतंग
आंनदाच्या हवेत उडताना तिचा धागाही संग

गोड प्रेम त्यांचे गोड स्पर्शाचा हा खेळ
प्रेमाच्या हातानी बदवलेली हीच तर सुखाची वेळ

प्रेमाच्या गुंत्यात धाग्याला दिसले तीचेच गाव
तिच्या सोबत चालणे आता हेच त्याला ठाव

दूर सोबत उड़ताना एकमेकांचीच गाणी
कधी छोट्या भांडणात तुटायचीही कणी

अश्यात कधीतरी हवाही खुप मंद
उडण्याच्या सुखाला कधी नसतोही रंग

तरीही प्रयत्नाचे डोंगर धागा हळूच चढतो
पतंगाला सुखात उडवताना हसत हसत झिजतो

आनंदाच्या डोहात बदली ना दिसले धाग्याचे झिजणे
पतंग तर दूर उडण्याच्या स्वप्नात कसे दिसेल धाग्याचे तुटणे

शेवटी हात सुटला तुटली स्वप्ने सारी
दूर उडण्याच्या मार्गावर हवा पडली थोडी भारी


तरीही धागा शांत आला हळूच खाली
शेवटचे तिला पाहताना शेवटीही हसूच गाली

तरीही नाही कळले पतंगाला ती दूर जात गेली
दूर जाण्याच्या नव्या वेगात एकटीच वाहत गेली

शेवटी कळले हा वेग नेतोय खुप खाली
धागा नाही दिसत कुठे कसे फिरायचे माघारी

आले भान सुटली धाग्याची गाठ
स्वप्नाच्या वाटेवर विझली प्रेमाची वात

कळली खरी स्वप्ने धाग्याची गोड मिठी
आजही एका फांदीवर तो लटकतोय माझ्यासाठी.



**- प्रवीण दिलीप भोईर**
**व्यवस्थापक (वित्त व लेखा)**
**मुख्यालय, मुंबई.**



# राहिल्या तुझ्या त्या आठवणी

किती प्रेम करावे कुणावर
का नियम कुणी ना केला
तुझा हात सुटला जो हातून
सुखाच्या रेषा घेऊन गेला

त्या देवा किती देऊ धन्यवाद
आठवणीसारखी गोष्ट बनवली
आठवण नसती तर तुझी रे
गोड चाहूल असती हरवली

कधी कळले असते माझे
नभ स्वप्नांचे होईल रिक्त
मृत्यूच्या मिठीतून माझ्या
सूर्याचे वाचले असते तख्त

तो सांगे, राणी खुश कराया
मी तुला साडी, दागिने आणतो
प्रेमी समुद्र किनाऱ्यासाठी
शिंपल्यात प्रेमवैभव भरतो

तुझ्या वाळूच्या किल्ल्याची
होती मी सुंदर राणी
पाहिली स्वप्न समुद्राइतकी
किल्ला मोडून गेले पाणी

त्याच सागराच्या किनारी
पुन:पुन्हा मी हतबल जाते
शंख शिंपले पाखडून मी वेडी
तुझ्या स्पर्शाची वाळू शोधते

कधी वाळूला घेऊनी कवेत
लाटा धावत येऊन म्हणती
ठ खारे पाणी शोभे सागरात,
ना अश्रूंनी भरू डोळ्यांची पणती

आज हाती रेषा आखूनी
नाव तुझे त्यावर लिहिले
हाताच्या मुठीची आवळून पिंड
बेलपत्र अश्रूंचे वाहिले

**- सौ. तेजल मयुर पाटील**
**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालय,**
**मुख्यालय, मुंबई.**

## महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र बाह्यगृह क्रीडास्पर्धा संपन्न

# "खेळातून सांघिक भावना आणि सुसंवादाची संधी मिळते..." पंकज सपाटे.

"वीजनिर्मिती क्षेत्रात वाढती स्पर्धा लक्षात घेता, सशक्त मनुष्यबळ ही काळाची गरज बनली असल्याने क्रीडास्पर्धेच्या माध्यमातून सांघिक भावना आणि सुसंवादाची संधी मिळते आणि पर्यायाने महानिर्मितीचे वीज उत्पादन वाढविण्यास हातभार लागतो", असे प्रतिपादन श्री. पंकज सपाटे, कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था - २) यांनी महानिर्मिती क्रीडास्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात ऊर्जानगर चंद्रपूर येथे केले.

"खेळामुळे निरोगी शरीर व मन उत्साही राहते, नव्या जोमाने, नव्या ऊर्जेने काम करून महानिर्मितीचे ध्येय गाठण्यास हातभार लागतो", असे मत श्री. गिरीश कुमरवार यांनी व्यक्त केले, तर श्री. पी. गिरीशन म्हणाले की, "खेळामुळे तणाव कमी होतो, व्यक्तिमत्व विकसित होते. जिंकण्यापेक्षा खेळात सहभागी होणे अधिक महत्त्वाचे आहे", असे त्यांनी सांगितले.

वीज निर्मितीच्या क्षेत्रात अविरतपणे कार्य करणारे अधिकारी तसेच कर्मचारी शारीरिकदृष्ट्या सुदृढ राहावेत तसेच त्यांच्या क्रीडागुणांना वाव मिळावा म्हणून महानिर्मितीने आंतर विद्युत केंद्र बाह्यगृह क्रीडास्पर्धेचे चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राच्या ऊर्जानगर वसाहत येथे भव्य आयोजन केले. आयोजन समितीच्या प्रत्येक सदस्याने घेतलेल्या परिश्रमामुळे सर्व खेळ उत्तमरित्या संपन्न झाले हे विशेष.

पारितोषिक वितरण समारंभाला कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-२) मा.श्री. पंकज सपाटे, चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. गिरीश कुमरवार, सी.आय.एस.एफ.कमांडन्ट पी. गिरीशन, उप मुख्य अभियंते सर्वश्री. श्याम राठोड, डॉ.भूषण शिंदे, अनिल पुनसे, प्रफुल्ल कुटेमाटे, मिलिंद रामटेके, फनिंद्र नाखले, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्री. बाहुबली डोडल, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मुकेश मेश्राम , क्रीडास्पर्धा सचिव श्री. दिलीप वंजारी प्रामुख्याने उपस्थित होते. तीन दिवसीय स्पर्धेत क्रिकेट, कबड्डी,व्हॉलीबॉल, बास्केटबॉल आणि मैदानी खेळांचा समावेश होता.

चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा, नाशिक, भुसावळ, पारस, परळी, पोफळी, मुंबई, नविकरणीय ऊर्जा आणि उरण इत्यादी विद्युत केंद्रांचे अकरा संघ सहभागी झाले होते. महानिर्मितीच्या नामवंत तसेच प्रतिभासंपन्न ६५० खेळाडूंच्या सहभागामुळे ही क्रीडास्पर्धा अतिशय चुरशीची आणि दर्जेदार झाली.

प्रारंभी महनिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांच्या शुभेच्छा संदेशाचे वाचन करण्यात आले. श्री. मुकेश मेश्राम यांनी तीन दिवसीय क्रीडास्पर्धेबाबत सविस्तर अहवाल वाचन केले तर वरिष्ठ खेळाडूंनी आपले क्रीडा अनुभव व्यक्त केले व सर्वांगसुंदर आयोजनाची मुक्तकंठाने प्रशंसा केली. यानंतर २०२४ मध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या खेळाडूंचा व तीन दिवसीय क्रीडास्पर्धेच्या यशस्वीतेत मोलाचे योगदान देणाऱ्या आयोजन समितीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांचा तसेच संघव्यवस्थापक, कल्याण अधिकारी यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रानू कोपटे व तेजस्विता राऊत व आभार प्रदर्शन श्री. दिलीप वंजारी कल्याण अधिकारी तथा सचिव आंतरविद्युत केंद्र बाह्यगृह स्पर्धा यांनी केले.

सदर समारोपीय कार्यक्रमाला चंद्रपूर वीज केंद्राचे अधीक्षक अभियंते, विभाग प्रमुख, आयोजन समिती पदाधिकारी व सदस्य गण, अभियंते-तंत्रज्ञ-कर्मचारी, संघटना प्रतिनिधी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार, वसाहतवासी मुले-मुली, महिला-पुरुष मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सदर क्रीडा स्पर्धेतील सांघिक आणि वैयक्तिक विजेते व उपविजेते संघ / खेळाडूंची यादी खालीलप्रमाणे :-

**क्रिकेट** : विजेता - चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र , उपविजेता - परळी औष्णिक विद्युत केंद्र.

**कबड्डी :** विजेता - नाशिक औष्णिक विद्युत केंद्र , उपविजेता - नविकरणीय ऊर्जा, पुणे.

**व्हॉलीबॉल :** विजेता - खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र, उपविजेता - कोराडी औष्णिक विद्युत केंद्र

**वैयक्तिक खेळनिहाय निकाल (पुरुष) :**

**१०० मी धावणे :** विजेता - विजय दिवसे (पारस औ.वि. केंद्र), उपविजेता राहुल शेंडे (कोराडी औ.वि. केंद्र).

**२०० मी धावणे :** विजेता - आशिष पवार (नाशिक औ.वि. केंद्र), उपविजेता - विक्रांत मस्के (कोराडी औ.वि. केंद्र).

**४०० मी धावणे :** विजेता - किरण चाटे (भुसावळ औ.वि. केंद्र), उपविजेता - आशिष पवार (नाशिक औ.वि. केंद्र).

**८०० मी धावणे :** विजेता - सुरेश मेश्राम (चंद्रपूर महा औ.वि. केंद्र), उपविजेता - मलेश कांबळे (नवीकरणीय ऊर्जा).

**१५०० मी धावणे :** विजेता - सुरेश मेश्राम (चंद्रपूर महा औ.वि. केंद्र) उपविजेता - सुहास टावरे ( उरण वायू औ.वि. केंद्र).

**लांब उडी :** विजेता - संतोष ग्रिहे (भुसावळ औ.वि. केंद्र), उपविजेता - महेश मानकर (सांघिक कार्यालय, मुंबई).

**उंच उडी :** विजेता - किरण भिरूड (भुसावळ औ.वि. केंद्र), उपविजेता - सुहास टावरे (उरण वायू औ.वि. केंद्र).

**थाळीफेक :** विजेता - निलेश पाटील, नवीकरणीय ऊर्जा, उपविजेता - दत्तात्रय शिंदे, (भुसावळ औ.वि. केंद्र).

**भालाफेक :** विजेता - सोमनाथ जाधव (भुसावळ औ.वि. केंद्र), उपविजेता रियाज शेख, सांघिक कार्यालय मुंबई.

**गोळाफेक :** विजेता - गणेश छाजलानी (नाशिक औ.वि. केंद्र), उपविजेता - गणेश लांडे (खापरखेडा औ.वि. केंद्र).

**वैयक्तिक खेळनिहाय निकाल (महिला) :**

**१०० मी धावणे :** विजेती - सुनिता पटले (कोराडी औ.वि. केंद्र), उपविजेती - दीपाली दडमल (चंद्रपूर महा औ.वि. केंद्र).

**२०० मी धावणे :** विजेती - डिम्पल पिंगे (चंद्रपूर महा औ.वि. केंद्र), उपविजेती - गायत्री बारंगे (कोराडी औ.वि. केंद्र).

**लांब उडी :** विजेती - लक्ष्मी पाटील (खापरखेडा औ.वि. केंद्र), उपविजेती - अश्विनी बेंदरे (भुसावळ औ.वि. केंद्र).

**उंच उडी :** विजेती - लक्ष्मी पाटील (खापरखेडा औ.वि. केंद्र), उपविजेती - अश्विनी बेंदरे (भुसावळ औ.वि. केंद्र).

**थाळीफेक :** विजेती - शुभांगी साबे (भुसावळ औ.वि. केंद्र), उपविजेती - मीना शेंडे (पारस औ.वि. केंद्र).

**भालाफेक :** विजेती - शुभांगी साबे (भुसावळ औ.वि. केंद्र), उपविजेती - मीना शेंडे (पारस औ.वि.केंद्र).

**गोळाफेक :** विजेती - प्रमिला पाटील (कोराडी औ.वि. केंद्र), उपविजेती - डिम्पल पिंगे (चंद्रपूर महा औ.वि. केंद्र).

**शिस्तबद्ध संघ : उरण वायु विद्युत केंद्र.**

# आम्ही आपले आभारी आहोत

**चंद्रपूर महा औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**नोव्हेंबर २०२३ -** (१) श्री. गंगाराम पुंडलिक कोलते – तंत्रज्ञ-१, (२) श्री. सुधाकर बळवंतराव बोरीकर – तंत्रज्ञ-१, (३) श्री. प्रवीण दत्तात्रय सालोदकर – तंत्रज्ञ-१, (४) श्री. संतोष भुजंगराव मेश्राम – तंत्रज्ञ-१, (५) श्रीमती. रेखा श्रवण सुरजुसे – मदतनीस, (६) श्री. संजय सदाशिव भाले – लघुलेखक, (७) श्री. रमेश महादेव श्रीरामे – ज्येष्ठ केमिस्ट.

**डिसेंबर २०२३ -** (१) श्री. अरुण रायभान तेलगोटे – वॉचमन, (२) श्री. दिपक हरदेव टेकम – कारागीर ग्रेड-डी, (३) श्री. हरिश्चंद्र प्रल्हाद सुतार – रसायनशास्त्रज्ञ, (४) श्री. विजय विक्रम किर्दक – तंत्रज्ञ-१, (५) श्री. वसंत प्रल्हाद पेटकर – तंत्रज्ञ-, (६) श्री. विलास शामराव खेडकर – तंत्रज्ञ-१, (७) श्री. पुरुषोत्तम भगवान ताजने – तंत्रज्ञ-१, (८) श्री. देवराव रामाजी पवार – समयचालक, (९) श्री. लक्ष्मण हरिदास गोडघाटे – स्टेनो टायपिस्ट, (१०) श्री. चरणदास गोमाजी भोंगाडे – तंत्रज्ञ-१.

**जानेवारी २०२४ -** (१) श्री. बाळकृष्ण पात्रू घानोडे – तंत्रज्ञ-१, (२) श्री. जीवन कवडूजी घुगल – तंत्रज्ञ-१, (३) श्री. वीरेंद्र वसंतराव अंबेकर – सहाय्यक अभियंता

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्री. स्वरूपलाल मन्नूलाल नरोटे – तंत्रज्ञ-२, (२) श्री. विठ्ठल जगन महाकुलकर – तंत्रज्ञ-१, (३) श्री. सुनील दत्ताशेट्टी तुप्तेवार – कनिष्ठ अभियंता.

**भुसावळ महा औष्णिक विद्युत केंद्रातून / भुसावळ प्रकल्प येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**नोव्हेंबर २०२३ -** (१) श्री. दिनेश श्रीनिवास झोपे – कार्यकारी अभियंता, भुसावळ प्रकल्प, (२) श्री. विलास साहेबराव महाजन – उप कार्यकारी अभियंता, (३) श्री. प्रकाश धर्मराज उबाळे – उप कार्यकारी अभियंता.

**डिसेंबर २०२३ -** (१) श्री. माधो बाबुराव चौधरी – सहाय्यक अभियंता.

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्री. नरहरी गजानन अहिरराव – उप कार्यकारी अभियंता, (२) श्री. एकनाथ गोविंदा पाटील – उप व्यवस्थापक (मानव संसाधन), (३) श्री. प्रमोद पितांबर भालेराव – सहाय्यक अभियंता, (४) श्री. श्याम पौलाद पाटील – अग्निशामक, (५) दिलीप निवृत्तीनाथ भारांबे – तंत्रज्ञ-१.

**कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**नोव्हेंबर २०२३ -** (१) श्री. हरिश्चंद्र रामसेवक गुप्ता – केमिस्ट, (२) श्री. अरुण नामदेवराव झोरे – तंत्रज्ञ-१, (३) श्री. मधुकर भीमराव येवले – तंत्रज्ञ-१.

**डिसेंबर २०२३ -** (१) श्री. वरलू फकीरा मेश्राम – कार्यकारी अभियंता, (२) श्रीमती. भारती भगवान हाडके – उप व्यवस्थापक (मानव संसाधन), (३) श्री. उल्हास प्रभाकरराव पत्की – तंत्रज्ञ-१, (४) श्री. चंद्रशेखर रामदास उके – वाहन चालक.

**जानेवारी २०२४ -** (१) श्री. केशव वसंतराव घोरमारे – तंत्रज्ञ-१, (२) श्री. राजेंद्र मारोती खेकरे – तंत्रज्ञ-१.

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्री. भरत दशरथ लांडगे – कार्यकारी अभियंता, (निर्मिती बांधकाम, कोराडी), (२) श्री. दिपक माधोराव पेशातवार – फायरमन, (३) श्री. महादेव रामचंद्र रामटेके – तंत्रज्ञ-१, (४) श्री. रवींद्र रामभाऊ गव्हाणे – वाहन चालक, कोराडी स्थापत्य-२.

**खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**नोव्हेंबर २०२३ -** (१) श्री. प्रभाकर तानबाजी बुरेले – वाहन चालक.

**डिसेंबर २०२३ -** (१) श्री. जितेंद्र उद्धवराव टेंभरे – उप मुख्य अभियंता.

**जानेवारी २०२४ -** (१) श्री. प्रदिप वामन भिरुड – केमिस्ट.

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्रीमती. जयश्री तेजराम फुलझेले – उच्चस्तर विभागीय लिपिक (मानव संसाधन), (२) श्री. गणेश फागा नैतम – चार्जमन ग्रेड-१.

**परळी औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**डिसेंबर २०२३ -** (१) श्री. श्रीपती सखाराम चव्हाण – कार्यकारी अभियंता, (२) श्री. भारतभूषण रमेश तावडे – सहाय्यक अभियंता.

**जानेवारी २०२४ -** (१) श्री. अभय गंगाराम शिंदे – उप कार्यकारी अभियंता, (२) श्री. बालाजी त्र्यंबकराव बोंडगे – उप कार्यकारी अभियंता, (३) श्री. शहाजी आनंदराव शिंदे – सहायक अभियंता.

**पारस औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**नोव्हेंबर २०२३ -** (१) श्री. संतोष नारायण शिंगनाड – कार्यकारी अभियंता, (२) श्री. जुगलकिशोर लक्ष्मणराव धवणे – उच्च न्यायालय / वरिष्ठ लिपिक / पूर्व सहाय्यक, (३) श्री. अविनाश दौलत दांडगे – तंत्रज्ञ-१.

**डिसेंबर २०२३ -** (१) श्री. माणिक शालिग्राम वानखेडे – तंत्रज्ञ-१, (२) श्री. शंकर बलराम चेलानी – फार्मिस्ट/कंपाउंडर.

**जानेवारी २०२४ -** (१) श्री. वनदेव दौलत चावरे – चार्जमन ग्रेड-२.

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्री. अनिल भीमसेन दिवाण – कार्यकारी अभियंता, (२) श्री. प्रकाश गोविंद इसाळ – सहाय्यक अभियंता.

**नाशिक औष्णिक विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**नोव्हेंबर २०२३ -** (१) श्री. प्रमोद गंगाकिशनराव कर्णेवार – कनिष्ठ अभियंता, (२) श्रीमती. माधुरी कुमार गैगावले – वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ.

**डिसेंबर २०२३ -** (१) श्री. सुधीर शंकरराव गटलेवार – कार्यकारी अभियंता, (२) श्री. राजू मोहनदास बैरागी – कनिष्ठ अग्निशमन अधिकारी.

**जानेवारी २०२४ -** (१) श्री. शशिकांत छबू पगारे – तंत्रज्ञ-२.

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्री. किरण एकनाथ भामरे – प्रयोगशाळा रसायनशास्त्र.

**कोयना जल विद्युत केंद्र, पोफळी येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्री. भागोजी बाळू तांदळे – मदतनीस.

**उरण वायु विद्युत केंद्रातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**जानेवारी २०२४ -** (१) श्री. धनंजय जगन्नाथ मैंद – वाहनचालक./एफ.ई.ओ.

**सांघिक कार्यालय, मुंबई येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**डिसेंबर २०२३ -** (१) श्री. एकनाथ सुदाम मोझे – मुख्य अभियंता, (२) श्री. विजय रंगनाथ अधांगळे – सहाय्यक अभियंता, (३) श्री. नितीन राजाराम जामघरे – ज्येष्ठ ड्राफ्ट्समन.

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्रीमती. तृप्ती नितीन मुधोळकर – मुख्य महाव्यवस्थापक (लेखा).

**(कोळसा) नागपूर कार्यालयातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**डिसेंबर २०२३ -** (१) श्रीमती. मिनाक्षी नरेंद्र अंबाडेकर – अतिरिक्त कार्यकारी अभियंता.

**येलदरी जल विद्युत केंद्र येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**जानेवारी २०२४ -** (१) श्री. विठ्ठल धोंडूजी तकरस – तंत्रज्ञ-१.

**पानशेत जल विद्युत केंद्र येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्री. मिलिंद यशवंत देसाई – उप कार्यकारी अभियंता.

**घाटघर जल विद्युत केंद्र येथून सेवानिवृत्त झालेले अधिकारी-कर्मचारी :-**

**फेब्रुवारी २०२४ -** (१) श्री. राजेंद्रसिंग प्रतापसिंग पाटील – उच्चस्तर लिपिक/वरिष्ठ लिपिक/आस्थापना सहाय्यक.

**या कष्टाचे मोल जाणून घ्या :-**

- आज अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वीज पुरवठा करणे सोपे झाले असले तरी पूर्वी वीज वितरणात अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. बैलगाडी, सायकलवर शिडी घेऊन जात काम करावे लागत होते.
- वनक्षेत्रात तर हत्तीवरून विजेचे पोल न्यावे लागत होते. आज परिस्थिती बदलली असली तरी ग्रामीण भागात छोट्या गल्ली असल्याने अनेक ठिकाणी वीज कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागतो. अडचणीच्या ठिकाणातून मार्ग काढावा लागतो.
- झुल्यावर बसून विजेच्या पोलवर काम करतानाचे पूर्वी नेहमी दिसणारे चित्र आता दुर्मिळ झाले आहे. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी आजही याच पद्धतीने काम केले जात असल्याचे कर्मचाऱ्यांनी सांगितले.
- नैसर्गिक आपत्तीच्या वेळी वीजपुरवठा खंडित होऊ नये यासाठी विद्युत कर्मचाऱ्याला सतर्क राहावे लागते. अनेक ठिकाणी तर जीव धोक्यात टाकून वीज पुरवठा सुरळीत करावा लागतो.
- करोनाच्या काळात घराबाहेर पडण्याला मनाई होती, अशा महामारीच्या काळातही या कर्मचाऱ्यांनी घरोघरी जाऊन सेवा दिली.
- महापारेषण मोठ्या प्रमाणात वीज पोहचविण्याचे काम करते. ५० हजार सर्किट किलोमीटरपर्यंतच्या लाइनवर लक्ष ठेऊन कुठे दोष आला तर तो दूर केला जातो.
- महापारेषणच्या कर्मचाऱ्यांना ४ लाख व्होल्टवर जाऊन काम करावे लागते. १३२ केव्ही, २२० केव्ही, ४०० केव्ही अशा हायव्होल्टेजमध्ये काम करणे धोक्याचे काम आहे.
- यासाठी कर्मचारी विशिष्ट पद्धतीने तयार केलेला पोषाख परिधान करीत असतात. २५ टक्के स्टिल, ७५ टक्के फायबरपासून तयार झालेला वजनी कोट परिधान करून तासनतास काम करावे लागते.
- आपले नियमित काम सांभाळून संघटनेच्यावतीने विविध सामाजिक उपक्रमही राबविण्यात येतात.

**या अडचणी व्हाव्यात दूर :-**

- ई चार्जिंग, सोलर यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात यावी.
- सबस्टेशनसाठी आजही जागेची मोठी समस्या आहे. महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभागाने ही समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घ्यावा.
- वीज प्रत्येकाला हवी असते, मात्र घरासमोर कोणालाच डीपी नको असते. अशी मानसिकता ठेवली तर वीज वितरणातही अडचणी निर्माण होतात.
- वीज अत्यावश्यक सेवेत मोडते. प्रत्येकाला त्याची गरज आहे, मात्र आजही ४० टक्के ग्राहक वीज बिल भरत नाही.
- आधी पुरेपूर विजेचा वापर करूनही बिल भरण्यासाठी ग्राहक तयार नसतात. वीज कर्मचारी वसुलीसाठी गेल्यानंतर त्यांच्यावर हल्ले करण्याचे प्रकारही घडले आहेत. वसुलीसाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना चांगली वागणूक मिळत नाही. राजकीय हस्तक्षेपामुळे वसुली होऊ शकत नाही, अशी खंतही कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली.
- वीज क्षेत्रात महिलाही मोठ्या प्रमाणात काम करीत आहेत. वसुली करणे, फ्युज कॉल यासह पोलवरचे कामही महिला करू लागल्या आहेत.
- इतर अनेक सेवा प्रिपेड आहेत, आधी पैसे भरल्यानंतरच त्याचा वापर करता येतो. वीजही प्रिपेड करण्यासाठी विचार सुरू आहे, असे कर्मचाऱ्यांनी सांगितले.
- वीजचोरीची समस्या आजही मोठी आहे, काही लोक वीजचोरी करतात, मात्र याचा फटका इतर सर्वसामान्य ग्राहकांना बसतो.
- करोनाच्या काळात २४ तास सेवा देणाऱ्या वीजकर्मचाऱ्याला मात्र फ्रंटलाइन वर्कर म्हणून स्थान मिळाले नाही.
- इतर विभागांप्रमाणे कमी मनुष्यबळावर वीज क्षेत्रातील काम सुरू आहे. सेवेवर याचा परिणाम होतो.
- हायटेन्शन लाइनजवळ मोठ्या प्रमाणात अवैध बांधकाम झाले आहे. यामुळे दुर्घटना होण्याची शक्यताही वाढली आहे.
- पुढील धोके कमी व्हावे यासाठी वीज वाहिन्या भूमिगत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## वायु विद्युत केंद्र उरण येथे ४२व्या वर्धापन दिनानिमित्त सामाजिक बांधिलकी म्हणून रक्तदान शिबीर

महानिर्मितीच्या वायु विद्युत केंद्र उरण येथे मंगळवार दिनांक २० फेब्रुवारी २०२४ रोजी ४२ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने शनिवार दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी दवाखाना विभागात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या रक्तदान शिबिराचे उद्घाटन वायु विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता श्री. सुनील इंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास अधीक्षक अभियंते श्री. सुनील वाघ, श्री. के.स. मुनेश्वर आणि इतर अभियंते, अधिकारी, कर्मचारी तसेच अपोलो हॉस्पिटल, नवी मुंबईचे वरिष्ठ डॉक्टर आणि कर्मचारी उपस्थित होते.

या रक्तदान शिबिरामध्ये एकूण ५१ लोकांनी रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या सर्व रक्तदात्यांना अल्पोपहार आणि प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ. अनुप्रिया सावंत, सहाय्यक कल्याण अधिकारी श्री. योगेश चोपडे, उप कार्यकारी अभियंता सर्वश्री. विजय कारंडे, वैभव धमाल, कविता लांडे यांनी मोलाचे योगदान दिले.

## वीज कर्मचाऱ्यांचे दैनिक महाराष्ट्र टाईम्स वृत्तपत्राच्या सोशन कनेक्ट माध्यमातून ग्राहकांना आवाहन

आज एक दिवसही आपण विजेशिवाय राहू शकत नाही. मात्र असाही काळ होता जेव्हा लोकांना कंदील आणि दिव्याच्या प्रकाशाचीच ओळख होती. विजेचा शोध लागला आणि प्रकाशाचा नवा मार्ग सापडला. आज महाराष्ट्रातील २ कोटी ९० लाख घरांत वीज पोहोचली. बटन दाबली की वीज मिळत असली तरी ती पोहचविण्यासाठी कर्मचाऱ्यांना विविध धोके पत्करावे लागतात. वीज वापरणे हा प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे, मात्र बिलाच्या वसुलीसाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांवर हल्ले करू नका, असे कळकळीचे आवाहन वीज क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी दैनिक महाराष्ट्र टाईम्स – सोशल कनेक्ट उपक्रमात वीज ग्राहकांना केले.

मटा सोशल कनेक्टच्या ८५ व्या भागात वीज क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचारी संघटनांची वाटचाल, विधायक उपक्रम, भेडसावणाऱ्या समस्या आदी मुद्यांवर मंथन झाले. यावेळी महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी वर्कर्स फेडरेशनचे अध्यक्ष मोहन शर्मा, महानिर्मितीचे मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते, सर्वश्री. विलास भालेराव, अविनाश पारसकर, संदीप हिवरखेडकर, संतोष तुराणकर, संदीप घुरडे, मिथून कोडापे, निलेश चरखे, संजय हेलोंडे, प्रशांत नालामवार असे वीज क्षेत्रात काम करणाऱ्या तिन्ही कंपन्यांचे पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

"आपल्या देशातील विविध समाज संस्कृतीचे दर्शन घडविणारा 'महाराष्ट्र टाइम्स'चा 'सोशल कनेक्ट' हा विधायक उपक्रम आहे. प्रत्येक समाजाचा वैभवशाली इतिहास आहे. समाजाची संघर्षमय वाटचाल मांडणाऱ्या 'सोशल कनेक्ट'ला नागपुरातील समाज बांधवांनी भरभरून प्रतिसाद दिला. जातीय विभागणी वा तंटे नव्हे तर सामाजिक एकोपा साधणे, हा या उपक्रमाचा हेतू आहे. आपल्या हक्कासाठी संघटित झालेल्या आणि विविध सामाजिक विषयांवर लढा देणाऱ्या संघटनांनाही या उपक्रमात आता सहभागी करून घेतले जात आहे", अशा शब्दांत 'मटा'चे निवासी संपादक श्री. श्रीपाद अपराजित यांनी 'सोशल कनेक्ट'उपक्रमामागील भूमिका मांडली.

**अंधारातून प्रकाशाकडे :-**

- पूर्वी लाकूड पेटवूनच घरातील चुलीवर स्वयंपाक चालायचा. विहिरींवर मोट बांधून पाणी काढले जात होते. अनेक ठिकाणी बैलांचा वापर करूनच अंगमेहनतीचे काम केले जात होते. रॉकेलचे दिवे लावून आणि मेणबत्ती पेटवूनच घरातील अंधार दूर केला जात होता.
- सर्वप्रथम बेंगळुरू आणि कोलकाता येथे वीज निर्मितीला सुरुवात झाली. महाराष्ट्रात खासगी भांडवलदारांच्या माध्यमातून वीजनिर्मिती केली जात होती.
- सन १९४८ ते १९५० च्या काळात अवघ्या ७६२ मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता असणाऱ्या महाराष्ट्रात आता ३६ हजार मेगावॅट वीजनिर्मितीची क्षमता निर्माण झाली आहे. कोळसा, डिझेल, लाकूड यासारख्या साधनांचा वापर करून वीजनिर्मिती होत होती. त्यावेळी महाराष्ट्रात ९१ खासगी वीजकंपन्या कार्यरत होत्या.
- त्यानंतर वीज हा समाजाचा उद्योग असला पाहिजे, हा विचार पुढे आला. सन १९५३ ते १९५८ मध्ये देशाच्या पंचवार्षिक योजनेत वीजमंडळ तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला.
- बॉम्बे स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड या नावाचे महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्ड, असे नामकरण करण्यात आले. त्यावेळी १३ हजार कामगार काम करायचे. कंत्राटी कामगारांची संख्या ३० हजारांच्या घरात होती.
- सन १९६१ मध्ये वीजकंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन १९६५ मध्ये केंद्र आणि राज्य सरकारने ९१ परवाने ताब्यात घेण्याचा वटहुकूम काढला.
- १० मेगावॅट क्षमतेचे संच आता ६६० मेगावॅटपर्यंत तयार झाले आहेत. महाराष्ट्रात ४१ हजारपेक्षा जास्त गावांत आज वीज पोहचविली जाते.
- सन १९५० च्या काळात महाराष्ट्रात वीज ग्राहकांची संख्या १० हजारांच्या घरात होती, ती आता २ कोटी ९० लाखांच्या घरात गेली आहे.
- औष्णिक आणि जलविद्युत प्रकल्पापासून वीजनिर्मितीला सुरुवात झाली. त्यानंतर पवन, वायू, अणुऊर्जा निर्मिती असा प्रवास सुरू राहिला. आता सोलर ऊर्जेवर अधिक भर दिला जात आहे.
- आज ५ ते ६ टक्के अणु ऊर्जा, ४ ते ५ टक्के पवन ऊर्जा, ४ ते ५ टक्के हायड्रो आणि ७५ टक्क्यांपेक्षा अधिक ऊर्जा औष्णिक ऊर्जेच्या माध्यमातून प्राप्त होते.
- सन १९५५ ते २००० सालापर्यंत वीजेचे उत्पादन कमी आणि मागणी जास्त असे चित्र होते. औद्योगिकीकरणानंतर स्पर्धा सुरू झाली. सन २००५ पासून वीज क्षेत्रात महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण अशा तीन कंपन्यांचा जन्म झाला.
- कोराडी, खापरखेडा वीजकेंद्राची क्षमता २,१९० मेगावॅट असून खापरखेडा वीजकेंद्राची क्षमता १,३४० मेगावॅट आहे. जिल्ह्यात एन.टी.पी.सी. सह इतर खासगी कंपन्यांच्या माध्यमातूनही वीजनिर्मिती केली जाते.
- नैसर्गिक संसाधनांचा वापर करून ऊर्जेची निर्मिती केली तर प्रदूषण कमी होईल, त्यामुळे सौर ऊर्जा वाढीचे उद्दिष्ट ठेऊनच वाटचाल सुरू आहे. मात्र याचा गरजेपेक्षा जास्त वापर झाला तर सिस्टिमवर ताण वाढतो. बॅटरी स्टोअरेजची क्षमता वाढली तर ही समस्या सुटेल, असे वीज कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.
- महाराष्ट्रात ३ लाख १० हजार सर्किट किलोमीटर लाइनमध्ये 'एम.एस.ई.बी.' चे क्षेत्र आहे. जिल्ह्यात तिन्ही कंपन्यांचे मिळून आज २० हजारांच्यावर कर्मचारी काम करतात.

# "डलहौसी हिमालयीन ट्रेकिंग" एक अविस्मरणीय अनुभव.

- प्रदिप ब. दांडगे.
उप कार्यकारी अभियंता, एम.पी.डी. विभाग
पारस औ. वि. केंद्र



हिमालयीन ट्रेकिंगला मला एकदा जायचे होते, YHI तर्फे डलहौसीला ट्रेकिंग कॅम्प बुक केला आणि लागलो तयारीला... डिसेंबरमध्ये जाण्याचे असल्याने ट्रेकिंगचे सर्व सामानाची भली मोठी लिस्ट तयार झाली. पारसमधून आम्ही सात जणांचा ग्रुप सोबत जाणार होतो. प्रत्येकाचे नाव वापरून ट्रेकिंगसाठी चा स्पेशल ट्रॅक सूट "MSPARAS" नावाने करून घेतला होता. जशी ट्रेकिंगची तारीख जवळ येत होती, तशी पॅकिंगची लगबग सुरु झाली, जवळपास दोन दिवस ट्रेनने प्रवास करून पठाणकोटला पोहोचलो व पठाणकोट ते डलहौसी कारने प्रवास करून सर्व ट्रेकर्स ग्रुप डलहौसी बेस कॅम्पला पोहोचला. डलहौसी बेस कॅम्पभोवती धुक्याची चादर सभोवताली पसरलेली होती आणि चहूबाजूला हिमशिखरे उन्हामुळे चमकदार दिसत होती. बेस कॅम्पमध्ये पोहोचल्यावर YHI तर्फे आमचे रितसर स्वागत करण्यात आले व प्रत्येकाला ओळखपत्रे वाटप करण्यात आली. ट्रेकिंगला जाण्याचा माझा पहिलाच अनुभव होता. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व ग्रुपजवळच काही मैलावर असलेले 'पंचकुला' या ठिकाणी फेरफटका मारण्याकरिता गेलो. संध्याकाळी सर्वजण बर्फाच्छादित पोहोलानी माता मंदिर, डायनकुंड येथे सफरीकरिता पोहोचलो आणि बर्फाळ प्रदेशाचा आनंद घेतला. दिवसभरातील थकव्याने झोप कधी लागली कळलेच नाही.

दुसऱ्या दिवशी बेस कॅम्पपासून पंधरा मैल अंतरावर असलेल्या कालाटॉपसाठी ट्रेकला सुरुवात करणार होतो. सकाळी लवकर उठून ट्रेकसाठी लागणारे साहित्य व टिफीन बॅगमध्ये घेऊन निघालो. पहिल्या तासाभरातील चालणे व पाठीवरील बॅगेच्या ओझ्यामुळे माझी दमछाक व्हायला सुरुवात झाली होती व पायाला गोळे येत होते. वाटेत थंड पाणी व थोडा आराम केल्यावर पुढे पुन्हा चढाई सुरु केली. चंपा अभयारण्यतून वाट काढत संध्याकाळी कालाटॉप येथे पोहोचलो. दिवसभरात जवळपास दहा मैल चालणे झाले होते. 'कालाटॉप कॅम्प' येथे पोहोचताच सर्वांनी जमिनीवर लोळण घातली. दिवसभर पायपीट करून ट्रेकिंगमधील पहिल्या दिवसाचा पाडाव पूर्ण केल्याचं समाधान होत. दुसऱ्या दिवशी 'खजियार कॅम्प'ला निघालो. खजियार हे भारतातील 'मिनी स्विर्त्झलँड' म्हणून ओळखले जाते. देवदार वृक्षांच्या जंगलातून वाट काढताना आज मोठी कसरत करावी लागत होती. कालच्या तुलनेत आज बरीच नागमोडी वळणे, खोल दऱ्या व उंच घाट होता. घाट चढताना दमछाक होत होती. खरी ट्रेकिंगची मजा आज येत होती. बरीच मजल दरमजल करत खजियार कॅम्पला पोहोचलो होतो. संध्याकाळी खजियार येथे सूर्यास्त पाहण्याचा आनंद घेतला.

तिसऱ्या दिवशी पहाटे मंगला कॅम्प येथे जाण्याकरिता निघालो. तीन दिवस वेगवेगळ्या ठिकाणी पायी प्रवास करुन एक गोष्ट जाणवली की, आपले जीवन सुध्दा एक प्रवास आहे. जसे ट्रेकिंग करतांना वाटेतील चढ-उतार व अडथळे आपण पार करत असतो, तसेच जीवनात येणारे अडथळे सुद्धा आपण लीलया पार करु शकतो. सोबत जे बॅग (ओझे) घेऊन निघालो होतो ते हेच शिकवत होते की, जीवन जगताना अनावश्यक बाबी सोडून द्यायला हव्यात, नाहीतर त्याचे ओझे होते. ट्रेकिंगचा हा अनुभव आपल्या नक्कीच कामी येईल हा विचार करताना कधी बेस कॅम्पला पोहोचलो हे कळलेचं नाही.

******

## साक्री सौर ऊर्जा प्रकल्प येथे गोदरेज एंड बॉयज ह्यांच्या सामाजिक उपक्रमातून लोककला

महानिर्मिती सौर ऊर्जा प्रकल्प २५ मे. वॅ. साक्री, येथे दि. ११ जानेवारी २०२४ रोजी गोदरेज एंड बॉयज ह्यांच्या सामाजिक उपक्रमातून संरक्षण भिंतीवरील रेखाटलेल्या लोककला दर्शवणारी चित्रे व सुशोभिकरणाचा बक्षीस वितरण पार पडला.

कै. जी.के. नांद्रे चित्रकला महाविद्यालय, साक्री येथील विद्यार्थी-विद्यार्थीनी, शिक्षक-कर्मचारी यांनी सलग तीन दिवस वारली चित्र, तसेच सामाजिक व नवीकरणीय उर्जा, लोककला प्रदर्शनपर विविध विषयांवर चित्र रेखाटून सदर उपक्रम यशस्वी केला.

कार्यक्रम अध्यक्षस्थानी मुख्य अभियंता नवीकरणीय ऊर्जा (प्रकल्प) पुणे कार्यालय श्री. किशोर राऊत यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून लोककला जोपासणे तसेच आत्मविश्वास वाढविण्यासाठी ह्या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. तसेच अतिशय कमी वेळात सुंदर कलानिर्मितीबद्दल आनंद व्यक्त केला.

कार्यक्रमास श्री. प्रमोद देसले, श्री. प्रवीण सदादेकर, प्रा. सुधीर कासार, श्री. महेश चौधरी, श्री. रविकांत बोरसे, , सौ. बीरारीस मॅडम उपस्थित होते तसेच सूत्रसंचलन श्री. राघवेंद्र चौहान ह्यांनी केले.

## Inauguration of Training Batch K-96, 97 & 98 at Koradi Training Centre

Training Batch K-96,97 & 98 of newly recruited DET/GET inaugurated at the esteemed Koradi Training Centre on Dt.12.02.2024. No. of trainees 105 were present for the inaugural ceremony.

The ceremony was graced by the presence of Mr. Pankaj Sapate, E.D. (O&M- II), Mr. Rajesh Morale, Chief Engineer Koradi Training Centre along with Mrs. Bharati Vijaykar and Mrs. Aruna Bhendekar, Superintending Engineer, KTC.

The 52 weeks induction level Training will be conducted according to Indian Electricity Act rules for the above batches.

Mr. Sapate, Mr. Morale, Mrs. Vijaykar and Mrs. Bhendekar have extended their heartfelt welcome to all the trainees joining the Mahagenco family and emphasized the importance of responsibility and professionalism in becoming expert engineers.

All the trainees were presented with a Welcome Kit, symbolizing commitment to their growth and development throughout the training program and all the staff members of KTC were present on this momentous occasion.

Program compered by Mr. Balu Ratnaparkhi A.E.E., Incharge E.E. of group 4 while introductory remark made by Mrs. Vidhya Bakde, E.E. (Admin), Vote of thanks made by Mrs. S. Suke A.E.E., Incharge E.E. group 2.

## महानिर्मितीचे मुख्यालय प्रकाशगड येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी.

महानिर्मिती आणि महावितरण मुंबई मुख्यालय 'प्रकाशगड' येथे दिनांक १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महानिर्मितीचे संचालक (खनिकर्म) डॉ. धनंजय सावळकर यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले.

रयतेचे आणि न्यायाचे राज्य स्थापन करताना छत्रपती शिवाजी महाराज यांनी समाजातील सर्व घटकांना सोबत घेतले यामुळेच त्यांना "जाणता राजा" संबोधले जाते. परकीय आक्रमणापासून रयतेचे संरक्षण करताना त्यांनी शेतकरी, कष्टकरी आणि श्रमिकांना न्याय दिला. त्यांचे चरित्रामधील आदर्शवत गुण आपण वैयक्तिक आयुष्यामध्ये अंगीकारण्याचा प्रयत्न करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. धनंजय सावळकर यांनी व्यक्त केले.

या प्रसंगी महावितरणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके, महानिर्मितीचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजूरकर, मुख्य अभियंता (स्थापत्य) म.रा.वि. मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या. श्री. राकेश जनबंधू तसेच वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## सांघिक कार्यालय, मुंबई येथे मानव संसाधन विभागातर्फे अधिकारी-कर्मचाऱ्यांसाठी "आनंदी जीवनाचे राजमार्ग" अभिनव कार्यक्रम

ऊर्जा उत्पादन क्षेत्रात कार्यरत महानिर्मिती मनुष्यबळाचे दैनंदिन कौटुंबिक तसेच कार्यालयीन जीवन सुखी-आनंदी रहावे, तणावमुक्त रहावे यासाठी सुप्रसिद्ध वक्ते श्री. अशोक देशमुख यांचे "आनंदी जीवनाचे राजमार्ग" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महानिर्मिती 'गतिमान प्रशासन-मानव संसाधन' या संकल्पनेनुसार या अभिनव उपक्रमाचे आयोजन सभागृह ६ वा माळा, प्रकाशगड, वांद्रे पूर्व येथे करण्यात आले. याप्रसंगी महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. आनंद कोंत प्रामुख्याने उपस्थित होते.

संचालक (खनिकर्म) डॉ. धनंजय सावळकर यांच्या विशेष पुढाकारातून या अभिनव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अशोक देशमुख यांनी आनंदी जीवनाचे १० राजमार्ग सांगितले त्यामध्ये विशेषत: बोलणे, हसणे, चालणे, दुसऱ्याच्या आनंदात सहभागी होणे, पुरेशी निद्रा, प्राणायाम, पैसा, ताल-सूर, दान, योग इत्यादींचा समावेश होता. अतिशय विनोदी शैलीत मार्मिक उदाहरणांसह त्यांनी विषयाची उकल करून उपस्थितांची मने जिंकली.

या सोबतच आत्महत्या करू इच्छिणाऱ्या व्यक्तीची अडीच मिनिटे किती महत्वाची असतात, नेमके त्यावेळेस काय केले पाहिजे हे त्यांनी सांगितले. छोट्या-छोट्या व्यायामातून व्याधी अंगदुखी कशी दूर करावी हे प्रात्यक्षिकांसह त्यांनी सांगितले. अपचन, अनियमित जेवण, उशिरा झोप, चहाचा अतिरेक, मनातील विचारांचे काहूर कसे दूर करायचे, तणावाचे प्रकार, तणावाच्या पायऱ्या, राग कमी करण्यावर उपाययोजना तसेच मित्र, टाळ्या, नादब्रम्ह, ओंकार जप आणि पर्यटनाचे महत्व त्यांनी पटवून सांगितले. सलग दोन तास अगदी सोप्या भाषेत, हसतखेळत त्यांनी प्रेक्षकांची मने जिंकली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सोनाली चुंगडे यांनी तर मानव संसाधन विभागामार्फत आभार मुख्य महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. आनंद कोंत यांनी मानले.

## महानिर्मितीच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा

पारस औष्णिक विद्युत केंद्र संच क्र. ४ ने दिनांक ०२ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ०७:४५ वा. अविरत वीज उत्पादनाचा २०० वा दिवस पूर्ण केला आणि यापुढेही १००% पेक्षा अधिक क्षमतेने अविरत वीजनिर्मिती करण्याच्या मनोदय पारस औष्णिक विद्युत केंद्राच्या दोन्ही ३ व ४ संचांनी केला आहे. नुकतेच या दोन्ही संचांनी एकापाठोपाठ एक अविरत १०० दिवसांचा तसेच केंद्र म्हणूनही १०० दिवसांचा विक्रम याच काळात पूर्ण केला आहे.

"मुख्यालयाच्या वरिष्ठ व्यवस्थापनाचे मार्गदर्शन आणि हे आपल्या सर्व अधिकारी, अभियंते, कर्मचारी, कंत्राटदार, कंत्राटी कामगार व पारस औष्णिक विद्युत केंद्राला अखंड सेवा पुरविणाऱ्या सर्वांच्या मेहनतीचे फलित आहे. यापुढेही आपण अशीच कार्यक्षम कामगिरी करून नवनवीन मानांकने स्थापित करू असा मला सार्थ विश्वास आहे. पुन्हा एकदा सर्वांचे मनापासून अभिनंदन आणि भरभरून शुभेच्छा." असे गौरवोद्गार पारस औ.वि. केंद्राचे मुख्य अभियंता श्री. शरद भगत यांनी केले.

## Inauguration of Training Batch N72 and N73 at Nashik Training Centre

Training Batch N72 and N73 of newly recruited DET/GET inaugurated at the esteemed Nashik Training Centre on Dt.12.02.2024.

Mrs. Gitanjali Parkhi, Superintending Engineer, Nashik Training Centre, extended a warm welcome to all the trainees, emphasizing the importance of their role as responsible engineers within Mahagenco. The trainees were welcomed with a Welcome Kit, symbolizing our commitment to their growth and development throughout their training journey. Mr. Jayant Deore (EE-Admin), Mr. Kahale (Addl EE - ILT), and all the staff members of Nashik Training Centre were present on this momentous occasion.

## ONE MORE FEATHER IN THE CAP OF MAHAGENCO

MAHAGENCO has achieved 50000 MUs Thermal Generation on 26/02/2024 for FY 2023-24.

During FY 2022-23, MAHAGENCO had achieved the same on 22/03/2023.

It's an impressive achievement for MAHAGENCO, consistently hitting such milestones demonstrates commitment to excellence and teamwork. Kudos to everyone involved for their hard work and dedication. Special thanks to Hon CMD Sir for "5E Mantra" & for whole hearted guidance and support from Mahagenco Management.

## फलटण, पुणे येथील शायनिंग महाराष्ट्र - २०२४" मध्ये महानिर्मितीच्या दालनाला "सर्वोत्तम दालन" पुरस्कार जाहीर

दिनांक १९ ते २१ फेब्रुवारी या काळामध्ये फलटण येथे आयोजित "शायनिंग महाराष्ट्र - २०२४" या भव्य प्रदर्शनामध्ये महानिर्मिती दालनाला सर्वोत्तम दालन पुरस्कार प्राप्त झाला. केंद्र शासन आणि राज्य शासन यांच्या उपक्रमातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना जनतेपर्यंत पोचविण्याच्या दृष्टिकोनातून हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

कोल पाईप कन्व्हेयर प्रणाली, देशातील पहिला पथदर्शी सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्प, औष्णिक वीज निर्मिती केंद्रामधील राखेचा पुनर्वापर अशा पर्यावरण संरक्षणाकरिता करण्यात येत असलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले होते.

महानिर्मितीतर्फे सौर ऊर्जा, उदंचन जल विद्युत प्रकल्प, भुसावळ येथे उभारण्यात येत असलेला हरित हायड्रोजन प्रकल्प असे अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रामध्ये महानिर्मितीतर्फे उभारण्यात आलेले आणि नियोजित प्रकल्प याबाबत माहिती या दालनाच्या माध्यमातून प्रदर्शित करण्यात आली. प्रदर्शनामध्ये उभारण्यात आलेला "शक्तिमान सेल्फी पॉईंट" दालनाचे विशेष आकर्षण ठरला.

एकूणच वरील उपक्रमांचे प्रभावी सादरीकरण तसेच सोप्प्या भाषेमध्ये दालनामध्ये देण्यात येणारी माहिती यामुळे परीक्षकांतर्फे महानिर्मिती दालनाची निवड करण्यात आली. महानिर्मिती जनसंपर्क विभागातर्फे प्रदर्शित या दालनाला कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन व सुसंवाद) श्री. पंकज नागदेवते तसेच मुख्य अभियंता (सौर) श्री. संजय कुऱ्हाडे यांचे मार्गदर्शन लाभले. महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (खनिकर्म) मा.डॉ. धनंजय सावळकर यांनी जनसंपर्क विभाग तसेच सौर विभागाचे विशेष अभिनंदन केले.

महानिर्मितीच्या दालनाला मा. खासदार श्री. रणजीतसिंह नाईक निंबाळकर, जिल्हा परिषद अध्यक्ष तसेच लोकप्रतिनिधी आणि मान्यवर यांनी भेट देऊन कौतुक केले.

# सोलापूर माळरानावरील जैवविविधता... !

– मंजुनाथ अशोक बगाडे,
उपकार्यकारी अभियंता (इंधन व्यवस्थापन).
सांघिक कार्यालय, मुंबई.



सोलापूर जिल्हा हा दख्खनच्या पठारावरील एक प्रमुख जिल्हा. सोलापूर जिल्ह्याला वरदान ठरलेल्या उजनी धरणामुळे सोलापूर जिल्ह्याला पिण्याचे पाणी व शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणी मिळते.

सोलापूर जिल्हा हा पठारी भाग असल्यामुळे व उजनीमुळे सिंचन प्रभावित बराचसा भाग यामुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये पक्षी व प्राणी जैवविविधता आढळते. विरळ दिसण्यात येणारे पक्षी व प्राणी पाहण्यासाठी देशभरातून लोकांची पसंती ठरते सोलापूर चे माळरान.

पुणे, हैदराबाद, बेंगळुरु सारख्या जवळच्या मोठ्या शहरातून वन्यजीव छायाचित्रकारांची दरवर्षी न चुकता सोलापूर माळरानावर हजेरी लागते. सोलापूर माळरानावरील दुर्लभ दिसण्यात येणारे पक्षी व प्राणी म्हणजे माळढोक, ससाणा, लांडगा, कोल्हा, तरस व जंगली मांजर. माळढोक, लांडगा, तरसचे दर्शन म्हणजे एका सेलिब्रिटीसारखेच. वाघाच्या दर्शनापेक्षा यांचे दर्शन सध्या दुर्लभच.  एखादा वन्यजीव छायाचित्रकार संपूर्ण कॅमेरा मेमरी कार्ड संपवेल पण त्याचे मन भरणार नाही अशी परिस्थिती.

मी उजनी जल विद्युत केंद्र येथे कार्यरत असताना मला जेव्हा सुट्टी मिळायची तसा मी जवळच्या माळरान किंवा पाणथळीला भेट द्यायचो व पक्षी निरीक्षण हे ठरलेलं असतं.

असाच मी एकदा सोलापूर शहराजवळच माळरानावर सुट्टीच्या दिवशी पक्षी निरीक्षणासाठी फेरफटका मारण्यासाठी सायंकाळी निघालो असता, मला अतिशय दुर्मिळ अश्या माळढोक पक्ष्याचे दर्शन झाले. सर्वप्रथम, तर मला माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसला नाही, कारण दोन वर्षापासून माझे जे स्वप्न होते ते पूर्ण होत होते. मी प्रथमच माळढोक पक्षी पाहत होतो. सोलापूर जिल्ह्यामध्ये एकच माळढोक पक्ष्याचे वावर आहे. संपूर्ण महाराष्ट्रात, सोलापूर मध्ये १ व चंद्रपूर जिल्ह्यातील वरोराजवळ १ माळढोक पक्ष्याची नोंद आहे. जगभरात १५० च्या आसपास या पक्ष्यांची गणना. इंटरनॅशनल युनिअन फॉर कंझर्वेशन ऑफ नेचर (IUCN) हा जागतिक स्तरावर वेगवेगळ्या प्रजातींच्या संरक्षण स्थितीवर लक्ष ठेवणारा सर्वोच्च संघ आहे. विविध देश आणि संस्था राजकीय व्यवस्थापन एकमेकांमध्ये एखादी प्रजात नामशेष होण्याच्या धोक्याचे मूल्यांकन करून प्रादेशिक लाल याद्यांच्या शृंखला तयार करतात. माळढोकचे कमी होत चाललेले अस्तित्व पाहून या संघाने माळढोक पक्ष्याला संरक्षणासाठी व विशेष लक्ष ठेवण्यासाठी अतिशय चिंताजनक प्रजाती यादी मध्ये समाविष्ट केले आहे.

अतिशय दुर्लभ असा पक्षी मनसोक्त सोलापूरच्या माळरानावर मला दिसला, याला मी माझे भाग्यच समजतो. माळढोक डोळे भरुन पाहिला आणि हात कॅमेराकडे गेले, कॅमेरा क्षणार्धात नकळत सेट सुद्धा झाला आणि मी माळढोकच्या अदा टिपण्यात मंत्रमुग्ध झालो. (छायाचित्र क्रं १).

निसर्ग, तुम्हाला तुम्ही मागता त्यापेक्षा नक्कीच जास्त देतो. मी माळढोकचे छायाचित्र टिपण्यात मुग्ध असताना एका लांडग्याचे माळरानावर आगमन झाले. दुग्धशर्करा योग म्हणा... अतिशय दुर्मिळ असा माळढोक पक्षी व लांडगा एकाच फ्रेममध्ये टिपण्याचे मला भाग्य लाभले. (छायाचित्र क्रं २). हा क्षण मला अविस्मरणीय तर राहिलाच आणि सोलापूरचे माळरान जैवविविधतेने किती भरभरुन आहे, याची प्रचिती देखील आली.

या क्षणाचे छायाचित्र इंस्टाग्राम, सोशल मिडिया माध्यमातून मी शेयर केल्यावर देशभरातील अनेक वन्यजीव छायाचित्रकारांनी कौतुक करुन प्रतिक्रिया दिल्या.

******



## उरण वायु विद्युत केंद्राचा ४२ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात संपन्न

वीज निर्मितीमध्ये एकजुटीने प्रत्येक महिन्यात वीज निर्मितीचे नवनवीन उच्चांक आपण गाठलेले आहेत. नफा तोटा यांचा विचार करून परिश्रमामध्ये सातत्य ठेवून वीज निर्मितीला पुढे घेऊन जायचे असून महानिर्मितीला देशात अग्रेसर बनवायचे आहे असे प्रतिपादन महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर यांनी केले.

वायु विद्युत केंद्र उरण येथील ४२व्या वर्धापन दिन समारंभाप्रसंगी आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. याबरोबर त्यांनी वायु विद्युत केंद्राचे झिरो डिसअलाऊन्स लक्ष्य पूर्ण केल्याबद्दल अभिनंदन करून भविष्यात आणखी जास्त वीज निर्मिती करतील असा विश्वास व्यक्त केला.

प्र. संचालक (खनिकर्म) मा.डॉ. धनंजय सावळकर यांनी विविध स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले, तसेच यावर्षी १२०० पदे भरलेली आहेत व लवकरच आणखी ८०० पदे भरती करण्याचा मानस व्यक्त केला.

प्रारंभी कार्यकारी अभियंता श्री. पी.डी. महातुगडे यांनी प्रास्ताविकात वर्धापन दिनानिमित्त झालेल्या सर्व स्पर्धा कार्यक्रम तसेच वीज निर्मिती केंद्राचा आढावा घेतला. यावेळी कार्यकारी संचालक (संचलन व सुव्यवस्था-२) श्री. पंकज सपाटे, तत्कालीन कार्यकारी संचालक (प्रकल्प) श्री. पंकज नागदेवते यांची समर्पक भाषणे झाली.

आयोजन समितीचे अध्यक्ष मुख्य अभियंता श्री. सुनील इंगळे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतात अनेक वर्षापासून बंद असलेली वायु विद्युत केंद्रातील GT 5 व A0 या युनिटच्या दुरुस्तीची कामे सुरू असून ते लवकरच सेवेत येतील. तसेच भविष्यात वायु विद्युत केंद्र आणखी भरीव कामगिरी करून दाखवेल, असे आश्वासित केले. वर्धापन दिन आयोजनाची जबाबदारी उत्तमपणे पार पडल्याबद्दल चाचणी व उपकरणीय विभागात कार्यरत सर्व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करून, विविध स्पर्धात उत्साहाने सहभाग नोंदवून अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात वर्धापन दिन साजरा केल्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले.

संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर आणि इतर सर्व मान्यवरांच्या हस्ते वर्धापन दिन विविध स्पर्धेचे बक्षिस वितरण विविध कला व स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवलेल्या गुणवंत कर्मचाऱ्यांचा, कर्मचाऱ्यांच्या मुलांचा पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास सर्वश्री. सुनील वाघ, बी.डी. ताम्हणकर, एन.एल. ठोंबरे, पी.डी. सोनवणे, आर.एन. लाळगे, संदीप मस्के, पी.डब्ल्यु. पाठक, अविनाश चव्हाण तसेच सर्व अधिकारी कर्मचारी व कुटुंबीय उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रियंका बुरड व प्रियंका पाटील यांनी केले तर आभार श्री. योगेश चोपडे यांनी मानले.


## महानिर्मिती प्रकल्प विषयक संकल्प २०२४

महानिर्मितीने व्हिजन-२०३५ अन्वये आगामी अकरा वर्षांत एकूण स्थापित क्षमता ३० हजार मेगावॅट (३० गिगावॅट) करण्याचा निर्धार केला असून त्यात सुमारे ८ हजार मेगावॅट स्थापित क्षमतेचे नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प उभारण्याचा निश्चय केला आहे. एकूणच औष्णिक विद्युत उत्पादनाकडून नैसर्गिक संसाधनांचा पुरेपूर वापर करीत पर्यावरणपूरक वीज उत्पादनाकडे आगामी काळात महानिर्मितीचा विशेष कल राहणार आहे. सात वर्षांच्या कालावधीत हे नाविन्यपूर्ण, खडतर आणि आव्हानात्मक काम असल्याने आगामी २०२४ आणि २०२५ या वर्षांत महानिर्मितीला अनेक आघाड्यांवर रणनीती आखून अतिशय नियोजनबद्ध अधिक जोमाने काम करावे लागणार आहे. यामध्ये मनुष्यबळाला आवश्यक प्रशिक्षण, पायाभूत सुविधांचा विकास, नैसर्गिक साधनांची उपलब्धता, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, दस्तावेज, कायदेशीर बाबी, अटी व शर्ती, जमीन अधिग्रहण यासारखी कामे करून प्रत्यक्ष प्रकल्प अंमलबजावणी करावी लागणार आहे, हे विशेष.

त्यामुळे २०२४ च्या संकल्पात प्रामुख्याने ६६० मेगावॅट क्षमतेचा भुसावळ प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालवून त्यातून वाणिज्यिक तत्वावर वीज उत्पादन सुरू करणे, कोराडी येथे २×६६० मेगावॅट क्षमतेच्या अत्याधुनिक औष्णिक विद्युत प्रकल्पाची प्राथमिक कामे पूर्ण करून प्रकल्प कामे सुरू करणे. सौर ऊर्जेवर आधारित महानिर्मितीचा भुसावळ येथे ग्रीन हायड्रोजन प्रकल्प कार्यान्वित करणे, ६६२ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाच्या कामांना गती देणे, महानिर्मितीच्या २३ संचांसाठी फ्ल्यू गॅस डीसल्फरायझेशन संयंत्र उभारणी करून त्या कामांना गती देणे, मेसर्स एस.जे.व्ही.एन., महाऊर्जा, राहुरी कृषी विद्यापीठ यांचे समवेत झालेल्या सामंजस्य करारानुसार पुढील कार्यवाही करणे, इरई धरणावर १०५ मेगावॅट आणि निम्न वर्धा धरणावर ५०५ मेगावॅट क्षमतेचे तरंगते सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे तसेच वेस्टर्न कोलफिल्डस् लि. च्या खाणीतून थेट पाईप कन्व्हेयर प्रणालीद्वारे कोराडी आणि खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राना कोळसा वहन करणे आणि चंद्रपूर शहरात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचे रितसर उद्घाटन करणे इत्यादी कामांना प्राधान्य देण्यात येणार असून, महानिर्मिती प्रकल्प नियोजन चमू यासाठी सज्ज झाली असल्याचे संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे यांनी सांगितले.

# लोक आपल्या आयुष्यात का येतात?

– आनंद आबाराव कोंत,
**मुख्य महाव्यवस्थापक (मानव संसाधन),**
**सांघिक कार्यालय, मुंबई.**



लोक तुमच्या आयुष्यात नेहमीच एका कारणासाठी, ऋतूसाठी आणि आयुष्यभर येतात. ते कोणते आहे हे समजल्यावर, नेमके काय करायचे ते कळते.

जेव्हा एखादी व्यक्ती तुमच्या जीवनात एखाद्या कारणासाठी असते, तेव्हा ती सहसा तुम्ही बाहेरून किंवा आतून व्यक्त केलेली गरज पूर्ण करण्यासाठी असते. ते तुम्हाला एखाद्या अडचणीतून मदत करण्यासाठी किंवा तुम्हाला मार्गदर्शन आणि आधार देण्यासाठी, तुम्हाला शारीरिक, भावनिक किंवा आध्यात्मिकरित्या मदत करण्यासाठी आले आहेत. ते तुम्हाला देवदूत वाटू शकतात आणि ते आहेत. ते एका कारणास्तव तेथे आहेत, आपल्याला ते असणे आवश्यक आहे.

मग, तुमच्याकडून किंवा गैरसोयीच्या वेळी कोणतीही चूक न करता, ही व्यक्ती नातेसंबंध संपुष्टात आणण्यासाठी काहीतरी सांगेल किंवा करेल. कधीकधी ते मरतात, कधी ते फक्त दूर जातात. काहीवेळा ते उठून किंवा बाहेर कृती करतात आणि तुम्हाला भूमिका घेण्यास भाग पाडतात. आपली गरज पूर्ण झाली आहे, आपली इच्छा पूर्ण झाली आहे हे आपण समजून घेतले पाहिजे; त्यांचे काम झाले आहे. तुम्ही पाठवलेल्या प्रार्थनेचे उत्तर दिले गेले आहे आणि आता पुढे जाण्याची वेळ आली आहे.

जेव्हा लोक तुमच्या आयुष्यात सीझनसाठी येतात, तेव्हा तुमची पाळी शेअर करण्याची, वाढण्याची किंवा शिकण्याची असते. ते तुम्हाला शांततेचा अनुभव देऊ शकतात किंवा तुम्हाला हसवू शकतात. ते तुम्हाला असे काहीतरी शिकवू शकतात जे तुम्ही कधीही केले नाही. ते सहसा तुम्हाला अविश्वसनीय आनंद देतात. विश्वास ठेवा! ते वास्तव आहे! पण, फक्त एका हंगामासाठी आणि जसे वसंत ऋतु उन्हाळ्यात आणि उन्हाळा शरद ऋतूकडे वळतो, ऋतू अखेरीस संपतो.

आयुष्यभर, नाती तुम्हाला आयुष्यभर धडा शिकवतात; भक्कम भावनिक पाया असण्यासाठी त्या गोष्टी तुम्ही तयार केल्या पाहिजेत. तुमचे काम धडा स्वीकारणे, व्यक्ती/लोकांवर (असो) प्रेम करणे, आणि तुम्ही जे शिकलात ते तुमच्या जीवनातील इतर सर्व नातेसंबंध आणि क्षेत्रांमध्ये वापरणे हे आहे. असं म्हणतात की प्रेम आंधळं असतं पण मैत्री ही दावेदार असते.

माझ्या आयुष्याचा भाग झाल्याबद्दल धन्यवाद...

## मानव संसाधन – प्रशिक्षण विभागातर्फे "ताण व वेळ व्यवस्थापन" प्रशिक्षण सत्र

सांघिक कार्यालय, मुंबई येथे महानिर्मितीचे मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत यांचे अध्यक्षतेखाली व मानव संसाधन – प्रशिक्षण विभागातर्फे महानिर्मितीच्या अधिकारी–कर्मचाऱ्यांसाठी "ताण व वेळ व्यवस्थापन" प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले.

सदर प्रशिक्षण सत्र डॉ. वर्षा गुप्ता यांनी सादर केले. तत्पूर्वी मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत ह्यांनी प्रमुख वक्ते डॉ. वर्षा गुप्ता यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. डॉ. वर्षा गुप्ता ह्या ई–गुरुकुल येथे बायोकेमिस्ट्री विभागात फॅकल्टी म्हणून कार्यरत आहेत. तसेच त्यांनी युनिव्हर्सिटी ऑफ सायन्स, फिलाडेल्फिया येथून पी.एच.डी., एम.एस., तर यु.एस.ए. येथून डॉक्टरेट पदवी संपादित केली असून हार्वर्ड मेडिकल स्कूल येथून बी.पी.डी. साठी सामान्य मानसिक व्यवस्थापन सर्टिफिकेट त्यांना प्राप्त झाले आहे. त्यांच्याकडे यु.एस. आणि भारतात दोन दशकांपेक्षा अधिक शैक्षणिक अनुभव आहे.

डॉ. वर्षा गुप्ता यांनी आपल्या सामाजिक, वैयक्तिक आणि कामामध्ये ताण व वेळ व्यवस्थापन याचा योग्य वापर करुन आपले जीवन सकारात्मक पध्दतीने समृध्द कसे करावे याबद्दल सादरीकरणामार्फत यथोचित मार्गदर्शन केले.

सदर प्रशिक्षण सत्रास महानिर्मितीचे वरिष्ठ अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मानव संसाधन–प्रशिक्षण विभागाच्या उप कार्यकारी अभियंत्या सौ. सोनाली चुंगडे यांनी केले.

# महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र बाह्यगृह क्रीडास्पर्धा चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र येथे संपन्न















महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र बाह्यगृह क्रीडा स्पर्धा २०२३-२४ चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र, ऊर्जानगर वसाहत येथे संपन्न झाली. सदर क्रीडास्पर्धेत चंद्रपूर, कोराडी, खापरखेडा, नाशिक, भुसावळ, पारस, परळी, पोफळी, मुंबई, नविकरणीय ऊर्जा आणि उरण इत्यादी विद्युत केंद्रांचे संघ सहभागी झाले होते. सदर बाह्यगृह क्रीडा स्पर्धेचा बक्षिस वितरण/ समारोह संपन्न झाला. यावेळी उपस्थित मान्यवर अतिथींची मार्गदर्शनपर भाषणे झाली. विजेत्या संघाला आणि स्पर्धकांना मान्यवर अतिथींच्या हस्ते पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले, त्याप्रसंगीची ही क्षणचित्रे.



































## मा. अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी महानिर्मितीमध्ये नव्याने रुजू झालेल्या प्रशिक्षणार्थींशी साधला सुसंवाद




महानिर्मितीमध्ये नव्याने रुजू झालेल्या प्रशिक्षणार्थींशी अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर तसेच मुख्य अभियंता (प्रशिक्षण) कोराडी-नाशिक श्री. राजेश मोराळे सुसंवाद साधला. अधीक्षक अभियंता (नाशिक प्रशिक्षण केंद्र) सौ. गीतांजली पारखी यांनी मान्यवरांचे तसेच उपस्थितांचे आभार मानले. नाशिक प्रशिक्षण केंद्राचे कार्यकारी अभियंता (प्रशासन) श्री. जयंत देवरे यांनी प्रभावी संचलनातून दुहेरी संवाद साधला, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.





## महानिर्मितीचे मुख्यालय प्रकाशगड येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी




महानिर्मिती आणि महावितरण मुंबई मुख्यालय प्रकाशगड येथे महानिर्मितीचे संचालक (खनिकर्म) मा. डॉ. धनंजय सावळकर यांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. या प्रसंगी मुख्य अभियंता (स्थापत्य) म.रा.वि. मंडळ सूत्रधारी कंपनी मर्या. श्री. राकेश जनबंधू महावितरणचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके, महानिर्मितीचे मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजूरकर तसेच वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.

## कोराडी औष्णिक विद्युत केंद्र वसाहतीत योग प्रशिक्षण वर्ग





कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातील अधिकारी-कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियांसाठी कोराडी औ.वि. केंद्रातील वसाहतीत विशेष योग प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले, त्यावेळी उपस्थित वसाहतवासी.

## महानिर्मितीचा नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प विकासकांशी थेट संवाद






महानिर्मितीच्या वतीने देशपातळीवरील अनुभवी नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प विकासकांशी संवादात्मक बैठक मुंबई येथे आयोजित करण्यात आली. यावेळी सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन यांनी भुषविले, याप्रसंगी संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, प्र. संचालक (खनिकर्म) मा.डॉ. धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक श्री. पंकज नागदेवते, श्री. राजेश पाटील, डॉ. नितीन वाघ, श्री. नितीन चांदुरकर तसेच मुख्य अभियंते सर्वश्री. राजेशकुमार ओसवाल, संजय कुऱ्हाडे, किशोर राऊत तसेच अन्य वरिष्ठ अधिकारी व देशभरातर्गत नवीकरणीय ऊर्जा प्रकल्प विकासक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उप मुख्य अभियंता (सौर) श्री. अजय बगाडे यांनी, तर आभार प्रदर्शन मुख्य अभियंता (सौर) श्री. संजय कुऱ्हाडे यांनी केले, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.









## INDIA ENERGY WEEK EXHIBITION AT GOA






**India Energy Week Exhibition held at Goa between 6th to 9th February 2024. Hon'ble Director (Projects) Shri. Abhay Harne & MREL Chief General Manager Shri. Abhijit Kulkarni, General Manager Shri. Harshal Bhaskare and Shri. Vijay Patil prominently visited.**






## महाजनको रिन्युएबल एनर्जी लिमिटेड (MREL), होमीहायड्रोजन व h2e यांच्यात तांत्रिक सहकार्य व व्यवसायवृद्धीसाठी 'कार्यकक्षा करार' (Framework Agreement)





सदर कराराप्रसंगी महाजेनको रिन्यूएबल एनर्जी लिमिटेडतर्फे व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, संचालक (वित्त) मा.श्री. बाळासाहेब थिटे, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे तर श्री सिद्धार्थ मयूर, संस्थापक आणि व्यवस्थापकीय संचालक, h2e पॉवर सिस्टम प्रायव्हेट लिमिटेड, श्री. चंद्रशेखर गोखले, श्री आदित्य गोखले भागीदार तसेच डॉ. प्रशांत कामत, संचालक homiHYDROGEN प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (खनिकर्म) मा.डॉ.धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक सर्वश्री पंकज नागदेवते, राजेश पाटील, नितीन चांदूरकर, कंपनी सचिव श्री. राहुल दुबे, मुख्य अभियंते श्री. संजय कुऱ्हाडे, श्री. अजय बामणे, श्री. दत्तात्रय साळुंखे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. आनंद कोंत, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा) श्री. राजीव मालेवार तसेच मुख्य महाव्यवस्थापक (एम.आर.ई.एल.) श्री. अभिजित कुलकर्णी, महाव्यवस्थापक (एम.आर.ई.एल.) श्री. हर्षल भास्करे प्रामुख्याने उपस्थित होते.





## भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त "महानिर्मिती शाश्वत हरित ऊर्जेकडे" या संकल्पनेवर आधारित महानिर्मितीचा आकर्षक चित्ररथ






भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त शिवाजी पार्क मुंबई येथे २६ जानेवारी २०२४ रोजी "महानिर्मिती शाश्वत हरित ऊर्जेकडे" या संकल्पनेवर आधारित अत्यंत आकर्षक चित्ररथ ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन अंतर्गत महानिर्मितीतर्फे सादर करण्यात आला. सदर चित्ररथ प्रकाशगड येथे प्रदर्शनीसाठी ठेवण्यात आला होता. त्यावेळी महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा.डॉ. पी. अन्बलगन, सर्व मा. संचालक मंडळ, कार्यकारी संचालक, मुख्य अभियंते-मुख्य महाव्यवस्थापक आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## Inauguration of Training Batch N72 and N73 at Nashik Training Centre







**Training Batch N72 and N73 of newly recruited DET/GET inaugurated at the esteemed Nashik Training Centre on 12th February 2024. Mrs. Gitanjali Parkhi, Superintending Engineer, Nashik Training Centre, extended a warm welcome to all the trainees, emphasizing the importance of their role as responsible engineers within Mahagenco. Mr. Jayant Deore (EE-Admin), Mr. Kahale (Addl EE - ILT) and all the staff members of Nashik Training Centre were present on this momentous occasion.**

# महानिर्मितीचे मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांची भुसावळ वीज प्रकल्पास भेट









भुसावळ वीज प्रकल्प दि. १७ जानेवारी २०२३ रोजी कार्यान्वित झाला, त्याप्रसंगी महानिर्मितीचे मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी भुसावळ वीज प्रकल्पास भेट देऊन आढावा घेतला आणि तसेच संबंधित अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव केला. तसेच ऊर्जामूठ शिल्पाचे उदघाटन सुध्दा केले. यावेळी त्यांचेसोबत संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर, संचालक (प्रकल्प) मा.श्री. अभय हरणे, कार्यकारी संचालक (सं. व सु. - १) मा.श्री. राजेश पाटील, कार्यकारी संचालक (सौर, न.ऊ. (प्र)) मा.श्री. पंकज नागदेवते, मुख्य अभियंते सर्वश्री. मोहन आव्हाड (भुसावळ औ.वि. केंद्र), विवेक रोकडे (भुसावळ वीज प्रकल्प), संजय कुऱ्हाडे (नवीकरणीय ऊर्जा), दत्तात्रय साळुंखे (स्थापत्य-१), श्रीमती. विजया बोरकर (प्रकल्प व्यवस्थापन गट) आणि अन्य वरिष्ठ अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते, त्याप्रसंगीची ही छायाचित्रे.



















# GLIMPSES OF MISSION ZERO DISALLOWANCE - 5E ORGANIZED AT NASHIK TRAINING CENTRE










Glimpses of Mission Zero Disallowance - 5E organized at Nashik Training Centre exclusively for Executive Engineers Hon'ble Chairman & Managing Director Dr. P. Anbalagan, Director (Operations) Shri. Sanjay Marudkar, Executive Director (O&M - I) Shri. Rajesh Patil, Chief Engineer (Koradi-Nashik Training Centre) Shri. Rajesh Morale, Chief Engineer (Nashik TPS) Shri. Prafulla Bhadane were prominently present.











**संपादक : यशवंत मोहिते (जनसंपर्क अधिकारी)**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, सृजन (महानिर्मिती), प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. **(खाजगी वितरणासाठी)**

**E-mail :** pro@mahagenco.in
**Web. :** www.mahagenco.in
**Printed & Published by :** Shri. Yashwant Mohite for
**MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD.**

**Printed At : Hema Arts**
121, Sagar, Prabhat Ind. Estate, Near Dahisar Checknaka,
Western Express Highway, Dahisar (E), Mumbai - 400068.
PH. : 28968221 & Published at Hongkong Bank Bldg., M.G. Road,
Fort, Mumbai - 400 001.

**The Company accepts no responsibility for the matter published in the journal.**